डॉ.गौतम शाह धुळ्यात उपलब्ध

गुडघे दुखी, कंबरदुखी, स्लीप डिस्क, संधीवात, सायटीका या रुग्णांवर ओझोन थेरपी व गुडघ्याची इंजेक्शन थेरपीने यशस्वी उपचार

दि.०२ नोव्हेंबर ते ०७ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत धुळे येथे उपलब्ध असणार आहेत. स.१० ते २ दु.

संपर्क :- **डॉ.गौतम शाह M.S.** (ऑर्थो) शाह क्लिनिक श्री.विठ्ठल हॉस्पीटल, जुने आस्था हॉस्पीटल, रामवाडीसमोर, मालेगावरोड, धुळे (फोन नं.०२५६२-२३५११३) भ्रमणध्वनी-०८६००३५१०००/९८८१२७८६९८

आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ७० ■ अंक क्र.३० ■ रविवार १ नोव्हेंबर २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ८

POST REGD.NO./DHL/53/24-26



इंडियाची रामलीला मैदानाव आज ऐतिहासीक भव्य रॅली मतचोरी आणि निवडणूक आयोगाच्या विरोधात आंदोलन

नवी दिल्ली, दि.३१- नवी दिल्लीतील ऐतिहासिक रामलीला मैदानावर १ नोव्हेंबर रोजी मइंडियाफ आघाडीची भव्य जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. मतदारयाद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणी (एसआयआर) मोहिमेविरोधात आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी विरोधकांनी या महारॅलीचे आयोजन करून केंद्र सरकारविरोधात जोरदार एल्गार पुकारला आहे.

'मतचोरी' आणि निवडणूक आयोगाविरोधात आंदोलन

मतदारयाद्यांच्या फेरतपासणीच्या मुद्द्यावरून काँग्रेससह मइंडियाफ आघाडीने केंद्र सरकारवर ममतचोरीफ्वा गंभीर आरोप केला आहे. या मोहिमेला विरोध करण्यासाठी आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी पदाचा राजीनामा द्यावा या मागणीसाठी हे आंदोलन अधिक तीव्र करण्यात येत आहे. मलोकशाही वाचवाफ मोहीम लोकशाहीचे रक्षण आणि निवडणुकांची पारदर्शकता टिकवून ठेवण्यासाठी सर्व विरोधी पक्ष या मंचावर एकत्र येत आहेत.

प्रमुख नेत्यांची उपस्थिती

या महारॅलीचे नेतृत्व काँग्रेस नेते राहुल गांधी आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे करणार आहेत. याशिवाय मइंडियाफ आघाडीतील सर्व प्रमुख मित्रपक्षांचे ज्येष्ठ नेते आणि देशभरातील हजारो कार्यकर्ते या सभेत सहभागी होणार असून, सभेची जय्यत तयारी पूर्ण झाली आहे.

दिल्ली पोलिसांची परवानगी आणि अटी

सुरुवातीला परवानगी नाकारल्याच्या चर्चांनंतर, दिल्ली पोलिसांनी स्पष्ट केले की त्यांनी १ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते संध्याकाळी ५ या वेळेत रामलीला मैदानावर शांततापूर्ण मार्गाने सभा घेण्यास काँग्रेसला ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे. यासाठी कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने काही अटी घालण्यात आल्या आहेत.

भाजपचे प्रत्युत्तर

मइंडियाफ आघाडीच्या या मोहिमेला शह देण्यासाठी सत्ताधारी भारतीय जनता पक्षाने देशभरात मलोकशाही वाचवा, अराजकता हटवाफ या नावाने पदयात्रा काढण्याची घोषणा केली आहे.

व्यापाऱ्यांची मागणी व वाद

दिवाळीच्या ऐन सणासुदीच्या काळात तब्बल १० लाख लोक आणि २० हजार वाहने दिल्लीत येण्याची शक्यता असल्याने वाहतूक कोंडी होईल, अशी भीती चेंबर ऑफ ट्रेड अँड इंडस्ट्रीने व्यक्त केली होती. अध्यक्ष ब्रिजेश गोयल यांनी राहुल गांधींना पत्र लिहून ही रॅली दिवाळीनंतर घेण्याची (पान ८ वर)

हेलिकॉप्टर कोसळले वैमानिकासह सहा ठार

उत्तराखंड, दि.३१- उत्तराखंडमधील जोशीमठ येथे ३० ऑक्टोबर २०२६ रोजी भाविकांना घेऊन जाणारे एक खासगी हेलिकॉप्टर कोसळल्याने वैमानिकासह सर्व ६ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या अपघातातील ५ मृत प्रवासी हे कर्नाटक (बंगळुरू) येथील रहिवासी होते. हे हेलिकॉप्टर शुक्रवारी बेपत्ता झाले आहे.

बद्रीनाथहून परतताना जोशीमठजवळ ३० ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी सुमारे १.१४ ते २.२० च्या दरम्यान घडली. ट्रान्स भारत एविएशन या कंपनीचे हे हेलिकॉप्टर बद्रीनाथ धामहून उड्डाण करून डेहराडूनमधील सहस्रधारा हेलिपॅडकडे जात होते. उत्तराखंडच्या चमोली जिल्ह्यातील जोशीमठ खोऱ्यात हत्ती डोंगराच्या मागे असलेल्या चई गावाजवळील डोंगरावर हे (पान ८ वर)

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूंच्या हस्ते धर्मध्वजारोहण नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभपर्वाला गती



नाशिक, दि.३१- गोदावरीचा पावन तीर वैदिक मंत्रांचा मंगलघोष शंखनादाने दुमदुमलेला आसमंत भगव्या धर्मध्वजेच्या स्वागतासाठी एकवटलेला संतसमुदाय अन् श्रद्धेच्या अपार भावनेने भारावलेले वातावरण! जणू हजारो वर्षांच्या भारतीय आध्यात्मिक परंपरेने आज नाशिक येथील रामतीर्थावर पुन्हा एकदा सजीव रूप धारण केले. गोदामाईच्या साक्षीने राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते भगवी धर्मध्वजा आकाशात फडकली आणि नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभपर्वाच्या मंगलमय प्रारंभाचा ऐतिहासिक शंखनाद झाला.

या ऐतिहासिक सोहळ्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजित पवार, केंद्रीय आयुष तसेच आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव, पालकमंत्री गिरीश महाजन, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, अन्न व औषध प्रशासन तथा विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ, मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे, महापौर हिमगौरी आडके-आहेर, खासदार राजाभाऊ वाजे, खासदार भास्कर भगरे, खासदार डॉ. शोभा बच्छाव आदी उपस्थित होते.

भारतीय धार्मिक परंपरेचे पावित्र्य आणि वैदिक संस्कृतीचे मांगल्य जपत (पान ८ वर)

संभाजी ब्रिगेडचे आंदोलन तूर्त स्थगित

पांझरेत के.टी.वेअरवर पाट्या बसवून पाणी अडविण्याचे आ.अनुप अग्रवालांचे आश्वासन



धुळे, दि.३१- अल्प पावसामुळे धुळे शहरात आगामी काळात संभाव्य पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन पांझरा नदीवरील के.टी. वेअर बंधाऱ्यांमध्ये लोखंडी पाट्या बसवून पाणी अडविण्यात यावे, या मागणीसाठी संभाजी ब्रिगेडच्या वतीने आंदोलन करण्यात आले. पाट्या बसविण्यासंदर्भात आ. अनुप अग्रवाल यांच्याशी चर्चा करण्यात आली.चर्चेला सकारात्मक प्रतिसाद देत आ. अनुप अग्रवाल यांनी केटी वेअरवर पाट्या बसविण्याचे आश्वासन दिल्याने आंदोलन तुर्त स्थगित करण्यात आले.

यासंदर्भात लघु पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना दिलेल्या निवेदनाची प्रत शुक्रवार, दि. ३० ऑक्टोबर रोजी धुळे शहराचे आमदार अनुप भैय्या अग्रवाल यांना देण्यात आली. संभाजी (पान ८ वर)

काँग्रेस भवनात

स्व.सरदार वल्लभभाई पटेल स्व.इंदिरा गांधीना श्रध्दाजली

धुळे, दि.३१- धुळे शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने भारताच्या प्रथम महिला पंतप्रधान स्वर्गीय श्रीमती इंदिरा गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त तसेच भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त दि.३१ ऑक्टोबर २०२६ रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. धुळे काँग्रेस भवन येथे इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली.

शहरातील टॉवर बगीचा येथील सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुतळ्यास महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे (पान ८ वर)

तोंदे नाल्यावर बंधाऱ्याचे भूमिपूजन, जलसंधारणाला गती आ.पटेल, आ.पावरांसह भूपेशभाई पटेलांचे मार्गदर्शन



शिरपूर, दि.३१- : माजी मंत्री तथा आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिरामदादा पावरा आणि शिरपूरचे माजी नगराध्यक्ष तथा प्रियदर्शिनी सहकारी सूतगिरणीचे चेअरमन भूपेशभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली शिरपूर पॅटर्न अंतर्गत तोंदे येथील नाल्यावर ४८१ व्या बंधाऱ्याचे भूमिपूजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. या बंधाऱ्यामुळे परिसरातील जलसंधारणाला चालना मिळून भूजल पातळीत वाढ होण्यास मदत होणार आहे. तसेच परिसरातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता होण्यास हातभार लागणार आहे.

याप्रसंगी आमदार काशिराम पावरा, प्रियदर्शिनी सहकारी सूतगिरणीचे चेअरमन भूपेशभाई पटेल, बाजार समितीचे चेअरमन के. डी. पाटील, तोंदे येथील प्रगतशील शेतकरी शिवाजी पाटील, माजी सरपंच तथा विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन अनिल पाटील, सरपंच राहुल चौधरी, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष देविदास कोळी, शिरपूर पॅटर्नचे प्रकल्प संचालक तुकाराम दोरीक, विजय पाटील, सुरेश पाटील, विठ्ठल पाटील, अशोक पाटील, जिल्हा परिषद सदस्य प्रतिनिधी कुटवाल पावरा, माजी पंचायत समिती उपसभापती संजय पाटील, पद्माकर पाटील, रतीलाल श्रीराव, हर्षल गुरव, संतोष श्रीराव, नीलकंठ कोळी, राजू पाटील, भरत पाटील, आधार भिल, भटू श्रीराव, योगराज पाटील, किशोर भिल, रविंद्र श्रीराव, मंगल श्रीराव, रणछोड पाटील, नाना पावरा, प्रवीण पाटील, छोटू वंजारी, अविनाश पाटील, निलेश श्रीराव यांच्यासह परिसरातील शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. (पान ८ वर)

जि.परिषदेच्या अंबडपाणी शाळेत पंधरा दिवसांपासून शिक्षक नाही

धुळे, दि. ३१- शिरपूर शहरापासून आठ किलोमीटर अंतरावर असलेल्या अंबडपाणी गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेचा कारभार रामभरोसे होत आहे. गेल्या पंधरा दिवसांपासून या शाळेत एकही शिक्षक आलेला नाही. आदिवासी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. शाळेत स्वच्छतागृह आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. शाळेचे आवार सांभाळण्याचे काम राधेश्याम पावरा नावाची व्यक्ती सांभाळते. पावरा यांचे कुटुंब या आवारात चालविल्या जाणाऱ्या अंगणवाडीचे व्यवस्थापन पहाते, अशी तक्रार शिरपूर फस्ट या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी लाखो रूपये खर्च होतात. पण, त्याचा लाभ आदिवासी विद्यार्थ्यांना मिळतो का, असा प्रश्न घेऊन शिरपूर फस्ट या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी शुक्रवारी पहाणी केली. शिरपूर पासून आठ किलोमीटर अंतरावर असलेल्या अंबडपाणी या गावात संघटनेचे पदाधिकारी गेले आणि त्यांनी शाळेची पहाणी करीत चित्रीकरण (पान ८ वर)

पंचवीस जानेवारी पासून देशभरात जनगणना होणार

नवी दिल्ली, दि. ३१ : केंद्र सरकारने जनगणना २०२७ मधील देशभरातील जनगणनेचे वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार, २५ जानेवारी २०२७ ते २८ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत देशातील बहुतांश राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये जनगणनेची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. जनगणनेसाठी एक मार्च २०२७ रोजी मध्यरात्री १२ वाजता ही संदर्भ तारीख निश्चित करण्यात आली आहे.

अधिकृत अधिसूचनेनुसार, निवडणुका आणि बर्फवृष्टीमुळे काही राज्ये व प्रदेशांमध्ये या कालावधीत जनगणना होणार नाही. (पान ८ वर)

गावकऱ्यांच्या मदतीने आरोपी जेरबंद

जळगावातील भोकर येथे स्टेट बँकेवर दरोडा दिवसा तीस कोटींचे सोने, बारा लाखांची लुट

जळगाव, दि. ३१ : जळगाव जिल्ह्यातील भोकर येथे स्टेट बँकेच्या शाखेवर भरदिवसा सशस्त्र दरोडा धालण्यात आला आहे, दरोडेखोरांनी बंदुकीचा धाक दाखवत बँकेतील तब्बल तीस कोटी रुपयांचे सोने आणि बारा लाख रुपयांची रोकड लंपास केली. या घटनेमुळे जिल्ह्यात एकच खळबळ उडाली. मात्र, घटनेची माहिती मिळताच गावकरी आणि पोलिसांनी तातडीने पाठलाग करत काही आरोपींना पकडण्यात यश मिळवले. दरम्यान, मंत्री गुलाबराव पाटील यांनी बँक शाखेला भेट देऊन पहाणी केली.

खात्रीलायक सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, जळगाव तालुक्यातील भोकर येथील स्टेट बँकेच्या शाखेत आज दुपारी तीन वाजेच्या सुमारास काही सशस्त्र दरोडेखोर शिरले. या घटनेत दरोडेखोरांनी बँक कर्मचाऱ्यांना माराहाण करीत गोळीबारही केला. त्यांनी बँकेतील कर्मचाऱ्यांना शस्त्रांचा धाक दाखवत मारहाण केली. यावेळी दरोडेखोरांनी बंदुकीतून गोळीबारही केला. सुदैवाने गोळी कोणालाही लागली नाही आणि मोठा अनर्थ टळला. त्यानंतर दरोडेखोरांनी बँकेतील सोने आणि रोकड ताब्यात घेत घटनास्थळावरून पळ काढला. दरोड्याची माहिती समजताच ग्रामस्थ आणि पोलिसांनी तातडीने संशयित आरोपींचा पाठलाग सुरू केला. यावेळी विदगावजवळ एक संशयित आरोपी गावकऱ्यांच्या हाती लागला. संतप्त ग्रामस्थांनी त्याला (पान ८ वर)



सरदार वल्लभभाई पटेल जयंती गुजर समाजातर्फे रक्तदान शिबीर

सोनगीर दि.३१ (प्रतिनिधी)- भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त येथील मोरया ग्रुप व समस्त गुजर समाजाच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. येथील गुजर गल्लीतील श्री स्वामीनारायण मंदिर परिसरात पार पडलेल्या या उपक्रमांतर्गत रक्तदान शिबिर, मोफत मधुमेह तपासणी , बी.पी. आणि नेत्रतपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

समस्त लेवा पाटीदार गुजर समाज सोनगीरचे अध्यक्ष लक्ष्मीकांत पाटील यांनी सरदार पटेल यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. सोनगीर पोलीस स्टेशनचे एपीआय तुषार देवरे आणि मा. पं.स. सदस्य अविनाश महाजन यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. माजी उपसरपंच प्रकाश गुजर यांनी प्रथम रक्तदान करून (पान ८ वर)

धुळ्यात मध्यरात्री कोम्बिंग ऑपरेशन तीन गोवंशाची सुटका, तिघांना अटक

धुळे, दि. ३१ (प्रतिनिधी) :शहरातील आझादनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मध्यरात्री पोलिसांनी विशेष कॉम्बिंग ऑपरेशन राबवत तीन संशयित आरोपींना अटक केली. या कारवाई दरम्यान कत्तलीच्या उद्देशाने निर्दयतेने बांधून ठेवलेल्या तीन गोवंशांची सुटका करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखा, आझादनगर पोलीस ठाण्याच्या पथकाने ही कारवाई केली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आझादनगर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १४६/२००९ अन्वये दाखल असलेल्या गंभीर गुन्ह्यातील संशयित आरोपी जब्बार शहा गुलाब शाह फकीर (रा. वडजाई रोड, धुळे) हा गुन्हा घडल्यापासून फरार होता. या संशयित आरोपीचा जामीन अर्ज उच्च न्यायालयाने यापूर्वी फेटाळला होता. तसेच त्याला तातडीने अटक करण्याचे आदेश देण्यात आले होते. असे असताना २९ ऑक्टोबरला रात्री आठ वाजेच्या सुमारास आझादनगर पोलीस ठाण्याच्या शोध पथकाने जब्बार शाह याला नंदी रोडवरील टपरी जवळून ताब्यात घेतले. मात्र, पोलिसांनी कारवाई सुरू करताच आरोपीने आरडाओरडा करून कुटुंबिय आणि नातेवाईकांना घटनास्थळी बोलावले. यावेळी त्याच्या कुटुंबातील काही महिला आणि पुरुषांनी पोलिसांच्या अंगावर धावून जात धक्काबुक्की केली. पोलिसांच्या शासकीय कामात अडथळा निर्माण केला. या गोंधळाचा फायदा घेत जब्बार शाह पोलिसांच्या ताब्यातून पळून जाण्यात यशस्वी झाला. या घटनेप्रकरणी आझादनगर पोलीस ठाण्यात (पान ८ वर)

दिपक ज्वेलर्स

सोने- 22 K -1,27,400 रु.+3% GST

सोने- 24 K -1,38,500 रु.+3% GST

चांदी- 1,85,000 रु.+3% GST

तारगल्ली, सराफ बाजार, धुळे

फोन नं.२३३१०३/२३४१०३

शिरपूर पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेचा पाठपुरावा पूरग्रस्त व्यावसायिकास पाच ला.चा विमा मंजूर



शिरपूर, दि.३१- मुसळधार पावसामुळे मे. लाईफ स्टाईल मेन्स वेअरचे संचालक मालक समीर इक्बाल पटेल यांच्या दुकानात अवघ्या दहा-बारा दिवसांच्या कालावधीत दोन वेळा पावसाचे पाणी शिरले होते. यामुळे दुकानातील माल व इतर साहित्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. संबंधित व्यावसायिकांचे दि शिरपूर पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि. शिरपूर येथे कॅश क्रेडिट खाते असल्याने बँकेमार्फत झुरीच कोटॅक जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड कडून शॉप किपर पॉलिसी अंतर्गत दुकानाचा विमा उतरविण्यात आला होता.

नुकसानीनंतर बँकेने विमा कंपनी, सर्व्हेअर व ग्राहक यांच्याशी सातत्याने पाठपुरावा करून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली. या प्रयत्नांना यश मिळून ग्राहकास रुपये ५ लाख ४४ हजार ६३८ इतका विमा दावा मंजूर झाला.

विमा रकमेचा धनादेश ग्राहकास शिरपूर पिपल्स बँकेचे अध्यक्ष योगेश नारायण भंडारी यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला. यावेळी बँक महाव्यवस्थापक आनंद पाठक, व्यवस्थापक नरेंद्र माळी, विमा अधिकारी कल्पेश कर्णावत, (पान २ वर)

शिंदखेडा वि.का.सोसायटी दोन स्विकृतांची निवड

धुळे, दि. ३१ (प्रतिनिधी) : शिंदखेडा येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सेवा संस्थेवर दोन स्विकृत संचालकांची बिनविरोध निवड झाली. ची मासिक सभा नुकतीच उत्साहात पार पडली. संस्थेचे विद्यमान चेअरमन प्रकाश नथ्थु पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत संस्थेच्या कामकाजासह विकासाभिमुख विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी संस्थेवर दोन स्वीकृत संचालक सदस्यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

सभेच्या विषयपत्रिकेवरील ठराव क्रमांक ५ नुसार संस्थेवर २ नवीन स्वीकृत संचालक सदस्य घेण्याचा (पान २ वर)



दुष्काळ व पाणीटंचाई निवारणासाठी आ.पाडवींच्या अध्यक्षतेखाली बैठक

शहादा, दि.३० (प्रतिनिधी)- तालुक्यात यावर्षी झालेल्या अत्यल्प पावसामुळे निर्माण झालेली दुष्काळसदृश परिस्थिती, पाणीटंचाई, चारा टंचाई तसेच शेतकऱ्यांच्या विविध समस्यांवर प्रभावी उपाययोजना करण्याच्या दृष्टीने आज तहसील कार्यालय, शहादा येथे आ.राजेश पाडवी यांच्या अध्यक्षतेखाली दुष्काळ व पाणीटंचाई आढावा बैठक पार पडली.

या बैठकीच्या प्रारंभी तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी (पान २ वर)

नंदुरबारात अपहरणाच्या घटना दोन तरुणींसह एक पुरुष बेपत्ता


नंदुरबार, दि.३१ (प्रतिनिधी)- नंदुरबार जिल्ह्यात अपहरणाच्या ३ घटना समोर आल्याने खळबळ उडाली आहे. नवापूर आणि नंदुरबार शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या या घटनांमध्ये दोन तरुणींसह एक पुरुष बेपत्ता झाला आहे. याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात व्यक्तींविरुद्ध अपहरणाचे गुन्हे दाखल केले असून बेपत्ता व्यक्तींचा शोध सुरू केला आहे.

नवापूर शहरातील देवळफळी येथील गोपाल भीमसिंग गावित (वय ४२, व्यवसाय मजुरी) हे २३ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री २ वाजेच्या सुमारास शौचास जात असल्याचे सांगून घरातून बाहेर पडले. मात्र, ते अद्याप घरी परतलेले नाहीत. कोणीतरी अज्ञात व्यक्तीने त्यांचे अपहरण केल्याची फिर्याद पतकी वनिता गावित यांनी नवापूर पोलीस ठाण्यात दिली आहे. याप्रकरणी गुन्हा क्रमांक ७६३/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास पोलीस कर्मचारी प्रमोद गुजर करीत आहेत.

दुसरी घटना नंदुरबार शहरातील बसस्थानक परिसरात घडली. २१ वर्षीय तरुणी २९ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी २ वाजेच्या सुमारास नंदुरबार बसस्थानक येथून बेपत्ता झाली. अज्ञात व्यक्तीने फूस लावून अथवा आमिष दाखवून तिला पळवून नेल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. याप्रकरणी नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ८८७/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तिसरी घटना नंदुरबार शहरातील घी बाजार परिसरातील सी. बी. कलेक्शन या दुकानात घडली. वडगाव बंधारपाडा, ता. जि. नंदुरबार येथील तरुणी ३० ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ३.३० वाजेच्या सुमारास दुकानातून बेपत्ता झाली. अज्ञात व्यक्तीने फूस लावून किंवा आमिष दाखवून तिला पळवून नेल्याचा संशय तिच्या (पान २ वर)

द्वितीय पुण्यस्मरण



स्व.धनराजजी गुलाबचंदजी भंडारी (भाऊसा)

जन्म.२४/०२/१९२८ स्व.०१/११/२०२४

तुमचं असणं सर्वकाही होतं.
आयुष्यातील एक ते सुंदर पर्व होतं.
आज सर्वकाही असल्याची जाणीव आहे
पण तुमचं नसणं हीच मोठी उणीव आहे

-: शोकाकुल :-

विजयकुमार, अजयकुमार, राजेंद्र, भरत - मुले
सौ.मधुकिरण नरेंद्र नवलखा, सौ.अलका प्रदिप आब्बड (मुली)
आनंद, आलोक, आदेश, गौतम, नील- नातू
अरहम, जयवीर, मीत- पणतू

भंडारी बंधु सराफ परिवार धुळे

पान १ वरुन

शिरपूर पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेचा पाठपुरावा

बँक कर्मचारी गोकुळ जगताप उपस्थित होते. यावेळी अध्यक्ष योगेश भंडारी यांनी सांगितले की, शहरातील व्यापारी वर्ग, दुकानदार यांना अशा येणाऱ्या अपात्कालीन संकटातून बचाव व्हावा व आर्थिक नुकसानचा होणारा घात टळावा यासाठी विमा संरक्षण घेणे गरजेचे आहे. ग्राहकांच्या हितासाठी बँक नेहमीच तत्पर असून नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या ग्राहकांना विमा संरक्षणाचा लाभ मिळवून देण्यासाठी बँक सातत्याने प्रयतक्शील आहे. विमा संरक्षणामुळे संकटाच्या काळात व्यावसायिकांना मोठा आर्थिक दिलासा मिळत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

ग्राहक समीर इक्बाल पटेल यांनी विमा दावा मंजूर करून देण्यासाठी दि शिरपूर पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि. शिरपूर व झुरीच कोटॅक जनरल इन्शुरन्स कंपनी यांचे आभार मानले.

शिंदखेडा वि.का.सोसायटी दोन स्विकृतांची निवड

निर्णय घेण्यात आला. त्यानुसार वंजी काशीराम बडगुजर आणि बापू कौतिक मराठे यांच्या नावांना संचालक मंडळाने एकमताने सहमती दर्शविली. त्यानंतर दोघांचीही स्वीकृत संचालक सदस्य म्हणून बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. या निवडीमुळे संस्थेच्या कामकाजात नव्या सदस्यांच्या अनुभवाचा आणि सहकार्याचा लाभ होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. या मासिक सभेला गटनेते रावसाहेब अनिल वानखेडे, संस्थेचे चेअरमन प्रकाश नथ्थु पाटील, माजी उपनगराध्यक्ष प्रकाश नागो देसले यांच्यासह संचालक युवराज नामदेव माळी, बन्सीलाल पितांबर बोरसे, सदाशिव नागो पाटील, दिनेश बंडू सूर्यवंशी, मनीष कालिदास देसले, आशाबाई भगवान मराठे, सचिन चंद्रकांत देसले, दिलीप आधार पाटील, मनीषा राकेश चौधरी, उपेश गिरासे तसेच संस्थेचे सचिव भगवान पवार उपस्थित होते. नवीन स्वीकृत संचालकांच्या बिनविरोध निवडीफळे संस्थेच्या पदाधिकारी व संचालक मंडळात सम्मधानाचे वातावरण व्यक्त करण्यात आले.

नंदुरबारात अपहरणाच्या घटना

कुटुंबीयांनी व्यक्त केला आहे. याप्रकरणी नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ८८८/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास पोलीस कर्मचारी दीपक बुनकर करीत आहेत.

एकाच जिल्ह्यात अल्पावधीत अपहरणाच्या ३ घटना घडल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. तिन्ही प्रकरणांतील बेपत्ता व्यक्तींचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर असून पुढील तपास सुरू आहे.

दुष्काळ व पाणीटंचाई निवारणासाठी

संभाजी पाटील यांनी प्रास्ताविक करून तालुक्यातील दुष्काळसदृश परिस्थिती व पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर बैठकीचा उद्देश स्पष्ट केला. त्यानंतर उपविभागीय अधिकारी दीपक गिरासे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

बैठकीत आ.राजेश पाडवी यांनी संबंधित विभागांकडून दुष्काळ निवारणासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांचा विभागनिहाय आढावा घेतला. ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, पाणीटंचाईग्रस्त गावांना व पाड्यांना पाणीपुरवठा, चारा टंचाई, पशुधनासाठी आवश्यक सुविधा तसेच दुष्काळाच्या परिस्थितीत नागरिकांना दिलासा देण्यासाठी कोणत्या उपाययोजना करणे आवश्यक आहे, याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीस शहादा पंचायत समितीची गटविकास अधिकारी, कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, तालुका कृषी अधिकारी, वनक्षेत्रपाल शहादा व राणीपूर, मुख्याधिकारी नगरपरिषद शहादा, उपनिबंधक सहकारी संस्था, उपअभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अधिकारी, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, उपअभियंता ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण नंदुरबार, उपविभागीय अधिकारी लघुपाटबंधारे विभाग प्रकाशा व सारंगखेडा तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. यासोबतच शहादा विधानसभा मतदारसंघातील सरपंच, ग्रामपंचायत प्रशासक, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी व कृषी विभागातील संबंधित अधिकारी यांना बैठकीस उपस्थित राहण्याबाबत निर्देश देण्यात आले होते.

बैठकीत संबंधित विभागांनी दुष्काळ निवारणासाठी केलेल्या उपाययोजना, उपलब्ध साधनसामग्री, आवश्यक सुविधा आणि पुढील नियोजनाबाबत माहिती सादर केली. तसेच बैठकीदरम्यान विविध गावांच्या सरपंचांनी आपल्या गावातील पाणीटंचाईच्या समस्या व आवश्यक उपाययोजनांबाबत मागण्या मांडल्या.

चांदसैली येथील सरपंचांनी गावातील पाणीटंचाई लक्षात घेता पिण्याच्या पाण्यासाठी टँकर उपलब्ध करून देण्याची मागणी केली. लंगडी येथील सरपंचांनी बोअरवेल २०० फुटांपेक्षा अधिक खोल करताना येणाऱ्या अडचणी व त्यासंदर्भातील समस्या प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्या. नागझिरी येथील सरपंचांनी ग्रामपंचायत हद्दीतील काही पाड्यांपर्यंत पाण्याचे टँकर पोहोचू शकत नसल्याची समस्या मांडली. अशा पाड्यांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा कशा पद्धतीने करता येईल, याबाबत संबंधित विभागाकडे विचारणा करण्यात आली. यावेळी उपस्थित सरपंचांनी आपल्या गावातील पाणीटंचाई, नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणी तसेच दुष्काळ निवारणासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांबाबत प्रशासनासमोर आपले म्हणणे मांडले.या बैठकीत दुष्काळाच्या परिस्थितीत कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी गैरहजर राहणार नाही, याबाबत सूचना देण्यात आल्या. दुष्काळाच्या संकटावर मात करण्यासाठी सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी आपापल्या विभागामार्फत जबाबदारीने काम करावे. नागरिकांना पिण्याच्या पाण्यासह आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनातील सर्व विभागांनी परस्पर समन्वय ठेवून कार्यवाही करावी, अशा सूचना आ.राजेश पाडवी यांनी दिल्या.

तसेच पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये आवश्यक उपाययोजना करण्यासाठी संबंधित विभागांनी तत्परतेने कार्यवाही करावी व दुष्काळाच्या परिस्थितीत नागरिकांना कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होणार नाही, यासाठी प्रशासनाने सज्ज राहावे, असे निर्देश देण्यात आले. यावेळी तहसीलदार संभाजी पाटील व आ.राजेश पाडवी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. बैठकीचे सूत्रसंचालन व आभार ग्राम महसूल अधिकारी लक्ष्मण कोळी यांनी केले. बैठकीची रूपरेषा नायब तहसीलदार शिरीषचंद्र परदेशी यांनी तयार केली होती.

पटेल स्वायत्त अभि. महा.चे क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय यश



शिरपूर, दि.३१- डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या अंतर्गत आयोजित आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत शिरपूर येथील आर. सी. पटेल स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. या स्पर्धेत विविध महाविद्यालयांतील एकूण संघांनी सहभाग नोंदविला. खेळाडूंनी दाखविलेली जिद्द, चिकाटी, शारीरिक क्षमता आणि सांघिक भावना यांमुळे स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

या आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे.बी. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या क्रीडा कौशल्याचे प्रदर्शन केले.

कबड्डी स्पर्धेत महाविद्यालयाच्या पुरुष संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला. आक्रमक चढाया, प्रतिस्पर्ध्यांच्या चढायांना प्रभावी प्रतिकार, अचूक पकडी आणि खेळाडूंमधील उत्तम समन्वय यांच्या जोरावर संघाने प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. या संघाचे नेतृत्व कर्णधार वैभव पाटील यांनी केले.

खो-खो स्पर्धेतही महाविद्यालयाच्या पुरुष संघाने उल्लेखनीय कामगिरी करत द्वितीय क्रमांक मिळविला. या संघाचे नेतृत्व कर्णधार योगेश पवार यांनी केले. खेळाडूंनी वेग, चपळता, अचूक नियोजन आणि उत्कृष्ट सांघिक समन्वय यांच्या जोरावर स्पर्धेत प्रभावी कामगिरी केली. क्रीडा संचालक प्रा. एन. एस. राठोड यांच्या मार्गदर्शनामुळे खेळाडूंना आपले कौशल्य विकसित करण्याची आणि स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करण्याची प्रेरणा मिळाली. कबड्डी आणि खो-खो या दोन्ही स्पर्धांमधील यशामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत मोलाची भर पडली आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, ट्रस्टी जयश्रीबेन पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, महाविद्यालयाचे संचालक डॉ. जे. बी. पाटील, उपसंचालक डॉ. पी. जे. देवरे, परीक्षा नियंत्रक डॉ. सुहास शुक्ल, कुलसचिव डॉ. प्रशांत महाजन, सर्व विभागप्रमुख, सर्व प्राध्यापक, कर्मचारी यांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले. खेळाडूंनी भविष्यातही अशीच उत्कृष्ट कामगिरी करून नावलौकिक वाढवावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.क्रीडा संचालक प्रा. एन. एस. राठोड यांचे खेळाडूंना मार्गदर्शन लाभले.

विविध खेळांमुळे व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होणे शक्य- प्राचार्य डॉ. पाटील



धुळे, दि.३१- विविध खेळांमुळे सामाजिक सलोखा वाढतो आणि मानवतेची भावना दृढ होऊन व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगतीसोबतच क्रीडा व सामाजिक उपक्रमांमध्येही सक्रिय सहभाग घ्यावा, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. जगदीश पाटील यांनी केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत संकल्पनेतून प्रेरणा घेत विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे नशामुक्त युवा विकसित भारत, आठवड्यांचा संकल्प अभियान अंतर्गत पारंपरिक क्रीडा दिवस साजरा झाला. यावेळी प्राचार्य पाटील अध्यक्षस्थानावरून बोलत होते. क्रीडा संचालक डॉ. कैलास बोरसे प्रमुख पाहुणे होते. उपप्राचार्य डॉ. वाय. जी. पाटील, डॉ. आर. आर. गावीत, डॉ. राजीव आरके, प्रा. देविदास चौधरी, प्राध्यापक, स्वयंसेवक, विद्यार्थी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. पाटील म्हणाले की, खेळामुळे केवळ शारीरिक विकासच होत नाही, तर मानसिक विकासालाही चालना मिळते. खेळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये परस्पर सहकार्य, मैत्रीभाव, संघभावना आणि खिलाडूवृत्ती विकसित होते.

डॉ. बोरसे यांनी देशी व पारंपरिक खेळांचे महत्त्व विशद केले, कबड्डी, खो-खो, लगोरी आणि रस्सीखेच यांसारखे पारंपरिक खेळ कमी जागेत व कमी खर्चात खेळता येतात. उपलब्ध खेळाडूंच्या संख्येनुसार विविध गटांमध्ये खेळ होतात, या खेळांमुळे शारीरिक तंदुरुस्ती, चपळता, निर्णयक्षमता, संघभावना आणि सहकार्याची वृत्ती विकसित होते. देशी खेळांचे जतन व संवर्धन केल्यामुळे भारतीय संस्कृती आणि पारंपरिक क्रीडा वारशाचे संरक्षण होते, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रम अधिकारी डॉ. बाजीराव पाटील यांनी सांगितले की, युवकांनी व्यसनांपासून दूर राहून आरोग्यदायी जीवनशैली स्वीकारावी, सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा आणि पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचा भाग म्हणून प्रत्यक्ष कबड्डी, खो-खो, रस्सीखेच आणि लगोरी यांसारख्या पारंपरिक खेळांद्वार विद्यार्थ्यांना क्रीडासंस्कृतीचे महत्त्व पटवून देण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक जगदीश मरसाळे यांनी व्यसनांचे दुष्परिणाम अधोरेखित करणारे एकपात्री नाटक सादर केले. पर्यावरण संवर्धनाच्या अनुषंगाने मियावाकी घनवनातील झाडांची निगा व संवर्धन या उपक्रमावर विशेष भर देण्यात आला. डॉ. निलेश रोटे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. देविदास चौधरी यांनी आभार मानले.



विश्वकर्मा मंदिर सभामंडप कामाचे आमदार भदाणेंच्या हस्ते भूमीपूजन

धुळे, दि.३१- बोरकुंड (ता. धुळे) येथे महर्षी वाल्मिकी जयंतीचे औचित्य साधून ग्रामस्थांचे श्रद्धास्थान असलेल्या विश्वकर्मा मंदिर सभा मंडप कामाचा श्रीगणेशा झाला. धुळे ग्रामीणचे आमदार राम भदाणे यांच्या हस्ते भूमीपुजन झाले.

यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष रामकृष्ण खलाणे, उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, सरचिटणीस बाळासाहेब भदाणे, संघटन सरचिटणीस भाऊसाहेब देसले, माजी कृषी सभापती प्रा. अरविंद जाधव, माजी उपसभापती विद्याधर पाटील, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य प्रभाकर भदाणे, संदीप देसले, सरपंच रावसाहेब धुडकू भदाणे, प्रभारी सरपंच हितेश पारीख, रतनपुरा सरपंच सुनील चौधरी, विंचूरचे सरपंच बाळासाहेब देसले, तिखीचे सरपंच श्रीराम पाटील, नाणे माजी सरपंच अजय राजपूत, माजी सरपंच राजेंद्र मराठे, शेतकरी विविध कार्यकारी विकास सोसायटीचे गंगाधर माळी, भरत भदाणे, रवींद्र भदाणे, सुधीर मिस्तरी, राजू मिस्त्री, प्रमोद देवरे, लक्ष्मण देवरे, भानुदास देवरे आणि परिसरातील ग्रामस्थ व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


आ.भदाणे यांनी महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. महर्षी वाल्मिकी यांचे जीवनमूल्ये आणि आदर्श विचार आपल्याला सन्मार्गावर चालण्याची प्रेरणा देतात. विश्वकर्मा मंदिर हे केवळ धार्मिक नाही तर सामाजिक एकतेचे केंद्र आहे. सभा मंडपामुळे गावातील सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांना अधिक बळ मिळेल, असा विश्वास आ. भदाणे यांनी व्यक्त केला. जिल्हाध्यक्ष बापू खलाणे, प्रा.अरविंद जाधव, सरचिटणीस बाळासाहेब भदाणे, भाऊसाहेब देसले आदींनी विकासकामांविषयी ठोस भूमिका मांडली.

जवाहर मेडी.फाऊंडेशन अवघड शस्त्रक्रीयेत यश

धुळे, दि.३१- येथील जवाहर मेडीकल फाउंडेशनच्या एसीपीएम वैद्यकीय रुग्णालय व महाविद्यालय मोराणे प्र.ल.धुळे येथे एका महिला रुग्णाची अवघड शस्त्रक्रीया यशस्वी करण्यात आली.त्यामुळे येथील वैद्यकीय पथकाचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

मालेगाव तालुक्यातील राजमाने येथील एका ४० वर्षीय महिलेला मागील काही महिन्यांपासून डाव्या पायाच्या तीव्र वेदना,मुंग्या येणे, आणि पाय सुन्न होणे असे त्रास सहन करावे लागत होते. त्यामुळे योग्य उपचारासाठी सदर महिलेला नातेवाईकांनी जवाहर मेडीकल फाउंडेशनच्या एसीपीएम वैद्यकीय रुग्णालय व महाविद्यालय मोराणे प्र.ल.धुळे येथे दाखल केले.येथील तज्ञ डॉक्टरांनी आवश्यक त्या वैद्यकीय चाचण्या केली. शरीरातील सर्वात मुख्य मज्जा तंतू असलेल्या सायटिका नर्व्हवर स्वानोमा टयूमर(गाठ) असल्याने तपासणीत निदान झाले. त्यानंतर डॉ.प्रणीत मानेकर आणि त्यांच्या पथकाने यशस्वीपणे शस्त्रक्रीया केली. याकामी डॉ.गिंदोडीया,भूलतज्ञ डॉ. कुंवर आणि डॉ.कोल्हे यांचे सहकार्य मिळाले. आता रुग्णांची प्रकृती ठणठणीत असून नातेवाईकांनी समाधान व्यक्त केले आहे. यशस्वी शस्त्रक्रीया करणाऱ्या वैद्यकीय पथकाचे चेअरमन मा.आ.कुणाल बाबा पाटील,सचिव डॉ.ममता पाटील, अधिष्ठाता डॉ.नितीन कुलकर्णी यांनी कौतुक केले आहे.

प्रकाश में आज– फरिश्ते



धर्मेन्द्र विनोद खन्ना रजनीकांत
जया प्रदा सदाशिव अमरापुरकर

देवरे अभियांत्रिकीत इनोव्हेशन क्रक्स प्रकल्प संकल्पना सादरीकरण स्पर्धा

धुळे दि.३१- श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या बापूसाहेब शिवाजी राव देवरे अभियांत्रिकी महाविद्यालयातील मेकॅनिकल विभागात महाविद्यालयाच्या अमेरिकन सोसायटी ऑफ मटेरियल्स अंतर्गत कार्यरत मटेरिअल ॲडव्हांटेज चॅप्टर द्वारा इनोव्हेशन क्रक्स अभियांत्रिकी प्रकल्प संकल्पना सादरीकरण स्पर्धेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते

विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात आपला सहभाग नोंदविला व आपल्या विविध संकल्पनांचे सादरीकरण केले, एकूण एकोणावीस गट या स्पर्धेत सहभागी झाले होते. स्पर्धेच्या शुभारंभ प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा डॉ हितेंद्र पाटील, मेकॅनिकल विभाग प्रमुख प्रा डॉ एस डी सूर्यवंशी, परिक्षक प्रा डॉ अमोल नंदवालकर, प्रा डॉ दिपक सोनवणे तसेच प्रा शिवनाथ सिंग, समन्वयक प्रा निखिल देशमुख, प्रा संतोष पाटील, प्रा कैलाश माखिजा आदी मान्यवर उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा डॉ हितेंद्र पाटील यांनी उपस्थित परिक्षकांचे स्मृतीचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यांनी संगणकीय प्रणाली द्वारे स्पर्धेचे उद्घाटन केले व आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना स्पर्धेतील यशासाठी शुभेच्छा दिल्या. विभाग प्रमुख व मटेरियल ॲडव्हांटेज चॅप्टर चे फॅकल्टी को-ऑर्डिनेटर प्रा डॉ एस डी सूर्यवंशी यांनी आभार मानले. प्रा इंद्रजीत वानखेडे यांनी सूत्रसंचालन केले. याप्रसंगी विविध दालनात विद्यार्थ्यांनी आपल्या प्रकल्प संकल्पना परिक्षकांसमोर सादर केल्या. या स्पर्धेत सादर करण्यात आलेल्या निवडक सात संकल्पनांना रुपये पाच हजारांचे संशोधन अनुदान देण्यात येणार आहे. मटेरिअल ॲडव्हांटेज चॅप्टर चे अध्यक्ष शशिकांत माळी, उपाध्यक्ष अनिशा सगरे, सचिव सुयश गायकवाड, कोशाध्यक्ष सुयोग पाटील यांनी स्पर्धा यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष मा बाबासाहेब कुणाल पाटील, महाविद्यालयाचे अध्यक्ष मा दादा साहेब सुभाष देवरे, उद्योजक मा विलास देवरे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली मेकॅनिकल विभागाने या स्पर्धेचे उत्तम संयोजन केले.

रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान



जिजाऊ, सावित्री, रमाईच्या त्यागाची आठवण महिलांनी ठेवावी- निरभवणे

साक्री, दि.३१ (प्रतिनिधी) -भारतीय समाजात शिवाजी महाराजांना घडविण्यासाठी, तसेच महिलांना शिक्षण देण्यासाठी, भारतीय संविधानाचे निर्माते डॉ बाबासाहेब आंबेडकर घडण्यासाठी अनुक्रमे जिजाऊ, सावित्री, रमाईचा त्याग महत्वपूर्ण आहे,या त्यागाची जाणीव महिलांनी ठेवावी, असे प्रतिपादन भारतीय बौद्ध महासभेच्या नाशिक जिल्हा महिला अध्यक्ष ललिता निरभवणे यांनी केले.

आदर्श नगर, साक्री येथे वर्षावास समापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून ललिता निरभवणे बोलत होत्या.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा कोषाध्यक्ष प्रा.आर.डी.साळवे हे होते. प्रास्ताविक भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा पर्यटन उपप्रमुख सुनील पवार यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ दिलीप लोखंडे कबिराकार यांनी केले.यावेळी मंचावर जयवंत वाघ, भारतीय बौद्ध महासभेचे साक्री शहर अध्यक्ष डी.एम.मोहिते,माधव थोरात, पुष्पा मोरे, मनिषा मोहिते, जिजाबाई सोनवणे, कल्पना ब्राह्मणे, सुनंदा बच्छाव, कविता सोनवणे उपस्थित होत्या.ललिता निरभवणे पुढे म्हणाल्या की, महिलांनी अंधश्रद्धेपासून दूर राहून तथागत सिध्दार्थ गौतम बुद्धाच्या मध्यममार्गी बुद्धधम्माचे आचरण करावे , शोभा लोखंडे यांनी फुल्यांनीस जर का शिकवले नसते सावित्रीमाईला हे गीत मधुर आवाजात सादर केले.शेवटी रविना साळवे यांनी सरणतयं घेऊन कार्यक्रमाची सांगता केली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठ सुनंदा मोहिते, हिराबाई थोरात, इंदुबाई वाघ, सुरेखा सूर्यवंशी,विमलाबाई पान पाटील,मिलन बच्छाव, निर्मला सोनवणे, वंदना वाघ , बायजाबाई मोहिते, संगिता जवराज, कल्पना वाघ,आदि महिला कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.शेवटी शोभा लोखंडे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

शब्दकोडे क्रमांक.२४८३

१		■	२	३		४	■	५	६		७
	■	८			■	९	१०			■	
११	१२	■	१३			■	१४		■	१५	
■	१६	१७	■		■	१८		■	१९		
२०	■	२१		■	२२		■	२३			■
२४	२५		■	२६		■	२७	■	२८		२९
■	३०		३१	■	३२	३३	■	३४		■	
३५	■	३६			■	३७		■	३८	३९	
४०	४१	■		■	४२		■	४३			■
४४			■	४५	■	४६	४७		■	४८	४९
५०		■	५१			■		■	५२		
	■	५३			■	५४				■	

आडवे शब्द : १.ऐट,डौल २.बेअब्रु ५.परिस्थितीत पिचलेला ८.स्तंभ ९.दक्ष ११.प्रणयातील नारी १३.भंगारवाला १४.ठिकाण १५.पक्ष्यांचा सुमदाय १६.नजर १८.एक आणि एक मिळून तयार होणरी संख्या १९.तह २१.जुन २२.हिंदीत-पहाट २४.मडके २६.एक टिकाऊ लाकूड २८.विना पैसे मिळालेला ३०.मज्जाव ३२.बटटा,कलंक ३४.पराक्रमी ३६.बाब ३७.आजार ३८.नासलेला ४०.आवड ४२.हाक ४३.कैची ४४.लावण्यांचा फड ४६.दुश्मनांच्या विमानाचा थांगपत्ता लावणारी एक संदवहन प्रणाली ४८.ख्रिस्ती धर्मगुरू ५०.बुडबुडे ५१.मंथन ५२.सुकवलेली बारीक कोळंबी ५३.अविवाहीत पुरूष ५४.सच्चा

उभे शब्द : १.शायरी करणारा २.एक उभयचर पक्षी ३.व्दारपाल ४.तीळ ५.मधासारखा गोड ६.प्रजा ७.ऐतवार १०.देश १२.नजर १५.रोमहर्षक १७.तहपत्र १८.रस्सा २०.पहा २२.डोंगर पोखरून तयार केलेला रस्ता २३.इंग्रजीत वर्णमालेतील चौथे वर्ण २५.गोंद २७.इंग्रजी वर्णमालेतील अकरावे वर्ण २८.अवधी २९.घाबरा ३१.हिंदीत-चिंच ३३.पोटूशी आलेली ३५.एखादया कार्याचा केलेला परतावा ३९.भित्रा ४१.कागदाच्या डावी कडील रकाना ४३.करणारा ४५.वर्तन ४७.डावखुरा ४९.पडदा ५१.संभाव्य नुकसानीची शक्यता गृहीत धरून ती कमी करण्यासाठीचा जोखीम व्यवस्थेचा उपाय ५२.चाकू

शब्दकोडे क्रमांक.२४८२ चे उत्तर

कु	द	र	त	■	शि	■	हि	म	न	ग	■
द	म	ट	■	मु	का	द	म	■	डा	ल	डा
ळ	■	र	वा	■	री	स	■	छा	न	■	व
■	प	ट	प	ट	■	रा	ज	■	ड	र	■
ल	ढा	■	र	क	म	■	मी	न	■	ई	द
ता	ई	त	■	लू	ट	मा	र	■	श्वा	स	■
मं	■	प	री	■	र	व	■	जा	न	■	क
गे	रू	■	या	क	■	स	व	य	■	ढा	बा
श	■	ग	ल	ब	त	■	न	का	शा	■	ब
क	स	र	■	र	■	ह	वा	■	न	टी	■
र	म	■	ब	स्ता	न	■	स	म	दा	■	यू
■	र	ग	■	न	र	क	■	ग	र	बा	■





रविवार १ नोव्हेंबर २०२६

आपला महाराष्ट्र
www.aplamaharashtra.in

बहर





प्रा.डॉ.मधुकर जाधव
मो.९९७५५४६०२०

विश्वातील महान राजे

छत्रपती शिवाजी महाराज हे प्रजेला रोजगाराची आणि जगण्याची हमी देणारे जगातील पहिले राजे होत. छत्रपतींनी स्वराज्यामध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊन सर्वसामान्यांच्या कष्टाला बळ दिले.सुखी जीवनासाठी सर्वसमावेशक धोरण राबविले. गुणी माणसांचे कर्तव्य व कष्टक-यांची ताकद हे छत्रपतींच्या स्वराज्याचे वैशिष्ट्य होय. सर्वगुणसंपन्नता व सर्वसमावेशकता हे त्यांच्या कार्यनिष्ठेचे मुख्य तत्व होते. स्वराज्याच्या दृष्टीने सुबत्ता व आर्थिक सुरक्षितता महत्वाची आहे हे ओळखुन महाराजांनी सर्वसामान्यजनतेला रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या.छत्रपतींच्या कालखंडांमध्ये इतर उद्योग व्यवसायाप्रमाणे सैनिकी व लष्करी व्यवसायाला महत्व प्राप्त झालेले होते. स्वराज्यात विविध लोककल्याणकारी योजना राबवून सर्व रयतेला रोजगार उपलब्ध करून दिला.

रोख व नियमित पगार- छत्रपतींनी जेव्हा स्वराज्य बांधणीला सुरुवात केली तेव्हा अनेक लोक या कार्यात सहभागी झाले. स्वराज्य हितासाठी मावळा या संकल्पनेखाली सर्व रयत एकत्र आली.सा-याच्या रुपाने जमा झालेल्या वस्तूंची विक्री त्याच ठिकाणी नकरता ज्या ठिकाणी या वस्तु उपलब्ध नाहीत अशा ठिकाणी त्या विक्रीसाठी पाठिविल्या जात असत. जेणे करून यातुन जनतेला रोजगाराच्या संधी मिळत असत. या धोरणातुन त्या मालाला चांगली किंमतही मिळत असे. यातुन व्यक्तीगत स्वातंत्र्य, स्वाभिमान, व्यक्तीची प्रतिष्ठा, संघटीत कार्य, एकोपा या गोष्टी प्रत्येकाच्या जीवनात निर्माण झाल्या. स्वराज्यातील सैनिकांना रोख व नियमित पगार मिळत होता. पगाराची हमी १००टक्के होती.

रोजगाराच्या संधी- छत्रपतींनी स्वराज्यातील सर्व रयतेला कोणतेना कोणते काम दिले. अश्वदल, पायदल, उंटदल, हत्तीदल, शस्त्रास्त्रे तयार करणे, आरमार, जहाज बांधणी व दुरुस्ती, किल्ले प्रशासन, हेरखाते, प्रशासकीय अधिकारी, आठरा कारखाने, बारा महाल, नविन किल्ले बांधनी, जुन्या किल्ल्यांची दुरूस्ती आदि.

रोजगार हमी योजनेचे जनक



ठिकाणी रोजगाराच्या संधी प्राप्त करून दिल्या. छत्रपतींच्या या धोरणामुळे शत्रू सैन्यातील अनेक सैनिक रोजगाराच्या व पगाराच्या हमी मुळे स्वराज्यातील शाश्वत नोकरीसाठी रूजू झाले.

शस्त्र व्यवसाय-सैनिकी व्यवसायामध्ये शस्त्रास्त्रांना श्रेष्ठ स्थान होते.शस्त्र व्यवसाय हा तेव्हाचा महत्वाचा उद्योग होता.शस्त्रास्त्रांमध्ये प्रगती करून शत्रू सैन्यांवर विजय मिळविले.युद्ध-मोहिमांच्या वेळी वेगवेगळया शस्त्रांचा वापर केला गेला. शस्त्रास्त्रात बदल घडवून आणून छत्रपतींनी फार मोठी क्रांती केली.

उद्योग व व्यापारवृद्धी- छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यापार-उद्योगाला चालना देण्याचे एक तत्व होते ते असे की, शेती प्रमाणेच उद्योग व व्यापा-याला चालना दिली तर राज्याच्या विकासाची गती चौपट होते. पेठेची वसाहत करण्यासाठी सरकारातुन सनद दिली जात असे. त्यातुन छत्रपतींनी स्वराज्याच्या भरभराटीसाठी उद्योग व व्यापाराला चालना दिली. महाराजांचे व्यापारवृद्धीविषयकचे धोरण अज्ञापत्रात स्वतंत्रपणे आलेले आहे. मातोश्री जिजाऊ यांच्या आज्ञेवरून पुण्याजवळील पाषाण येथे एक व्यापारी पेठ वसविली तिच पुढे जिजापूर म्हणुन ओळखली गेली. खेडला जोडून असलेली खेड शिवापूर ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावे वसविलेली पेठ होती. पेठेच्या विकासाची व संरक्षणाची पूर्ण जबाबदारी सरकारची असे. छत्रपती पूर्व कालखंडामध्ये सुध्दा अशा पेठांमधुन व्यापार-उद्योग चालत असे.औरंगाबाद येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे पूर्वज मालोजीराजे, परसोजी राजे, खेलोजी राजे, विठोजी राजे यांच्या नावे प्रामुख्याने मालपुरा, परसपुरा, खेलपुरा, विठापुरा या पेठा होत्या व त्यातुन व्यापार चालत असे. खेड-शिवापूर या ठिकाणी शहाजी राजे यांचे थोरले चिरंजिव संभाजीराजे यांच्या नावे संभापूर-मांडकी पेठ वसविली.

किल्ले बांधणी व दुरूस्ती- गिरीदुर्ग, जलदुर्ग, वनदुर्ग, भुईकोट, जलदुर्ग म्हणजे सागरी किणा-यावरचे किल्ले, बेटांवरचे जंजिरे म्हणजे पाणकोट असे विविध प्रकारचे किल्ले असलेला अवघा महाराष्ट्र हाच किल्ल्यांचे एक संग्रहालय आहे. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याची गाथा सांगत आजही हे किल्ले उभे आहेत. डोंगर कड्यावर वसागरी किणा-यावर किल्ले बांधणे व त्याची व्यवस्था ठेवणे, ते सुसज्ज करणे, ते अधिक बळकट करणे या गोष्टीकडे छत्रपतींनी काटेकोरपणे लक्ष दिले. हे किल्ले बांधणीसाठी मोठ्या प्रमाणात मजुरांची आवश्यकता होती.

शासकीय कर्मचारी-स्वराज्यातील किल्ल्याची उत्तम अशी व्यवस्था होती. किल्ल्यावर वेगवेगळे अधिकारी नियुक्त केलेले होते. किल्ल्यावरील कारभारात ढीलाई केल्यास कडक शासन केले जात असे. गुन्हेगारांना कडेलोटाची शिक्षा दिली जात असे. किल्ल्यावर नियमांची काटेकोरपणे आमलबजावणी होत असे. छत्रपतींच्या नियंत्रणखाली स्वराज्यातील सर्व अधिकारी काम करीत असत. किल्ले व्यवस्थापनातील महत्वाचा अधिकारी म्हणजे हवालदार होय. त्यांचा पराक्रम व शौर्य पाहून त्यांची निवड केली जात असे. हवालदार हा मराठा जातीचा असे.किल्ल्यावरील हवालदारावरशौर्य व संरक्षणाची जवाबदारी असे. किल्ल्यावरील संरक्षणाची संपुर्ण जबाबदारी या अधिका-याची असे.हवालदार हा किल्ल्याचा आत्मा होय. किल्ल्यावरील लष्करी जबाबदारी व नियंत्रण ठेवण्याचे कार्य तसेच किल्ला बंद करणे व उघडणे या गोष्टी स्वतः हवालदार करीत असत.

सबनिस हा ब्राम्हण जातीचा असुन तो किल्याचा अर्थप्रमुख असे. किल्ल्यावरील रोखड तसेच जमा खर्च लिहिण्याचे व त्याचा हिशोभ ठेवण्याचे काम सबनिसाकडे असे. किल्ल्यावरील सैनिकांची हजेरी ते स्वत: घेत असत. कारखानीस हा अधिकारी प्रभू जातीचा असुन किल्ल्यावरील आठरा कारख्यान्याचा प्रमुख अधिकारी असे. किल्यावरील दुरूस्ती व डागडुजी या आधिका-याच्या नियंत्रणाखाली होत असे. किल्ल्यावरील अन्न-धान्य, चारा, पाणी, शस्त्रास्त्रे, दारूगोळा आदिंवर त्यांचे नियंत्रण असे.

(पान ६ वर)

माणूसकीचा दीप उजळू या!

विकास कपोले

दिव्यांची रोषणाई घर उजळवते; पण दुसऱ्याच्या डोळ्यांतील अश्रू पुसले, तरच माणुसकीचा खरा दीप उजळतो!

दरवर्षीप्रमाणे दिवाळी आली आहे. बाजारपेठा रंगीबेरंगी दिव्यांनी सजल्या आहेत. मिठाईच्या दुकानांत गर्दी आहे, कपड्यांच्या दुकानांत खरेदीचा उत्साह आहे, घराघरांत फराळाची लगबग सुरू आहे. आकाशकंदील, पणत्या, रांगोळ्या, फटाके आणि नवीन कपडे यांच्या संगतीने आपण आनंदाचा हा सण साजरा करणार आहोत. आपल्या घरात आनंदाची उधळण होईल, नातेवाइकांच्या भेटीगाठी होतील आणि दिवाळीच्या शुभेच्छांची देवाणघेवाण होईल.

पण या सगळ्या झगमगाटात एक प्रश्न आपण स्वतःला विचारणार आहोत का? आपल्या आनंदाच्या प्रकाशात समाजातील एखाद्या दुःखी माणसाचे आयुष्य उजळविण्याचा प्रयत्न आपण करणार आहोत का?

यंदा आपण एक छोटीशी, पण मनाला मोठा आनंद देणारी कृती करूया. या दिवाळीत आपल्या अन्नदात्या शेतकऱ्यासोबत किंवा आपल्या रोजच्या जीवनात आपल्यासाठी राबणाऱ्या कष्टकरी बांधवांसोबत किमान एक दिवस आनंदाने साजरा करूया!

शेतकरी म्हणजे केवळ शेतात राबणारा माणूस नव्हे; तो आपल्या जीवनाचा आधार आहे. उन्हातान्हात घाम गाळणारा, पावसाची वाट पाहणारा, निसर्गाच्या लहरींशी झुंज देणारा आणि संकटांवर मात करून आपल्या ताटात अन्न आणणारा तो खरा अन्नदाता आहे.

आपल्या ताटातील भाकरी, भात, भाजी, डाळ आणि फळे यांमागे शेतकऱ्याचे असंख्य कष्ट दडलेले असतात. आपण एखादा घास सहज खातो; पण त्या घासासाठी शेतकऱ्याने किती घाम गाळला, किती संकटे सहन केली, याचा विचार किती वेळा करतो?

यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्यामुळे अनेक भागांत पाणीटंचाई, पिकांचे नुकसान आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे . अशा परिस्थितीत शेतकऱ्याच्या घरात दिवाळीचा फराळ तयार होईल का? मुलांसाठी नवीन कपडे घेता येतील का? घरात पणत्या लावतानाही त्याच्या मनात उद्याच्या उदरनिर्वाहाची चिंता असेल, तर त्याच्या दिवाळीतील आनंदाला मर्यादा पडणारच!



शहरात बसून या वेदना कदाचित जाणवत नाहीत. मात्र, शेतीत पिकले तरच आपल्या ताटात येते; शेतकरी सुखी असेल, तरच समाजाच्या समृद्धीला खरा अर्थ प्राप्त होईल.

या दिवाळीत आपण आपल्या कुटुंबासह जवळच्या खेड्यात जाऊया. एखाद्या शेतकरी कुटुंबाला भेटूया. त्यांच्याशी मनमोकळ्या गप्पा मारूया. त्यांच्या सुखदुःखाची विचारपूस करूया. त्यांच्या मुलांना नवीन कपडे, शैक्षणिक साहित्य किंवा त्यांच्या गरजेनुसार एखादी भेट देऊया. त्यांच्यासोबत फराळ करूया, दिवे लावूया आणि आनंदाचे क्षण वाटून घेऊया.

आपल्याला गावाकडे जाणे शक्य नसेल, तर आपल्या घरात काम करणाऱ्या मोलकरणीला, धुणीभांडी करणाऱ्या ताईंना, वाहनचालकाला, सुरक्षारक्षकाला, कपडे इस्त्री करणाऱ्या व्यक्तीला, मुलांच्या शाळेतील वाहनचालकाला किंवा नेहमीच्या भाजीविक्रेत्याला प्रेमाने घरी बोलावूया.

त्यांच्या मुलांना नवीन कपडे देऊया. त्यांना फराळासाठी आग्रह करूया. आपल्या कुटुंबातील सदस्याप्रमाणे त्यांचा सन्मान करूया. त्यांना केवळ मदतीची गरज असलेली व्यक्ती समजू नका; आपल्या सुखसोयींच्या जगाला आधार देणारे सहकारी म्हणून त्यांच्याकडे पाहा.

आपल्या थोड्याशा प्रेमाने त्यांच्या घरात किती मोठा आनंद निर्माण होऊ शकतो, याचा अनुभव एकदा घेऊन पाहा!

आपण कोणाला काही देताना त्याच्या स्वाभिमानाची जपणूक करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. मदत करताना दिखावा नको, प्रसिद्धीची अपेक्षा नको आणि समोरच्या व्यक्तीला कमीपणा वाटेल असे वर्तनही नको. प्रेमाने दिलेली छोटीशी भेटदेखील माणसाच्या मनात आयुष्यभर घर करून राहते.

लक्षात ठेवा, आनंदाची किंमत आपण किती खर्च केला यावर ठरत नाही; तर आपल्या कृतीमुळे दुसऱ्याच्या चेहऱ्यावर किती हसू फुलले, यावर ठरते.

दिवाळीत दिवे हजार लावा; पण एका गरजूच्या आयुष्यात आशेचा एक दिवा लावायला विसरू नका!

यंदाचा संकल्प, माणुसकीच्या दिवाळीचा!

दिवाळी आपल्याला अंधारावर प्रकाशाचा, निराशेवर आशेचा आणि कटुतेवर प्रेमाचा विजय शिकवते. मग या सणाचा खरा अर्थ आपल्या कृतीतून का दाखवू नये?

या वर्षी प्रत्येक कुटुंबाने एक संकल्प करावा-किमान एका शेतकरी कुटुंबासोबत किंवा आपल्या परिसरातील एका कष्टकरी कुटुंबासोबत दिवाळीचा आनंद वाटून घ्यायचा. आपल्या ऐपतीनुसार मदत करायची, त्यांच्या मुलांच्या चेहऱ्यावर हसू फुलवायचे आणि त्यांच्या दुःखात आपणही सहभागी आहोत, याची जाणीव करून द्यायची.

आपण एक दिवस त्यांच्यासोबत घालवला, तर कदाचित त्यांच्या समस्या एका दिवसात सुटणार नाहीत; परंतु त्यांना मिळणारा आपुलकीचा आधार, सन्मान आणि सहवास त्यांच्यासाठी मोलाचा ठरू शकतो.

चला तर मग, यंदा दिवाळीच्या पणत्या आपल्या घरातच नव्हे, तर माणसांच्या मनातही उजळवूया. शेतकऱ्याच्या कष्टांना सलाम करूया. कष्टकरी बांधवांच्या आयुष्यात आनंद फुलवूया. समाजातील श्रीमंत-गरीब, शहर-गाव यांमधील अंतर प्रेमाच्या धाग्यांनी कमी करूया.

कारण दिवाळी म्हणजे केवळ स्वतःच्या घरात आनंद साजरा करणे नव्हे; तर दुसऱ्याच्या घरातही आनंदाची ज्योत प्रज्वलित करणे!

आपल्या ताटातील प्रत्येक घास अन्नदात्याच्या कष्टांची आठवण करून देतो; चला, यंदा त्या अन्नदात्याच्या घरातही आनंदाचा घास पोहोचवूया!

ही दिवाळी केवळ प्रकाशाची नव्हे, तर कृतज्ञतेची ठरो. केवळ संपन्नतेची नव्हे, तर समतेची ठरो. केवळ आपल्या कुटुंबाच्या आनंदाची नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या समाधानाची ठरो. यंदाची दिवाळी अन्नदात्यासोबत साजरी करूया... त्यांच्या डोळ्यांतील अश्रू पुसूया आणि त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलवूया!

कारण शेतकरी केवळ आपला अन्नदाता नाही; तो आपल्या जगण्याचा खरा आधार आहे.

आपलं आयुष्य, आपला आनंद!



काही वर्षांपूर्वी यशाची व्याख्या खूप सोपी होती. चांगला अभ्यास करा. चांगली नोकरी मिळवा. कुटुंब सांभाळा. आणि एक सन्मानाने जगलेलं आयुष्य जगा. पण आज यश या शब्दाला शेकडो नवे अर्थ आले आहेत. कोणी मॅरेथॉन धावत आहे. कोणी आयर्नमॅन स्पर्धा पूर्ण केली आहे. कोणी हिमालयात ट्रेक करत आहे. कोणी स्कायडायव्हिंग करत आहे. कोणी जगभरातील मंदिरं फिरत आहे. कोणी ४५ व्या वर्षी गिटार शिकत आहे. कोणी बालीमध्ये योगा करत आहे. फक्त दहा मिनिटे सोशल मीडिया पाहिला तरी असं वाटू लागतं की सगळे लोक काहीतरी भन्नाट आणि वेगळं आयुष्य जगत आहेत. आणि नकळत आपल्या मनात एक विचार येतो - मी काहीतरी मिस तर करत नाही ना?

कदाचित मलाही जास्त फिरायला हवं मलाही ट्रेक करायला हवा मलाही मॅरेथॉन धावायला हवी मलाही एखादी कला शिकायला हवी मलाही अनेक देश फिरायला हवेत मलाही काहीतरी खास करायला हवं आणि ही यादी वाढतच जाते. हीच आजच्या काळातील बकेट लिस्ट. पण या सगळ्या तुलना आणि धावपळीत एक शांत प्रश्न मनात उभा राहतो - ही सगळी कामं माझ्या आयुष्यात असायलाच हवीत असं कोणी ठरवलं? ;

एकदा माझा एक मित्र म्हणाला होता - मी पहाटे ४ वाजता उठून जंगलात वाघाच्या मागे का धावू? त्याला जंगल सफारीमध्ये काहीच रस नव्हता. पण दुसऱ्या एखाद्यासाठी जंगलात वाघ पाहणं हे आयुष्यातलं मोठं स्वप्न असू शकतं. दोघेही चुकीचे नाहीत. कारण एक महत्त्वाची गोष्ट आपण विसरतो - सगळ्या माणसांना सारख्याच गोष्टी आवडण्यासाठी बनवलेलं नाही. काहींना साहस आवडतं. काहींना ध्यानधारणा. काहींना पर्वत चढणं. तर काहींना समुद्रकिनारी शांत बसणं.

काही लोक वीस देश फिरतात. तर काही जण एका छोट्या गावात आठवडा राहून तिथली माणसं, संस्कृती, जेवण आणि शांतता अनुभवण्यात आनंद मानतात. आणि काही लोक खरंच घरात राहून सर्वात जास्त आनंदी असतात. शांतपणे अनुभवलेला आनंद हा सोशल मीडियावर दाखवलेल्या आनंदापेक्षा कमी मौल्यवान नसतो. ; आपल्या लहानपणी आनंद खूप साधा होता. उन्हाळ्याच्या सुट्टीत नातेवाईकांकडे जाणं म्हणजे मोठा आनंद. टीव्हीवर चित्रपट पाहणं म्हणजे खास दिवस. आईस्क्रीम खायला जाणं म्हणजे आठवणीत राहणारी गोष्ट. लहानसहान गोष्टींमध्येही खूप आनंद असायचा, कारण त्या दुर्मिळ होत्या. पण आज आपल्या जवळ सगळ्याच गोष्टींची भरपूर उपलब्धता आहे.

अमर्याद प्रवास. अमर्याद मनोरंजन. अमर्याद माहिती. अमर्याद अनुभव. आणि गंमत म्हणजे, या अमर्याद पर्यायांमुळेच माणसावर अमर्याद दबाव निर्माण झाला आहे. मानसशास्त्रात याला उहेळलश जींशीश्रेरव म्हणतात. जेव्हा खूप पर्याय असतात, तेव्हा समाधान वाढण्याऐवजी ताण वाढतो. कारण मग माणसाला वाटू लागतं - मला सगळंच अनुभवायला हवं. पण खरं पाहिलं तर कोणताही माणूस सगळं करू शकत नाही. प्रत्येक देश फिरता येत नाही. प्रत्येक कला शिकता येत नाही. प्रत्येक खेळ खेळता येत नाही. प्रत्येक चमत्कार पाहता येत नाही. प्रत्येक आयुष्य जगता येत नाही. आणि कदाचित इथेच एक नवीन विचार महत्त्वाचा ठरतो - -पींळ-ईलज्ञशीं डळींीं ही नकारात्मक गोष्ट नाही. ही आळशीपणा नाही. ही महत्त्वाकांक्षेचा अभाव नाही. उलट ही एक मुक्त करणारी कल्पना आहे. -पींळ-ईलज्ञशीं डळींीं म्हणजे - आपल्या आयुष्यात आनंदी आणि समाधानी राहण्यासाठी कोणत्या गोष्टींची गरज नाही, हे स्वतः ठरवणं. ज्या गोष्टींच्या मागे आपल्याला धावायचंच नाही. ज्या अपेक्षा आपण स्वीकारणार नाही. ज्या तुलना आपण थांबवणार आहोत.

कदाचित तुमची Anti-Bucket List अशी असू शकते -

* मला मॅरेथॉन धावायची गरज नाही.
* मला पन्नास देश फिरायची गरज नाही.
* मला प्रत्येक छंद शिकायची गरज नाही.
* मला मी आनंदी आहे हे जगाला दाखवण्याची गरज नाही.
* मला प्रत्येक अनुभवाचा फोटो किंवा व्हिडिओ बनवायची गरज नाही.

आणि आश्चर्य म्हणजे - मला हे नको आहे असं म्हणण्यात कधी कधी मला हे मिळवायलाच हवं यापेक्षा जास्त शांतता मिळते.

आजच्या आयुष्यात आणखी एक गोष्ट घडते. लोक अनेकदा क्षण जगण्यापेक्षा त्याचे फोटो काढण्यात जास्त व्यस्त होतात. सुंदर निसर्ग मोबाईलच्या स्क्रीनमधून पाहिला जातो. सूर्यास्त कंटेंट बनतो. प्रवास हा पुरावा बनतो. सुट्टी म्हणजे डॉक्युमेंटेशन बनतं. आणि या सगळ्यात खरा अनुभव हरवून जातो. कदाचित आयुष्यातले काही सर्वात सुंदर क्षण असे असतात - जे कधी सोशल मीडियावर टाकले जात नाहीत ज्यांची जाहिरात केली जात नाही ज्यांना कुणाची मान्यता लागत नाही फक्त जगले जातात. फक्त अनुभवले जातात. फक्त आठवणीत राहतात.

कदाचित Anti-Bucket List चा खरा उद्देश इतकाच आहे - आयुष्य कमी करणं नाही तर अनावश्यक दबाव कमी करणं. स्वतःसारखं जगण्यासाठी जागा निर्माण करणं. प्रत्येकाचं आयुष्य जगण्याचा प्रयत्न थांबवून स्वतःचं आयुष्य मनापासून जगणं. कारण शेवटी समाधान हे किती गोष्टी पूर्ण केल्या यावर ठरत नाही तर कोणत्या गोष्टी करण्याची खरंच गरज नव्हती, हे समजण्यात असतं.

मूळ लेखक : डॉक्टर प्रसाद राजहंस यांच्या लेखाचा अनुवाद



डॉ.सौ.प्रज्ञा पुसदकर
मो.९४२३७३३६३०

आनंदी वाटचाल

सुख आणि आत्मशांती



आत्मतृप्ती राहून आत्मक्लेषाचा पूर्ण अभाव असणे म्हणजे आत्मशांती होय. आत्मशांती असता आत्मतृप्ति वाटत असते आणि मनुष्य प्रसाद युक्त प्रसन्न आणि समाधानी असतो .त्यावेळी बुद्धीही साहजिकच प्रसन्न असते. बुद्धी प्रसन्न असल्याशिवाय आत्म्याला शांती लागू शकत नाही. बुद्धी आणि आत्मा हे प्रसन्न असले म्हणजे मोठ्याही शारीरिक या मानसिक दुःखाची बाधा मनाला होऊ शकत नाही. त्यामुळे मनालाही सुख वाटते. बुद्धी आणि आत्मा हे प्रसन्न असता मनाला जे अतिंद्रीय सुख वाटते ते सर्वश्रेष्ठ होय. आत्म्याला क्लेश होत असतात तेंव्हा मनाला सुख होऊ शकत नाही. मनाला सुख वाटण्याकरिता आत्म्याला शांती असावी लागते म्हणूनच म्हटले जाते की शांती शिवाय सुख नाही .

आत्मशांती इतकी प्रिय आणि आत्मक्लेशा इतकी अप्रिय व असह्य गोष्ट जगात दुसरी कोणतीही नाही. प्रत्येक मनुष्याचा प्रयत्न आत्मशांती मिळण्याकरिता चाललेला असतो .आत्म शांती करिता मनुष्य वाटेल त्या गोष्टीचा त्याग करण्यास तयार असतो. आत्मशांती पुढे जगातल्या कोणत्याही गोष्टींची मनुष्याला किंमत वाटत नाही. प्रत्येक मनुष्याचा प्रयत्न सुखाकरता चाललेला असतो. याचा अर्थच प्रत्येकाचा प्रयत्न आत्मशांती करिता चाललेला असतो असाच आहे. सुखही मनाला होणारी भावना असून आत्मशांती मिळाल्याने मनाला सुख आपोआप होते. पण ज्या सुखपभोगामुळे आत्मशांती नष्ट होऊन आत्मक्लेश सहन करावे लागण्याचा संभव असतो ते सुखपभोग विचारी मनुष्याला कधीच आवडत नाहीत .यावरून सर्वांचे वास्तविक ध्येय सुख हे नसून आत्मशांती हे असे हे स्पष्ट होते. स्वर्गात जाण्याची इच्छा सर्वांना का असते? ईश्वर भेटावा असे भक्तांना का वाटते? तर तसे झाल्याने दुःख प्राप्त न होता सुख प्राप्त होते म्हणून . नरकाची भीती मनुष्याला का वाटते? पूर्न जन्माची भीती मनुष्याला का वाटते? कारण या ठिकाणी त्याला दुःखच भोगावे लागते म्हणून. इहलोकी नाही तर मृत्यूनंतर पर लोकात केव्हा ना केव्हातरी शाश्वत आत्मशांती मिळावी म्हणून ऐहिक जीवनातील अनेक सुखपभोग खुशीने सोडण्यास व अनेक दुखे खुशीने सहन करण्यास पुष्कळ लोक तयार असतात. पण वस्तुतः आत्मशांती मिळण्याकरिता हा देह किंवा जग सोडून कोठे जावे लागत नाही. सत्कर्माने याच जन्मी व याच जगात केव्हा ना केव्हा तरी आत्मक्लेष भोगावे लागतात. आत्मशांतीची खरी कल्पना शब्दांनी करून देणे अत्यंत कठीण किंबहुना अशक्य आहे. आत्म्याला दोन अवस्थात शांतीचा लाभ होऊ शकतो. एक संकल्प मग्न अवस्था आणि दुसरी संकल्प शून्य अवस्था.

आत्मशांती असताना मनुष्याला स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव नसते म्हणजे ते आत्मजागृत नसते. त्याला आत्मविस्मृति झालेली असते. जितकी आत्मजागृती कमी व आत्मविस्मृति जास्त त्यामानाने आत्मशांती जास्त पूर्ण असते. मनुष्यमृत्त झाला म्हणले त्याच्या आत्म्याचे संकल्प कायमचेच बंद होतात. त्याची आत्मजागृती कायमची नष्ट होते आणि त्याची आत्मविस्मृति कायम टिकणारी असते. अर्थात मृत्यूमुळेही एक प्रकारची आत्मशांती मिळते असे म्हणण्यास हरकत नाही .म्हणूनच ज्यांना जिवंतपणे कोणत्याही कारणाने आत्मकलेश होऊ लागतात ते आत्मशांती मिळवण्याकरिता आत्महत्या करतात. पण मृत्यूच्याद्वारे आत्मशांती मिळवणे हे सामान्यतः दुर्बलाचे काम असते. कोणताही विचारी बलवान मनुष्य मृत्यूने मिळणारी आत्मशांती इष्ट समजत नाही. मृत्यूमुळे मिळणारी आत्म शांती आत्मक्लेश बंद करणारी असली तरी तिचा अशी ऐहिक व्यवहाराच्या दृष्टीने काहीच उपयोग नसतो. सामान्य मनुष्याच्या दृष्टीने संकल्प शून्य अवस्थेतील आत्मशांती फक्त गाढ झोपेतच होऊ शकते .संकल्प मग्न अवस्थेतील आत्मशांती दीर्घकाळपर्यंत टिकू शकते आणि तिचा अनुभव कोणालाही घेता येतो. अशीआत्मशांती केव्हा आणि कशी मिळू शकते तर मनुष्य कोणत्याही कर्मात पूर्णपणे मंग्न असतो त्यावेळी व मग्न असतो तोपर्यंत आत्म्याला स्वतः संकल्प करावे लागतात आत्म्याचे संकल्प होत राहिल्याशिवाय क्रिया होऊ शकत नाही. त्यामुळे क्रिया चालू असले पर्यंत आत्मा संकल्प मग्न असतो अशावेळी आत्मशांतीचा अनुभव येतो .

परमेश्वराचे भजन पूजन कीर्तन नामस्मरण जप तप इत्यादी धार्मिक कर्मे पूर्ण श्रद्धेने करीत असता व त्यात तन्मय होऊन जातात त्यांना ते त्या कर्मात पूर्ण गढलेले असतात तोपर्यंत आत्मशांतीचा लाभ होतो असा अनुभव अनेकांना येतो धार्मिक म्हणून समजल्या जाणाऱ्या कर्मा शिवाय इतर कर्मात तन्मय होऊन जाणार नाही. वरील प्रमाणेच आत्मशांतीचा अनुभव घेत आत्मशांती कायम असेपर्यंत मनुष्याला आत्मजागृती नसते त्याला आत्मविस्मृति होते किंबहुना मनुष्याची आत्मजागृती नष्ट होऊन आत्मविस्मृति झाल्याशिवाय त्याला आत्मशांतीचा खरा लाभही होऊ शकत नाही म्हणूनच आत्मशांती आणि आत्मविस्मृती या दोन्ही अवस्था एकच असतात असे म्हणता येईल.

कोणत्याही कर्मात पूर्णपणे मग्न असता आत्मशांती मिळते पण दुष्कर्मान मग्न राहिल्याने मिळणारी आत्मशांती तात्पुरती असून कायम टिकणारी नसते. दुष्कर्मामुळे पुढे मागे शारीरिक किंवा मानसिक दुखे अनिच्छेने भोगण्याचा प्रसंग येतो आणि आत्मक्लेष होतात अर्थात आत्मशांती नष्ट होते. मनुष्य सदैव सत्कर्मात मग राहील तरच त्याला अखंड आत्मशांती मिळू शकते आत्मशांती करिता सात महत्त्वाच्या गोष्टी आवश्यक असतात एक ध्यान योग दोन युक्त आहार आणि विहार तीन भावना शुद्धी चार बुद्धी योग पाच ज्ञानयोग सहा आत्मविजय आणि सात कर्मयोग या सात पायऱ्या आत्मशांतीकडे नेणाऱ्या आहेत या सातही गोष्टी परस्परावलंबी आणि परस्परपूर पूरक असतात आणि मनुष्याने त्या साधनाची यथा योग्य काळजी घेतली म्हणजे त्याचा सर्वांगीण विकास योग्य प्रकारे होऊन त्याला अखंड आत्मशांतीचा लाभ आपोआप होतो पण त्यापैकी कोणत्याही गोष्टीकडे दुर्लक्ष केल्यास या गोष्टी ज्या गोष्टी त जितकी कमतरता राहील त्यामानाने आत्मशांती अपूर्ण असते म्हणून पूर्ण आत्मशांती करिता यांची पूर्तता करणे योग्य ठरते.



डॉ.यशवंत सुरोशे
मो.८३८०८६२२१२

उमलत्या कळ्या

सोनू



नेहाची मैत्रीण तिच्या प्रोजेक्टच्या माहितीसाठी तिच्या गावाला जाणार होती. तिने 'ग्रामीण भागातील सण-उत्सवांची परंपरा' हा विषय निवडला होता. तिला नेहाकडून मदतीची अपेक्षा होती, जेणेकरून तिला तिच्या प्रकल्पामध्ये प्रभावी मांडणी करता येई. म्हणून गीताने नेहाला म्हटले, नेहा, तुझ्या गावी कोणकोणते सण विशेषत्वाने साजरे करतात याची माहिती तू मला देशील का?

अगं, अशी माहिती तर माझे वडील घरात बसूनही देतील आपल्याला. पण मला वाटतं की, आपण आपल्या डोळ्यांनी पाहून या सणांचा मागोवा घ्यायला हवा. काय वाटतं तुला?

पण प्रत्येक ठिकाणी जाणं मला शक्य नाही होणार! शिवाय वेळेची मर्यादा आहेच की! मला माहित आहे ते. येत्या दसऱ्याला मी गावी जायचं ठरवतेय. काहीतरी विचार करू या आपण. तू मला नक्की मदत करशील.

मलाही थोडं शिकायला मिळेल.

गीताशी झालेला संवाद मनात ठेवून नेहा घरी परतली. पुढच्याच आठवड्यात दसरा होता. रविवारच्या सुट्टीला जोडून दसरा आला होता. शनिवारी कॉलेजला न जाता थेट पॅसेंजरने गावी जायचं. दोन दिवस काका-काकूंकडे रहायचं. गावातली सणाची परंपरा बघायची. काही फोटो काढायचे. चुलत आजोबांशी जुन्या काळाविषयी गप्पा मारायच्या. सणाच्या परंपरा जाणून घ्यायच्या नि मंगळवारी पॅसेंजरने परतायचं असं तिने मनोमन ठरवले.

मात्र घरापर्यंत पोहचल्यावर तिला एका वास्तवाची जाणीव झाली. गावी राहत असलेल्या मोठ्या काका- काकूंसोबत जवळजवळ संवाद थांबलाच होता. घराच्या वाटणीवरून दोघा भावांमधले संबंध तुटेपर्यंत ताणले गेले होते. मोठे काका इकडे कधी शहरात आले तरी खोलीवर आलेले तिला आठवत नाहीत. लहानपणी मात्र ती गावी गेल्यानंतर सुट्टीच्या दिवसांत तेथे थांबल्याचे, हुरडा पार्टी केल्याचे तिला चांगलच आठवतंय. नुसत्या आठवणीने तिला बरे वाटले. तिने आणखी आठवून पाहिले तर तिला नवल वाटले की मम्मी-पप्पा बोलतात, त्याप्रमाणे काका-काकू आपल्याशी कधी वावगे वागलेले नाहीत. खरंतर काका-काकू आपले किती लाड करायचे, किती जपायचे आपल्याला!

ती थोडीशी साशंक मनाने घरात शिरली. मम्मी-पप्पा आपल्याला गावी जाण्यास परवानगी देतील का, याबाबत तिला शंका होती. मात्र खोटे सांगून आपण त्यांना फसवायचं नाही, हे मात्र नेहाने आधीच ठरवलं होतं.

दुपारी तिने विषय काढलाच नाही. संध्याकाळी मम्मीला चहा करून देताना तिने सहज सुरूवात केली. मम्मी, मी प्रोजेक्टच्या कामासाठी आपल्या गावी जाण्याचं ठरवंलय. दोन दिवस राहीन आणि येईन परत. नेहा चहाच्या पातेल्यात साखर टाकता टाकता म्हणाली. कोण-कोण आहे सोबत? आणि राहणार कुठे? मम्मीचा कॉमन प्रश्न. अगं मी एकटीच जाणार आहे आणि कुठे राहणार म्हणजे काय आपल्या घरीच थांबणार. नेहाने मम्मीकडे तोंड करत सांगितले. बाई गं! कशाला नको त्या विषयाला तोंड फोडतेस? हवं तर दुसरीकडे जा मैत्रिणींसोबत. मम्मीने नकाराची सुरूवात केली होती. मम्मी, मी काही फिरण्यासाठी गावी चाललेली नाही. 'गावातील परंपरांचा अभ्यास' हा विषय घेऊन तिथे चाललेय. इतर मैत्रिणीही त्यांच्या-त्यांच्या गावाला चालल्या आहेत. मला समजतंय तुझ्या प्रोजेक्टचं काम आहे ते. मात्र तुझ्या पप्पांना नाही आवडणार तिथं राहिलेलं.

मम्मी, कदाचित पप्पांच्या मनातील राग निवळला असेल. मात्र प्रत्यक्षात माघार घ्यायला त्यांचं मन धजावत नसेल. मी गेले तर काका-काकूंसोबत मला राहता येईल. ते ही आपलेच आहेत ना! तू म्हणतेस ते बरोबर आहे. अति राग नि भीक माग. बाई तूच तुझ्या पप्पांना विचार! मला तर काही सुचत नाही.

नेहाने अर्धी लढाई जिंकली होती. रात्री आठ वाजता जेवण उरकल्यावर नेहाने गावी जाण्याचे तिच्या वडिलांच्या कानावर घातले. क्षणभर ते गप्प राहिले. नंतर विचार करून म्हणाले, दुसऱ्या अनोळखी गावाला जाण्यापेक्षा आपल्या गावीच जा. काका-काकूंशी प्रेमाने वाग. आमच्या मोठ्या माणसांच्या भांडणाचा विचार करून तू वागू नकोस. जातांना काहीतरी खाऊ घेऊन जा. नेहाची मम्मी तर त्यांचे बोलणे ऐकतच राहिली.

नेहा शनिवारी सकाळीच स्टेशनवर पोहचली. तेव्हा पॅसेंजर प्लॅटफॉर्मला लागलेलीच होती. हातातलं तिकीट पर्समध्ये ठेवून ती गाडीत बसली. प्रवास करतांना ती आजुबाजूचा परिसर न्याहाळत होती. लहानपणी केलेला प्रवास आठवत होती. बरेचशे चाकरमानी आपल्या गावी सणासाठी निघाले होते. त्यांच्याशी तिने गप्पा मारल्या. बरीच माहिती मिळवली. तिच्या गावाजवळचं स्टेशन आलं, तेव्हा दुपारचे तीन वाजले होते. रिक्षा करून ती थेट आपल्या गावातील घरी गेली. काका-काकू अंगणातच होते. काकू परसात लावलेल्या झेंडूची फुले तोडून घरात निघाली होती. तोच काकांनी आवाज दिला, अगं सुमन, कोण आलंय बघ. आपली नेहा किती उंच झालीय बघ. बाई खरंच ना! किती छान दिसतेस गं! केस अगदी माझ्यासारखेच लांब झालेत तुझे! चल घरात. काका-काकूंच्या या गोड बोलण्याने नेहाचे स्वागत झाले. काकीने तिच्यासाठी पोहे बनवले. काकांनी तिला लेखन करण्यासाठी अंगणातील टेबल खोलीत आणून ठेवला.

काकू, मधुरा किती वाजता येईल? आणि माधव कुठे गेलाय? नेहाने विचारले. मधुराचा क्लास पाच वाजता सुटतो. येईल ती एवढ्यात. तुला बघून तिला खूप आनंद होईल. आणि माधव बाजारात गेलाय. दूध आणि थोडं सामान आणायला गेलाय. त्याचंही यंदा शेवटचं वर्ष आहे. म्हणतोय, शिक्षण बस्स, कुठेतरी नोकरी धरणार आहे म्हणे. काकू सलग बोलत होती. आम्ही तुमची नेहमी आठवण काढतो. मम्मी तर प्रत्येक काम करताना इथल्या घरातली आठवण काढतेच. घरी असं आहे. घरी तसं आहे. मम्मी-पप्पा नेहमी म्हणतात, फार दिवस झाले पोरांना पाहिले नाही. नेहा विचारपूर्वक बोलत होती. ती काका-काकूंचे चेहरे न्याहाळत होती. थोड्या वेळात मधुरा आली. दोघींच्या गप्पा रंगत गेल्या. मग माधवही आला. सर्वांना नेहाने खाऊ वाटला. रात्री अंगणात बसून सर्वांनी गप्पा मारल्या.

पुढच्या दिवशी नेहाच्या काकांनी तिला गावातल्या कुलस्वामीच्या मंदिरात नेले. गावातील सर्वात जुन्या हनुमान मंदिरात नेले. गावच्या सीमा आणि दसऱ्याच्या दिवशी करावयाच्या सीमोल्लंघनाविषयी माहिती सांगितली. गावातल्या सर्वात जेष्ठ साळगावकर आजोबा यांच्याशी नेहाची भेट घालून दिली. साळगावकर आजोबांनी गावातील जत्रेपासून ते निघणाऱ्या देवीच्या पालखीपर्यंत इत्यंभूत माहिती दिली. माधव आणि मधुरासोबत जाऊन तिने काही जुने दुर्मिळ फोटो मिळवले. त्या रात्री नेहाने मिळवलेल्या माहिती व दुर्मिळ छायाचित्रांच्या साहाय्याने एक विस्तृत टिपण लिहिले. काका-काकू तिचे कौतुक करीत माधव-मधुराला तिच्याप्रमाणे शिकण्याचा, अभ्यास करण्याचा सल्ला देत होते.

दसऱ्याच्या दिवशी गावातील थोरामोठ्यांना भेटण्यासाठी, त्यांचे दर्शन घेण्यासाठी नेहा, माधव व मधुरा सोबत गेले. गावातील सर्वांनी नेहाच्या आई-वडिलांची खुशाली विचारली. पांडुनाना म्हणाले, पोरी, तू आलीस हे खूप चांगलं केलंस. दोन भावांना जोडणारी सांकव झालीस. कोणीतरी असं पाऊल टाकणं गरजेचं होतं. भूतकाळातल्या कडू आठवणी विसरण्यासाठीच सण असतात. पांडुनानांचे बोलणे ऐकून नेहाला सणाची आणखी एक व्याख्या माहित झाली. मंगळवारी पुन्हा माघारी जातांना काकुने कितीतरी जिनसा नेहा सोबत दिल्या. भूईमुगाच्या खारवलेल्या शेगा, कुळीथाचे पीठ, सांडगे, हिरव्या मिरच्या, थोडी राळी, डागरांची खीर... हे सर्व पाहून नेहा म्हणाली, आणखी काही दयायचं असेल तर ते तुम्हीच घेऊन या. आणि हो मधुरा आणि माधवला दिवाळीच्या सुट्टीत नक्की पाठवा. नाहीतर मीच त्यांना न्यायला येईन. काका-काकूंच्या चेहऱ्यावर समाधान झळकल्याचे नेहाला जाणवले.

रिक्षा गावाबाहेर पडेपर्यंत चौघेही नेहाला निरोप देण्यासाठी रस्त्यापर्यंत आले होते. घरी पोहचल्यावर मम्मी पप्पांना काय-काय नि कसं-कसं सांगायचं, हे तर नेहाच्या मनात होतंच. शिवाय आपलं गावी जाणं हे दोन घरांना जोडणारं निमित्त झालं, याचा तिला विलक्षण आनंद झाला होता. त्या आनंदातच ती परतीच्या पॅसेंजरमध्ये बसली.

इच्छामरण

भगवंताने कर्मस्वातंत्र्य माणसाला दिले. पण जीवन आणि मृत्यू मात्र त्याच्या हातात ठेवले आहेत. आपल्या इच्छेनुसार जन्म नाही आणि मृत्यूदेखील नाही. इच्छेनुसार मृत्यूचे सौभाग्य केवळ भीष्म पितामह यांना लाभले. आणि असे सौभाग्य आपल्यालाही मिळावे, असे आयुष्याचा उत्तरार्ध जगणाऱ्या बहुतांश वृद्ध मंडळींना वाटत असते. मित्रांनो, आपले कुटुंब, मुले, सुना, नातवंडे, असा समृद्ध परिवार-या सर्वांसोबत जीवन व्यतीत करणे अतिशय सुखद वाटते. आजी-आजोबा दोघेही एकमेकांची काळजी घेत, एकमेकांना आधार देत या प्रपंचाचा प्रवास करत असतात. पण अचानक या प्रवासातील एक प्रवासी जर सोडून गेला, तर मात्र हा एकाकी प्रवास फार जीवघेणा वाटतो. उर्वरित आयुष्य पराधीनपणे जगावे लागते.



आपण बऱ्याचदा ऐकतो की, म्हातारपण आणि बालपण सारखेच असते. पण खरेच असे असते का?

घरातील लहान मूल आणि वृद्ध व्यक्ती यांच्या स्वभाववैशिष्ट्यांमध्ये काही प्रमाणात साम्य असते. हट्टीपणा करणे, ऐकून न घेणे, विनाकारण चिडचिड करणे असे काही गुण दोघांमध्येही मिळते-जुळते असतात. पण घरातील व्यक्ती या दोघांनाही मात्र भिन्न प्रकारे हाताळतात.

लहान मुलाचे हट्ट कौतुकाने पुरवले जातात; मात्र वृद्ध व्यक्तीला आमचेच ऐका असा दबाव आणला जातो.

आणि जरी ही व्यक्ती पुरुष असेल, तर गोष्ट आणखीनच कठीण होते. कारण मनातील एखादी गोष्ट मोकळेपणाने सांगता येईल, अशी हक्काची व्यक्ती म्हणजे पत्नीही आधीच सोडून गेलेली असते. प्रत्येक गोष्टीसाठी परावलंबी जीवन जगावे लागते.

सून, मुलगा, नातवंडे नेहमीच समजून घेतात असे नाही. तर बऱ्याचदा त्यांच्या नजरेत दिसणारा राग, तिरस्कारही सहन करावा लागतो. आम्ही नाईलाजाने तुमचा सांभाळ करत आहोत, ही भावना त्यांच्या वागणुकीतून स्पष्टपणे जाणवत असते.

दिपश्री पाचपुते
मो.८०८७७ ३६५८३

आणि मग आयुष्यभर मोठ्या स्वाभिमानाने, सन्मानाने जीवन जगलेला हा माणूस घरात मात्र शरीराने आणि मनाने पूर्णपणे झुकलेला असतो.

कळत-नकळत सर्वच बंधने येतात. खरं तर जीवनाचा हा टप्पा असा असतो की, अनुभवांचा साठा प्रचंड असतो. मानवाचे मन असे आहे की, घडून गेलेले सुखाचे दिवस कमी, मात्र दुःखाचे दिवस जास्त आठवतात.

आणि मग अशाच वेळी आपुलकीची, जवळची, प्रेमाची एखादी व्यक्ती भेटायला आली, तर किती सांगू आणि किती नाही, असे वाटते. पण यावरदेखील बंधने असतात. जास्त बोलायचे नाही, कोणतीही इच्छा व्यक्त करायची नाही, जे दिले जाईल ते मुकाट्याने खायचे आणि शांत राहायचे.

जीवनाचा हा प्रवास मग काही वेळेला इतका असह्य वाटू लागतो की, आपोआपच मनातून शब्द बाहेर येतात-

देवा, असे जगण्यापेक्षा तू मरण का देत नाहीस?

हे सर्वच खरं तर अतिशय क्लेशदायक असते.

काही वृद्ध व्यक्तींना तर वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवला जातो आणि काहींना केवळ संपत्ती आपल्याला मिळावी या लोभाने सांभाळले जाते. अर्थात, घरातील तरुण मंडळींनाही क्षणभर याची जाणीव होते की, आपण चुकीचे वागतोय. पण बऱ्याचदा कळते पण वळत नाही.

आणि ज्यावेळी आई किंवा वडील आपल्यातून निघून जातात, त्यावेळी मात्र याचा पश्चात्ताप होतो; पण तेव्हा वेळ निघून गेलेली असते.

परंतु हेच चित्र सर्वत्र आहे असे नाही. अजूनही काही कुटुंबांमध्ये आई-वडिलांची खूप प्रेमाने सेवा केली जाते. त्यांची चांगल्या प्रकारे काळजी घेतली जाते, त्यांच्या इच्छा पूर्ण केल्या जातात आणि या सेवेचे यथोचित फळदेखील त्यांना मिळते.

आपणदेखील हे ध्यानात ठेवायला हवे की, काही काळानंतर त्यांच्या जागी आपण येणार आहोत. आपणही वृद्ध होणार आहोत.

आणि असंही या वृद्ध मंडळींना आपल्याकडून अपेक्षा तरी काय असते? थकलेले शरीर, थरथरणारे हात आणि प्रेमासाठी आसुसलेले डोळे फक्त तुमच्या शाब्दिक आधाराची अपेक्षा करतात. प्रेमाने हाक मारण्याची वाट पाहतात.

आणि हे प्रेम जर त्यांना भरभरून मिळाले, तर कोणतीही वृद्ध व्यक्ती इच्छामरणाची कामना करणार नाही.

मैत्र जीवांचे...



पुण्यात घडलेली सत्य घटना.... सुमारे ७-८ महिन्यांपूर्वी एका मुलाने इयत्ता ४ थी मधे असतांना शाळेतल्या त्याच्या वर्गातील मुला-मुलींचा ग्रुप फोटो फेसबुकवर टाकला आणि आवाहन केलं की 'ह्यात जे जे कोण आहेत त्यांनी संपर्क करा'. एक महिन्यात सुमारे ३०-३५ मित्र-मैत्रिणी ४० वर्षांनी पहिल्यांदा कनेक्ट झाले. पुढे व्हॉट्स अपवर ग्रुप झाला. सगळ्यांचे स्मार्ट फोन दिवसभर किणकीणायला किंवा खणखणायला लागले. मग हा कुठे आहे? ती कुठे असते? अशी शोधाशोध पण होत राहिली.

हळूहळू बालपणीचा वर्ग स्मार्ट फोनवर 'भरायला' लागला. नंतर त्यांचं एक गेट टुगेदर पण झालं. बालपणीच्या वर्ग मैत्रिणी नव्या रुपात भेटल्यानी आणि आता पुढेही भेटत राहतील ह्या कल्पनेनी मुलं जास्त एक्सायटेड होती...

एकदा ग्रुपवर कोणीतरी विचारलं, हल्ली मीना कुठे असते? दुसऱ्या दिवशी रीस्पोंस आला मीना तिच्या घरीच बेड रिडन आहे. पाच वर्षानपूर्वी अर्धांगवायूच्या झटक्यामुळे विकल होऊन पडलीय. तिला चालता पण येत नाही. नवरा आणि दोन मुलं हेच तिचं सर्व काही करत आहेत.

ग्रुपला शॉक आणि मग सन्नाटा.. मग चार-पाच मित्र मैत्रीणीत पर्सनल मेसेजेसची देवाण घेवाण झाली. ग्रुपवर मेसेज आला की, आपण मीनाला भेटायला जाऊया. सगळ्यांनी जाणं व्यवहार्य नव्हतं, म्हणून मग मीनाशी फोनवर आगाऊ वेळ ठरवून १०-१२ मित्र-मैत्रिणी तिच्या घरी गेले. तिच्या छोट्या घरात गेल्यावर आपली ही बाल मैत्रीण अशी अंथरुणाला खिळलेली पाहून बराच वेळ सगळे निशब्द होते..... पण हीच कोंडी फोडायची होती !! एकेकांनी तिच्याशी संवाद सुरु केला. तिची चौकशी केली.... अंथरुणावर पडून राहिलेली मीना भरभरून बोलत होती..... तिचा चेहरा, तिचे डोळे....सगळंच बोलत होतं....मैत्रिणींनी तिचा हात हातात घेतल्यावर मात्र मीनाचा बांध फुटला..... ते आनंदाश्रू होते? का तिला उठून बसता येत नाहीये ह्याचं दुःख होतं? हे काही कळत नव्हतं. सगळ्यांचेच डोळे भरून आले. ह्या मित्र-मैत्रिणींचा तिच्याशी संवाद चालू असताना तिच्या नवऱ्यानी आणि मुलांनी खाण्या पिण्याची व्यवस्था केली. ते पाहून सगळ्यांना कौतुक वाटणं आणि गहिवरून येणं हे एकदमच झालं. 'कोणी मदतीला नसतांना कसं करत असतील हे सगळे इतकी वर्ष? आणि मीनाचं काय?' हे भाव सर्वजण लपवायचा प्रयत्न करत होते.

मित्र- मैत्रिणी परत जाताना मीनाला सांगून गेले की ह्यातून तिला बाहेर पडायला हवं. त्यांपैकी कोणी न कोणीतरी तिला दर आठवड्यात येउन भेटून जातील, तिच्याशी बोलतील आणि तिला अंथरूणमुक्त व्हायला मदत करतील. त्या दिवसानंतरची बदललेली मीना ही नवऱ्यानी आणि मुलांनी पाच वर्षांनंतर पहिल्यांदा पहिली होती. तिच्या मनाने आता उभारी घ्यायला सुरुवात केली. 'आता ह्यातून बाहेर पडायला पाहिजे' असं तिला 'आतून' वाटायला लागलं होतं. ह्यात तिला साथ द्यायला तिचं 'मैत्र' होतं !! दिलेल्या शब्दाला जागून मित्र मैत्रिणी दर आठवड्याला तिला भेटत राहिले. तिचा आत्मविश्वास दुणावला. दोन महिने झालेत, ती आता घरातल्या घरात चालायला लागलीय. पंधरा दिवसांपूर्वी मीनानी आपणहून एका मैत्रिणीला फोन करून सांगितलंय की तुझ्या नविन गाडीतून मला चक्कर मारून आण. मीनाच्या बरोबर गाडीतून सोबतीला कोणी कोणी जायचं ह्यावरून ग्रुपवर प्रेमळ भांडणं सुरु झालीयत.

..मैत्र जीवांचे, तसे पण !! अशा मैत्री मुळे मिनाचा आत्मविश्वास वाढला आणि तिच्या आयुष्याला एक नवीन अर्थ मिळाला. तर आपणही असा एखाद्याचा गमावलेला आत्मविश्वास अशा पद्धतीने देऊ शकलो तर एक चांगले काम केल्याचे समाधान मिळेल असे मला वाटते.



सबके दिल में अंबर है,...

अंबरसिंग महाराजांची श्रमिक चळवळ



अंबर दादा उर्फ अंबरसिंग महाराज १९६०-७५ च्या काळातील सातपुडा तापी परिसरातील श्रमिक कष्टकरी चळवळीच्या या लढवय्या नेतृत्वाने शहादा-सातपुडा तापी परिसरातील मालदार, जमीनदार, सेठ, सावकार अधिकारी, राजकीय मक्तेदार यांच्या वाढत्या अन्याय अत्याचाराविरुद्ध आवाज उठून माणसाला माणूस म्हणून उभे केले. आपल्या हक्क -अधिकार , अस्तित्व,अस्मिता व आत्मसन्मानासाठी लढायला संघर्ष करायला शिकविले. दीन-दलित कष्टकरी श्रमिकांसाठी त्यांनी संपूर्ण आयुष्य संघर्ष करीत घालवले. त्याकाळी राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चेच्या केंद्रस्थानी राहिलेल्या श्रमिकांच्या या लढाऊ क्रांतिकारी नेत्याच्या कार्यकर्तृत्वावर स्थानिक इतिहासकार व साहित्यिकांनी मात्र पाहिजे त्या प्रमाणात लिहिले नाही. दीन-दलित,कष्टकरी श्रमिकांचे लढवय्ये नेतृत्व अंबर दादा उर्फ अंबरसिंग महाराज यांच्या जीवन कार्यावर दृष्टिक्षेप टाकण्याचा छोटासा प्रयत्न...

शहाद्याच्या टेक भिलाटीत एक झोपडी बांधून कार्यालय सुरू करत आदिवासी भिल्ल सेवा मंडळाचे कार्य अंबरसिंग महाराज यांनी सुरू केले.ते धडगावहून येऊन-जाऊन काम करू लागले. साधारण इ.स.१९७०-७१ चे वर्ष असेल... त्यांनी नुकतीच कामाला सुरुवात केली होती.त्यावेळी सातपुडा तापी परिसरात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. आदिवासी परिसरात शहादा-धडगांव रस्त्यावर सधन शेतकऱ्यांची वसाहत आहे. तिला पाटीलवाडी नावाने ओळखले जात होते.

त्याकाळात अतिशय दुष्काळी परिस्थिती असल्याने लोकांना खायला अन्न मिळत नव्हते . दुष्काळाची भीषणता इतकी की, सातपुड्यातील आदिवासी भूकमारीने मरू लागले. खायला अन्न मिळत नसल्याने भूकेने व्याकुळ होत कंद, झाडपाला खावुन पोटाला शमवत होते. त्याकाळी सातपुडा परिसरातील विश्राम हरी पाटील हे अमेरिकेतून कृषी क्षेत्रांतील विद्यावाचस्पती (पीएच.डी) ही उच्च शिक्षणातली पदवी घेऊन आले होते.भारत सरकारने त्यांना कृषी विषयक संशोधनासाठी धडगाव रस्त्यावर आताच्या पाटीलवाडी म्हणून ओळख असलेल्या गाव परिसरात पाचशे एकर जमीन दिली होती. १ मे १९७१ रोजी आसपासच्या गावातील काही आदिवासींनी त्यांच्या पाटीलवाडी येथील बंगल्यावर ' सुगीवर दुप्पटीने देवू ' म्हणून चार-चार पायली धान्य मांगितले. त्यांनी धान्य देण्याचे मान्य केले. त्यानुसार दुसऱ्या दिवशी आदिवासी ठरल्याप्रमाणे धान्य घ्यायला गेलेल्या सर्वांना दोन-दोन पायली धान्य दिले. मात्र आदिवासी धान्य घेवून जात असतांना आदिवासींनी धान्याचे गोदाम लुटण्याचे खोटे आरोप लावून पोलिसांकडे तक्रार केली. अनेकांना पोलीसांनी अडवले. त्यानंतर म्हसावद गावाच्या फाट्यावर धान्य घेऊन जाणाऱ्या काही आदिवासींना प्रस्थापितांनी पकडून बेदम मारहाण करत गोळीबार करण्यात आला. त्यात लक्कडकोट येथील सुरत्या जतन्या भील यांची गोळी घालून हत्या करण्यात येऊन त्याचे शव नदीत पुरुन दिले. ही बातमी आदिवासी पाड्यांमध्ये वाऱ्यासारखी पसरली. आदिवासी देखील आपले तीर कामठे, दगड, गोफन घेवून आले. गणपत पौलाद, मंगा ठाकरे, अशा आदिवासींच्या नेतृत्वाने दिवसभर दोघात घमासान सुरु होते. अंबरसिंग महाराज त्यावेळी धडगावला होते. ते दुसऱ्या दिवशी आले, सुरत्या भीलचे प्रेत नदीतून उकरून काढण्यात आले. त्यावेळी आदिवासींच्या शंभरावर लोकांना अटक करण्यात आली. जीवे मारण्याची धमकी ,डाका,लूटपाट करणे, असे अनेक आरोप त्यांच्यावर लावण्यात आले. तेव्हा अंबरसिंग महाराज यांनी महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांना 'सातपुडा साद घालत आहे' म्हणून आव्हान केले. तेव्हा कुमार शिराडकर, दीनानाथ मनोहर, प्रकाश सामंत, विजय कान्हेरे, सुधीर बेडेकर, छाया दातार माणूस सम्पादक माजगावकर, लिमये, अच्युत गोडबोले, विक्रम कान्हेरे अशी कितितरी कार्यकर्त्यांची टिम पुणे, मुंबईहून, काही बाबा आमटेंच्या आश्रमातून आले. सोबत स्थानिक कार्यकर्ते कॉम्रेड वाहरु सोनवणे, शब्बीर दला, जयसिंग माळी, चंद्रसिंग बर्डे, पानसिंग पावरा, भुरि बाई, ठगीबाई, हिरकनाबाई, विमल बाई तसेच अनेक महिला वर्ग मुस्लिम बांधव अशी अनेक लोकं एकत्रित येवून काम करू लागले. कवी कॉम्रेड वाहरू सोनवणे यांनी व त्यांच्या समूहाने अंगावर शहारे आणणाऱ्या या प्रसंगावर आधारित आदिवासी भाषेतील काव्य रचली- गायली. टाइम्स ऑफ इंडिया, आपला महाराष्ट्र, देशदूत, साधना साप्ताहिक सारख्या राष्ट्रीय ,राज्यस्तरीय व स्थानिक वृत्तपत्रांनी सातपुडा चळवळीची दखल घेत सत्य समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न केला. साधारण याच काळात वडिलांची बदली म्हसावद येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत झाल्याने आम्ही म्हसावद येथे परिवारासह राहायला गेलो. तेव्हा मी वयाने अतिशय लहान होतो, परंतु म्हसावद परिसरातील त्या घटनेचे प्रत्यक्षदर्शी वयोवृद्ध नागरिक त्या घटनेची चर्चा करत असत व आजही करतात त्यातून त्या प्रसंगाची वस्तुस्थिती कळत होती.

अंबरसिंग महाराजांच्या नेतृत्वाखाली ३० जानेवारी १९७२ रोजी भुमुक्ती मेळावा शहाद्याच्या टेक भिलाटीत, नदीकाठी आयोजित करण्यात आला. या मेळाव्यात दत्ता देशमुख, लखन भतवाल, बा. न. राजहंस, ठाकुरदास भंग, पन्नालाल सुराणा, सिव्हिल सर्व्हस इंटरनेशनलचे प्रमुख, वसंतराव बोंबटकर, आबा करमरकर, सुधीर बिडेकर, तसेच लिमये, बिडवाई आणि पुण्या मुंबईतून अनेक नेते कार्यकर्ते आले. अंबरसिंग महाराजांनी या मेळाव्यात सातबारा उताऱ्यावर मुळ मालक म्हणून ज्या आदिवासीचे नाव असेल, तर त्यांनी उद्याच जावुन आपल्या जमिनी ताब्यात घ्या' असे आव्हान केले. ही बातमी वाऱ्यासारखी खेड्यापाड्यावर पसरली. आवाहनाप्रमाणे आदिवासींनी हजारो एकर जमीनी आपल्या ताब्यात घेतल्या. दबलेल्या लोकांचा आत्मविश्वास जागा झाला. योग्य दरात मजुरी, कामाचे तास, मागेल त्याला काम, आरोग्य, शिक्षण, असे अनेक प्रस्ताव अंबरसिंग महाराजांच्या चळवळीने पुढे आणले. लोकं पुढे येवून आपले हक्क मिळवू लागले. हा आदिवासींच्या जमिनी बळकवणाऱ्यांसाठी मोठा हादरा होता. या चळवळीचा परिणाम म्हणून राज्यस्तरावर किमान वेतन कायदा सरकारला करावा लागला. शेमजूरांना किमान वेतन मिळू लागले सर्व कार्यकर्त्यांनी मिळून कार्यक्रम ठरवावा,इतरांनी त्यात हस्तक्षेप करू नये, कार्यकर्त्यांनी कोणत्याही राजकीय पक्षाशी स्वतःला बांधून घेऊ नये , संघटित शक्ती उभी करतांना हिंसेचा पुरस्कार करू नये, अशा प्रकारचे ठराव या मेळाव्यात करण्यात आले. पुढे आदिवासी भिल्ल सेवा मंडळ बरखास्त करून ग्राम स्वराज्य समिती उदयास आली. नंतर काही दिवसांनी कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव श्रमिक संघटना पुढे आणली. देश विदेशातून समाजातील विविध घटकांनी या चळवळीला आपला पाठिंबा दिला. यात प्रामुख्याने डॉ. गेल ऑम वेट, भारत पाटणकर, बाबा आमटे, बाबा आढाव ,धनाजी गुरव, छाया दातार, तुळशी परब, अनिल अवचट, विजय तेंडुलकर, नाना पाटेकर, निळू फुले सारखी नावे घेता येतील. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय वृत्तवाहिन्या, वर्तमानपत्रांनी चळवळीची दखल घेतली. दिल्ली टाइम्स ऑफ इंडियाचे संपादक अनेक महिने या चळवळीत येऊन गेले होते. बी.बी.सी. लंडन न्यूजने देखील या चळवळीची दखल घेतली होती.शहादा तापी परिसर एक प्रकारे स्वातंत्र्यानंतरचे सामाजिक चळवळीचे प्रेरणास्थळ झाले होते. भिल्ल सेवा मंडळ, सर्वोदय, ग्राम स्वराज्य समिती यांच्या माध्यमातून दीन-दलित कष्टकरी श्रमिक वर्गावरील अन्याय अत्याचाराविरुद्ध संघटितपणे कार्य सुरू होते.

चळवळ जोमात सुरू असताना दीन-दलित, कष्टकरी श्रमिकांचे क्रांतीकारी नेतृत्व अंबरसिंग महाराज यांचे २४ फेब्रुवारी १९७३ साली पुणे येथे निधन झाले. त्यांच्या निधनाने श्रमिकांचा लढवय्या नेता काळाच्या पडद्यावर गेला.सातपुडा तापी परिसरातील श्रमिक, कष्टकरी, दलित, आदिवासी दरवर्षी अंबरसिंग महाराजांचा निर्वाण दिन 'अंबरसिंग महाराज प्रेरणा दिवस' म्हणूण मोठ्या उत्साहाने साजरा करतात. 'सबके दिल में अंबर हैं...

अंबर हमारा शंभर हैं,... थांबणार नाही, थांबणार नाही आमची चळवळ नाही थांबणार !... नहीं सहेंगे अत्याचार, हम लढने को है तैयार...

श्रमिकांसाठी आम्ही जगणार ,
त्यांच्यासाठी आम्ही मरणार,
क्रांती करून आम्ही उरणार...

अशा अनेक प्रेरणादायी घोषणा देत सामाजिक चळवळीला ऊर्जा देत, विचार घेत अंबरसिंग महाराज यांच्या स्मृती जागवतात.

अंबरसिंग महाराजांच्या चळवळीने सामान्य लोकांमध्ये आत्मसन्मान निर्माण केला. विद्रोहाचा आवाज जागवला.आता दलित, आदिवासी श्रमिक महिला देखील छाती ठोकपणे अधिकाऱ्याला जाब विचारू लागल्या. अनेक बदल होवू लागले. कायद्यात तरतुदी झाल्या. मजुरी वाढली. रोजगार मिळाला. कष्टकरी श्रमिकांसाठी नव्या पिढीला अंबरसिंग महाराज यांच्या दलित, कष्टकरी वर्गाच्या आत्मसन्मान व जागृतीसाठी केलेले कार्य सदैव स्मरणीय राहील. अंबरसिंग महाराजांनी लावलेले जागृतीचे रोपटे वाढत जाऊन आदिवासींच्या वेगळ्या चळवळीच्या माध्यमातून त्यांचे हे कार्य कमी-अधिक प्रमाणात सातपुडा तापी परिसरात आजही सुरू आहे.माणसातला माणूस जागवत मानवी अस्तित्व, आदिवासींची अस्मिता व स्वाभिमानासाठी लढणाऱ्या क्रांतिकारी लढाऊ नेतृत्वाला कोटी कोटी नमन !

(लेखकाचे मूळगाव बोरद असून अंबरसिंग महाराजांचे जन्मस्थळ पाडळदा, व लेखातील संदर्भस्थळे म्हसावद, पाटीलवाडी हे काही अंतरावर आहेत)

सातपुडा तापी परिसरातील दुर्लक्षित कर्तृत्ववान व्यक्तींची ओळख करून देणारी लेखमालिका... 'माझा खानदेश'

'आपला महाराष्ट्र' दैनिकात माझे गुरुवर्य यांच्या गेल्या दहा महिन्यापासून प्रकाशित होत असलेल्या 'माझा खानदेश' लेखमालिकेत सातपुडा तापी परिसर विशेष करून पश्चिम खानदेश नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी संस्थानिक, कष्टकरी श्रमिक वर्गाच्या हक्क आणि अधिकारांसाठी झटलेल्या कर्तुत्ववान व्यक्ती तसेच आदिवासी समाजाच्या विकासासाठी समर्पित असलेल्या समाजसेवकांवरील प्रकाशित लेख इतिहास, समाजकार्य आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांचा मौल्यवान दस्तऐवज ठरले आहेत. अशा लेखांमुळे दुर्लक्षित कर्तुत्ववान व्यक्तींच्या कार्याला योग्य स्थान मिळून नव्या पिढीला प्रेरणा मिळत असते. तसा औद्योगिक विकासापासून कोसो दूर असलेला सातपुडा परिसर नैसर्गिक व भौगोलिक सौंदर्याने नटलेला आहे. सातपुड्याची ऐतिहासिक, भौगोलिक, सांस्कृतिक,

व सामाजिक दृष्ट्या स्वतंत्र अशी ओळख राहिलेली आहे. सातपुडा परिसरातील आदिवासी संस्थानिक , कर्तुत्ववान व्यक्ती व समाजसेवकांच्या कार्याचा नेहमीच दुर्लक्षित राहिलेला इतिहास 'आपला महाराष्ट्र' दैनिकाने लेखमालिकेद्वारे जिवंत केला आहे. या व्यक्तिमत्त्वांचे योगदान समाजासमोर आणण्याचे हे कार्य अत्यंत स्तुत्य आणि प्रेरणादायी आहे. अशा लेखांमुळे स्थानिक इतिहासाचे जतन होत असून नव्या पिढीला आपल्या मातीतील कर्तृत्ववान व्यक्तींची ओळख होते. या उपक्रमासाठी संपादक आणि लेखक डॉ. संजय ढोडरे यांचे मनःपूर्वक अभिनंदन व शुभेच्छा...

- डॉ.जसपाल वळवी - मुख्याध्यापक,
अश्वत्थामा माध्यमिक विद्यालय ब्रिटिश अंकुश विहीर, अक्कलकुवा (नंदुरबार)



हक्कसोडपत्र

संयुक्त किंवा सह-मालकीच्या मालमत्तेमध्ये एकापेक्षा जास्त व्यक्तींचा हक्क असतो. अशा परिस्थितीत कधी कधी एखादी व्यक्ती आपला हिस्सा स्वेच्छेने इतर सह-मालकांच्या नावे सोडण्याचा निर्णय घेते. या उद्देशासाठी जो कायदेशीर दस्तऐवज केला जातो, त्याला हक्क सोडपत्र (Release Deed) असे म्हणतात. हक्क सोडपत्राद्वारे संबंधित व्यक्ती मालमत्तेतील आपला हक्क, हिस्सा व दावा कायमस्वरूपी सोडते आणि तो हक्क उरलेल्या सह- मालकांकडे हस्तांतरित होतो.

हक्क सोडपत्र करण्यामागील मुख्य उद्देश म्हणजे मालमत्तेच्या हक्कांबाबत स्पष्टता आणणे आणि भविष्यात कोणतेही वाद निर्माण होऊ नयेत याची काळजी घेणे. उदाहरणार्थ, भावंडांच्या नावावर असलेल्या घरामध्ये एखादा भाऊ किंवा बहीण आपला हिस्सा इतर भावंडांच्या नावे सोडू इच्छित असल्यास, हक्क सोडपत्र केले जाते. त्यामुळे मालकी हक्क स्पष्ट होतो आणि त्या मालमत्तेचा वापर, विक्री किंवा बँकेकडून कर्ज घेणे सोपे होते. हक्कसोडपत्र प्रामुख्याने कुटुंबामध्ये (उदा. भाऊ-बहीण, आई, वडील, नातेवाईक) सामायिक जमिनीची किंवा घराची वाटणी करताना याचा वापर होतो.

हक्क सोडपत्र हे भारतीय करार कायदा, १८७२ आणि मालमत्ता हस्तांतरण कायदा, १८८२ यांमधील नियमांनुसार केले जाते. जमीन, घर किंवा फ्लॅटसारख्या स्थावर मालमत्तेसाठी हे दस्तऐवज नोंदणी कायदा, १९०८ नुसार नोंदणीकृत करणे आवश्यक असते.

हक्कसोडपत्र कोणत्याही वेळी करता येते. त्यासाठी ठरावीक मुदत नाही. हक्कसोडपत्राच्या आधारे सातबारा उताऱ्यावर फेरफार नोंद करता येते.

हक्क सोडपत्र करण्यासाठी संबंधित व्यक्ती कायद्याने सक्षम असली पाहिजे आणि ती त्या मालमत्तेची सह-मालक असणे आवश्यक आहे. आणि तिने आपला हक्क स्वतःच्या इच्छेने, कोणत्याही दबाव किंवा जबरदस्तीशिवाय सोडलेला असावा. तसेच, ज्या व्यक्तीच्या नावे हक्क सोडला जातो, ती व्यक्ती आधीपासूनच त्या मालमत्तेची सह-मालक असली पाहिजे. हक्क सोडपत्राचा वापर नवीन व्यक्तीला मालमत्ता देण्यासाठी करता येत नाही. नवीन व्यक्तीला मालमत्ता द्यायची असल्यास भेटपत्र किंवा विक्रीपत्र करावे लागते.

हक्क सोडपत्र विनामूल्य किंवा ठराविक मोबदल्यावर केले जाऊ शकते. कुटुंबातील जवळच्या नात्यांमध्ये बहुतेक वेळा मोबदला न घेता हक्क सोडला जातो. जर मोबदला दिला जात असेल, तर त्याचा स्पष्ट उल्लेख दस्तऐवजात करणे आवश्यक असते. मोबदल्यासह केलेल्या हक्क सोडपत्रावर कर आणि स्टॅम्प शुल्काचे परिणाम वेगळे असू शकतात.

जर हक्क सोडपत्र जवळच्या नात्यांमध्ये (Blood relation) केले जात असेल, तर महाराष्ट्रात त्यावर नाममात्र स्टॅम्प ड्युटी आकारली जाते. जवळचे नाते म्हणजे पती-पत्नी, वडील-मुलगा, आई-मुलगी, भाऊ-बहीण, पालक- अपत्य इत्यादी. अशा प्रकरणांमध्ये सह-मालकाने आपला हिस्सा कुटुंबातीलच दुसऱ्या केलेले हक्क सोडपत्र कायदेशीरदृष्ट्या वैध मानले जात नाही. नोंदणी झाल्यानंतर ७/१२ उतारा, प्रॉपर्टी कार्ड किंवा सोसायटीच्या नोंदींमध्ये आवश्यक बदल (म्युटेशन) करता येतो, ज्यामुळे मालकी हक्क अधिकृतरीत्या नोंदवला जातो.

नोंदणीकृत हक्कसोड पत्र मिळाल्यानंतर, गावामध्ये तलाठ्याकडे फेरफार नोंदवण्यासाठी (उदा. गाव नमुना ६) अर्ज करावा लागतो, ज्यामुळे ७/१२ उताऱ्यावरून नाव कमी होते.

कायद्यानुसार, एकदा हक्कसोडपत्राचा नोंदणीकृत दस्त केल्यानंतर, हक्क सोडलेल्या मिळकतीत पुन्हा हक्क किंवा हिस्सा मागण्याबाबत कोणतीही कायदेशीर तरतूद नाही. नोंदणीकृत हक्कसोडपत्र हा एक अंतिम आणि अपरिवर्तनीय दस्तऐवज




सह-मालकाच्या नावे सोडल्यास, हक्क सोडपत्रावर फक्त २०० इतकी स्टॅम्प ड्युटी लागते.

फक्त साध्या नोटरीवर किंवा १००/५०० रुपयांच्या स्टॅम्पवर केलेले हक्कसोड पत्र कोर्टात ग्राह्य धरले जात नाही. याउलट, जर हक्क सोडपत्र नातेसंबंध नसलेल्या व्यक्तींमध्ये (non-relatives) केले जात असेल, तर त्यावर सवलतीचा दर लागू होत नाही. अशा परिस्थितीत हक्क सोडपत्राला साधारणपणे विक्रीपत्रासारखे मानले जाते आणि संबंधित मालमत्तेच्या किंवा सोडल्या जाणाऱ्या हिस्स्याच्या बाजारमूल्यावर स्टॅम्प ड्युटी आकारली जाते.

जमीन, घर किंवा फ्लॅट यांसारख्या स्थावर मालमत्तेसाठी हक्क सोडपत्र लेखी स्वरूपात करणे, स्टॅम्प शुल्क भरणे आणि नोंदणी करणे अनिवार्य आहे. नोंदणी न मानला जातो.

एकदा हक्क सोडपत्र योग्य प्रकारे नोंदणीकृत झाले, की ते सामान्यतः एकतर्फी रद्द करता येत नाही. मात्र, जर फसवणूक, दबाव, चुकीची माहिती किंवा कायदेशीर अटींचा भंग झाल्याचे सिद्ध झाले, तर न्यायालयाच्या आदेशाने ते रद्द होऊ शकते. म्हणून हक्क सोडपत्र करताना सर्व अटी स्पष्ट आणि समजून उमजून नमूद करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

एकूणच, मालमत्तेतील हक्क स्पष्ट करण्यासाठी आणि कुटुंबातील किंवा सह-मालकांमधील वाद टाळण्यासाठी हक्क सोडपत्र हा एक सोपा, सुरक्षित आणि कायदेशीर मार्ग आहे. योग्य सल्ला घेऊन, नीट दस्तऐवज तयार करून आणि नोंदणी करून घेतल्यास मालमत्तेच्या व्यवहारात स्पष्टता आणि सुरक्षितता मिळते.




कटिंगचा आनंद आणि आठवणींचे बालपण

आमच्या लहानपणी कटिंग करायला जाणे म्हणजे एक दिव्यच असायचे! न्हाव्याच्या दुकानात खाली बसवून दोन गुडघ्यांमध्ये डोके धरून केस कापले जायचे. कटिंग सुरू झाली की माझे रडणे सुरू व्हायचे. त्यात वस्तरा वापरण्याची वेळ आली की भीतीने गाळण उडायची. आज मात्र माझे साडेचार वर्षांचे नातू चैतन्य आणि चिन्मय नवीन, चकचकीत सलूनमध्ये कटिंग करण्यासाठी आनंदाने उड्या मारतात. आमच्या काळातील कटिंगची भीती आणि आजच्या पिढीतील कटिंगचा आनंद यांतील हा बदल एका रविवारच्या छोट्याशा प्रसंगातून पुन्हा अनुभवायला मिळाला.

रविवारची सकाळ होती. सुट्टीचा दिवस असल्यामुळे घरात नेहमीपेक्षा थोडी निवांतता होती. चैतन्य आणि चिन्मय आपापल्या गमतीजमतींत रमले होते. साडेचार वर्षांच्या या दोघांसाठी प्रत्येक दिवस म्हणजे नवा अनुभव. एखादी छोटीशी गोष्ट पाहिली, तरी त्यांना तिच्याबद्दल कुतूहल वाटते. एखादी नवीन गोष्ट करायची म्हटले की त्यांच्या उत्साहाला पारावार राहत नाही. तेवढ्यात दोघेही माझ्याजवळ आले.

'बाबा, आज कटिंग करायला चला!' त्यांच्या या मागणीला मी लगेच होकार दिला. दोघांना घेऊन आम्ही नेहमीच्या सलूनमध्ये गेलो. तिथे काही ग्राहक कटिंगसाठी थांबलेले होते. आमचा नंबर येण्यासाठी थोडा वेळ लागणार होता. तेवढ्यात चैतन्य आणि चिन्मय माझ्याकडे वळून म्हणाले, 'बाबा, आपण त्या नवीन सलूनमध्ये जाऊया ना!' मी त्यांना समजावले, 'अरे, आपण नेहमी इथेच कटिंग करतो. थोडा वेळ थांबू. आपला नंबर आला की कटिंग करून घेऊ.' पण दोघांना नवीन सलूनमध्ये जाण्याची घाई झाली होती. 'बाबा, नवीन सलूनमध्येच जाऊया!' त्यांनी पुन्हा आग्रह धरला. त्यांचा हट्ट पाहून मी नेहमीच्या सलूनमधील दुकानदाराला विचारले, 'त्या नवीन सलूनमध्ये कटिंग होईल का?' त्यावर तो म्हणाला, 'सर, आज ते दुकान बंद आहे.'



आता तिकडे जाण्याचा प्रश्नच संपला, असे मला वाटले. दुकान बंद असेल तर तिथे जाऊन काय करायचे? इथेच थांबावे आणि आपला नंबर आला की कटिंग करून घ्यावी, असा माझा साधा विचार होता. पण चैतन्य आणि चिन्मयचा विचार काही वेगळाच होता. 'बाबा, नुसतं जाऊन तर येऊ! बंद असेल तर परत येऊ!' त्यांचे हे उत्तर ऐकून मला हसूच आले. मी पुन्हा त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला; पण त्यांचा आग्रह कायम होता. 'बाबा, एकदा जाऊन तर पाहू!' त्यांना नवीन सलून पाहण्याची उत्सुकता होती. दुकान कसे असेल, आत काय काय असेल, तिथे कटिंग कशी करतात, हे पाहण्याची त्यांना घाई झाली होती. शेवटी त्यांच्या आग्रहाला मान देत मी म्हणालो, 'बरं, चला! जाऊन पाहू.' आम्ही तिघेही नवीन सलूनच्या दिशेने निघालो. ते दुकान रस्त्यालगतच होते. दुकानाच्या बाहेर काचा लावलेल्या असल्यामुळे आतले सर्व काही बाहेरून स्पष्ट दिसत होते. दुकानाजवळ पोहोचताच चैतन्य आणि चिन्मयला ते उघडे असल्याचे दिसले. मग काय विचारता! दोघांच्या आनंदाला पारावार उरला नाही. आनंदाने उड्या मारत ते म्हणाले, 'बाबा, दुकान उघडं आहे!'

'बाबा, आम्हाला इथेच कटिंग करायची!' त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहण्यासारखा होता. जणू काही त्यांनी एखादा मोठा किल्लाच जिंकला होता! मीही त्यांच्या आनंदात सहभागी झालो आणि आम्ही दुकानात प्रवेश केला नवीन सलून खरोखरच आकर्षक होते. चकचकीत फरशी, मोठमोठे आरसे, आधुनिक खुर्च्या, केस कापण्यासाठी इलेक्ट्रॉनिक मशीन आणि नीटनेटकी मांडणी यामुळे दुकानाला वेगळेच रूप आले होते. चैतन्य आणि चिन्मयच्या नजरेतून काहीच सुटत नव्हते. ते उत्सुकतेने सभोवतालचे वातावरण पाहत होते. त्यांच्यासाठी हे केवळ कटिंगचे दुकान नव्हते; ते एक नवीन जग होते. दोघांनीही तिथे कटिंग करून घेतली. कटिंग पूर्ण झाल्यावर आरशात स्वतःकडे पाहताना त्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद ओसंडून वाहत होता. कधी केसांवरून हात फिरवत होते, तर कधी आरशात स्वतःचे रूप न्याहाळत होते. कटिंग नेहमीसारखीच झाली होती; पण आजचा अनुभव मात्र त्यांच्यासाठी वेगळा होता. नवीन सलूनमध्ये कटिंग केल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता.

त्यांच्याकडे पाहताना मला जाणवले की, मोठ्या माणसांच्या दृष्टीने साधी असलेली एखादी गोष्ट लहान मुलांसाठी किती आनंददायी ठरू शकते! आपल्याला कटिंग म्हणजे केस कापण्याची नेहमीची प्रक्रिया वाटते; पण मुलांसाठी त्यातही नवीन अनुभव घेण्याची संधी असते. त्यांच्या आनंदात सहभागी होत असतानाच माझ्या मनात बालपणीच्या आठवणी जाग्या झाल्या. त्या काळात आजच्यासारख्या आधुनिक खुर्च्या नव्हत्या. इलेक्ट्रॉनिक मशीन नव्हते. सलूनमध्ये चकचकीत फरशी, मोठे आरसे आणि आकर्षक सजावटही नसायची. न्हाव्याच्या दुकानात गेल्यावर आम्हाला खालीच बसवले जायचे. न्हावी आपल्या दोन गुडघ्यांमध्ये आमचे डोके धरून केस कापायचा. डोके इकडे-तिकडे होऊ नये म्हणून त्याची पकड घट्ट असायची. आम्हाला मात्र त्या सगळ्याचीच भीती वाटायची. कटिंग सुरू झाली की माझे रडणे सुरू व्हायचे. न्हावी केस कापत असताना मी घाबरून जायचो. डोके त्याच्या दोन गुडघ्यांमध्ये धरलेले असल्यामुळे सहज हालचालही करता येत नसे. आपले डोके त्याच्या पकडीतून सुटावे, कटिंग लवकर संपावी, असे सारखे वाटायचे. त्यात वस्ताऱ्याचा प्रसंग आला की भीती आणखी वाढायची. हातात धारदार वस्तरा घेऊन न्हावी जवळ आला की मनात धडकी भरायची. आपल्या डोक्याजवळून तो वस्तरा फिरताना अगदी गप्प बसून राहणे त्या लहान वयात फार कठीण वाटायचे. माझे रडणे आणि भीती पाहून घरातील मोठी माणसे मला समजावत असतील; पण त्या वेळी मनावर बसलेली भीती काही सहज कमी होत नसे.

(पान ६ वर)

शब्दझुला

दुष्काळ



बाई मांडू तरी कसा,
चार ओळीत दुष्काळ..?
वेदनेच्या गं राशीला,
कशी आली होरपळ...?
डोळे झालेत कोरडे,
भांडू कुणाशी कशाला...
हादरून गेला जीव,
दैव खुंटी दावणीला....
घात केला हा काळाने,
पीक जाळलं पाण्याने...
घडी विस्कटली सारी,
अवंदाच्या दुष्काळाने....
बाई कोरडी घागर,
कशी गुरां पुढ मांडू....
पाण्याची ही गं व्यथा,
कशी मुक्यांपुढं सांडू....
भयानही परीस्थिती,
ओढावले हे संकट....
आले वादळ बैरागी,
पसरले हे सावट...
बिकटश्या या प्रसंगी,
सारे एकजुट व्हा रे...
काळावर करा मात,
मदतीचा हात द्या रे....

– सौ.वैशाली शिंदे
मो...९५७९४९३८१०

माहेरच्या वाटेवर..

माहेरच्या वाटेवर
आठवणी ठाई ठाई
आली दिवाळी
दिवाळी मला आठवते आई..
पाहे दारात वाटुली
गाडी का ग आली नाही
दोन दिस घाई घाई
येईल हो माझी बाई..
सडासारवण रोज
ठिपक्यांची ती रांगोळी
ऊन ऊन पाण्याच्या त्या
घंघाळातून आंघोळी..
शिकेकाई नि साबण
पीठ डाळीचे जोडीला
नवेकोरे ते पातळ
आज मोड तू घडीला..
लाडू गुळाचे ते गोड वर
खसखस खोबरे
सांजोऱ्या त्या चवदार
भरू तुपाचे तोबरे..
दारी चमचम चांदण्या
दिपावलीची आरास
अनरसे ते गुळाचे वर
खसखस ती खास..
गल्ली गल्लीत आनंद
सारे फुलती चेहरे
घरोघर मामे भाचे
आनंदाने घर भरे..
माळा झेंडूच्या शोभती
दारी तोरणे झुलती
हास्यविनोद तो चाले
सारे किलकिल करती..
पेठा सजती मालाने
उजळती तारांगणे
नणंद नि भावजाया
जात्यावरती ते गाणे..
सारे नटूनसजून
ओवाळती एकमेका
ओवाळणी भाऊबीज
गरीबांना थोडी टाका
जुनेपानेही चालती
त्यांना वाटा हो आनंद
उजळेल मुख त्यांचे ह
ास्य ओठावरी मंद

– प्रा. सौ. सुमती पवार
नाशिक (९७६३६०५६४२)

शेतकारी व्यथा गीत

सांगना देवा आमचं काय चुकलं
शेतशिवार सारं उनानं लई तापलं ।।धृ।।
वावरात पिकं सारी सुकून गेली
जमिनीला भेगा पडल्यात खाली
देवा कसं जाईल यंदाचं साल
शेतशिवार सारं उनानं लई तापलं।।१।।
गुराढोरांना नाही शिल्लक चारापाणी
गावागावात प्यायला नाही पाणी
पाण्यावाचून झालेत सध्या हाल
शेतशिवार सारं उनानं लई तापलं।।२।।
पाहिजे तसं पाणी नाही पाडलं
सणासुधीला गणित सारं बिघडलं
सांगना देवा आमचं काय चुकलं
शेतशिवार सारं उनानं लई तापलं।।३।।

– कवी.दिलीप पाटील
मो.९६७३२३८९८७३

तिच इंटरनेट पावरफुल..

ऑफिस मधून घरी आलो
बायकोने शर्ट पाकीट चेक केल...
म्हटली शंभर रुपये कुठे खर्च केले
काय सांगू मैत्रिणीबरोबर नाश्त्यात गेले...
बापरे घरात महाभारत घडेल
तिच इंटरनेट पावरफुल आहे...
तिचे सीसीटीव्ही कॅमेरे माझ्या भोवती फिरे
पती सदा तिच्या रडारवर राहे...
जेवण झाल्यावर सहज बसलो
कॉलेज ग्रुप मध्ये तिचा फोटो दिसला...
नकळत आठवणी ताज्या झाल्या
ती काय करत असेल प्रश्न पडला....
विचार करताना चेहरा आनंदला
सारे आठवून गोड हसू आलं...
बायकोच्या नजरेने टिपलं
मग प्रश्नांच वादळच सुरू झालं...
उत्तर देताना नाकी नऊ आले
माझ्या उत्तराने समाधान नाही झाले...
इतक्यात मैत्रिणीने काडी लावली
म्हणे भाऊजींबरोबर राधाला पाहीले...
महायुद्धाचं रणशिंग फुकलं
कटकट सुरू झाली...
जेवण तर बोंबललच
पण झोपेची ही वाट लावली...

– विजया भट, धुळे.



डॉ.रोहन कुलकर्णी
MBBS, MD Medicine, IDCCM
कन्सल्टिंग फिजिशियन, इंटेंसिविस्ट
धुळे मो.९५०३४२०५१२

सर्दी-खोकला पुन्हा वाढतोय : वायरल फिव्हर नवीन नाही, पण कोणाला जपावे अधिक?

हवामान बदलले, सकाळ-संध्याकाळ गारवा वाढला की घराघरांत ताप, खोकला, घसादुखी आणि अंगदुखीचे रुग्ण दिसू लागतात. अनेकदा आपण याला सहज व्हायरल म्हणतो हा शब्द ऐकताच काही जण अनावश्यक घाबरतात. सध्या मात्र या दोन्ही टोकांपासून दूर राहणे गरजेचे आहे. सप्टेंबर २०२६ मधील जागतिक देखरेखीच्या आकडेवारीनुसार भारतातील influenza-positive जास्त होते मात्र हा एखादा नवीन विषाणू नसून सध्या फिरणाऱ्या seasonal influenza चाच भाग आहे.

इन्फ्लूएंझा हा श्वसनमार्गाचा विषाणूजन्य संसर्ग आहे. संक्रमित व्यक्ती खोकताना, शिंकताना किंवा जवळून बोलताना बाहेर पडणाऱ्या सूक्ष्म थेंबांमधून आणि aerosols मधून विषाणू पसरू शकतो. कार्यालय, शाळा, लग्नसमारंभ, बाजारपेठ, बस-रेल्वे किंवा बंद खोलीत गर्दी असल्यास संसर्गाची शक्यता वाढते. ऋतुबदलाच्या काळात लोक अधिक वेळ बंद जागेत राहतात आणि त्याच काळात विविध respiratory viruses फिरत असल्याने एकाच कुटुंबातील अनेकांना लागोपाठ ताप-खोकला होणे सहज शक्य आहे.

वायरल ची लक्षणे इतर seasonal flu सारखीच असतात-अचानक ताप, कोरडा खोकला, घसा दुखणे, नाक वाहणे किंवा चोंदणे, डोकेदुखी, अंगदुखी, थंडी वाजणे आणि प्रचंड थकवा. काहींना मळमळ, उलट्या किंवा जुलाबही होऊ शकतात. बहुतेक निरोगी व्यक्तींमध्ये हा आजार काही दिवसांत योग्य विश्रांती आणि उपचारांनी बरा होतो. त्यामुळे influenza positive म्हणजे ICU लागणारच, हा गैरसमज आहे.

मात्र प्रत्येकासाठी धोका सारखा नसतो. पाच वर्षांखालील मुले-विशेषतः दोन वर्षांखालील बालके-वृद्ध, गर्भवती महिला, अतिलठ्ठ व्यक्ती तसेच दमा, उजझऊ, मधुमेह, हृदयरोग, मूत्रपिंड किंवा यकृताचे आजार आणि प्रतिकारशक्ती कमी असलेल्या रुग्णांमध्ये flu गंभीर होण्याची शक्यता अधिक असते. अशा व्यक्तींनी दोन-चार दिवस बघू म्हणून वैद्यकीय सल्ला उशिरा घेणे टाळावे.

सामान्य flu मध्ये सर्वात महत्त्वाचे म्हणजे गंभीर आजाराची चिन्हे ओळखणे. श्वास घेण्यास त्रास, छातीत दुखणे किंवा दाब जाणवणे, ओठ निळसर पडणे, सतत उलट्या, लघवी खूप कमी होणे, खूप गुंगी किंवा गोंधळ, ऑक्सिजन कमी होणे किंवा ताप-खोकला सुधारल्यानंतर पुन्हा अचानक बिघडणे ही धोक्याची चिन्हे आहेत. गंभीर influenza 'Ü¶o viral pneumonia, secondary bacterial pneumonia, X'm-COPD चा तीव्र झटका, श्वसन निकामी होणे आणि क्वचित इतर अवयवांवरही परिणाम होऊ शकतो.



प्रत्येक ताप-खोकल्यासाठी influenza ची चाचणी आवश्यक नसते. डॉक्टर रुग्णाचे वय, जोखीम, लक्षणांची तीव्रता आणि आजाराचा कालावधी पाहून तपासणी ठरवतात. आवश्यक असल्यास respiratory sample da RT-PCR सारखी चाचणी केली जाते. गंभीर रुग्णांमध्ये oxygen saturation, CBC, chest X-ray आणि गरजेनुसार इतर तपासण्या केल्या जाऊ शकतात. फक्त खोकला आहे म्हणून X-ray किंवा antibiotic घेणे योग्य नाही.

यावरून आणखी एक महत्त्वाचा गैरसमज दूर होतो , वायरल वर antibiotic काम करत नाही, कारण हा विषाणू-जन्य आजार आहे. डॉक्टरांना bacterial infection ची वेगळी शंका असल्यासच antibiotic ची आवश्यकता असू शकते. काही रुग्णांमध्ये, विशेषतः गंभीर किंवा high-risk व्यक्तींमध्ये, डॉक्टर oseltamivir सारखे antiviral औषध सुरू करू शकतात. ते स्वतःहून मेडिकलमधून घेणे योग्य नाही. सौम्य आजारात पुरेशी विश्रांती, पाणी व इतर द्रवपदार्थ, हलका पौष्टिक आहार आणि तापासाठी डॉक्टरांनी सुचवलेले औषध उपयोगी ठरते.

स्वाइन फ्लू डुकराचे मांस खाल्ल्यामुळे होतो हे चुकीचे आहे. आजचा influenza हा माणसांमध्ये फिरणारा seasonal influenza virus आहे आणि तो प्रामुख्याने श्वसनमार्गातून पसरतो. तसेच एकदा flu झाला की पुन्हा होत नाही हेही चुकीचे आहे. Influenza viruses बदलत राहतात आणि प्रतिकारशक्ती कालांतराने कमी होऊ शकते. म्हणूनच high-risk व्यक्तींनी डॉक्टरांशी दरवर्षीच्या influenza vaccination बाबत चर्चा करणे योग्य ठरते.

भारताच्या दृष्टीने सध्याची परिस्थिती लक्षात घेण्यासारखी आहे.

या हंगामात पाच गोष्टी लक्षात ठेवा-ताप-खोकला असल्यास शक्यतो गर्दीत जाणे टाळा; खोकताना-शिंकताना तोंड झाका आणि हात स्वच्छ ठेवा; स्वतः हून antibiotic किंवा antiviral घेऊ नका; वृद्ध, गर्भवती आणि chronic disease असलेल्या व्यक्तींनी flu vaccination बाबत डॉक्टरांचा सल्ला घ्या; आणि श्वास लागणे, छातीत दुखणे किंवा ऑक्सिजन कमी होणे सुरू झाल्यास तातडीने रुग्णालयात जा.

वायरल फिव्हर या नावाची भीती बाळगण्याची गरज नाही, पण त्याकडे दुर्लक्षही नको. बहुतेक flu घरी योग्य काळजीने बरा होतो; खरे कौशल्य म्हणजे कोणता रुग्ण high-risk आहे आणि कोणत्या क्षणी साधा वाटणारा flu गंभीर होत आहे हे वेळेत ओळखणे. जागरूकता, श्वसन स्वच्छता, योग्य लसीकरण आणि वेळेवर वैद्यकीय सल्ला-याच चार गोष्टी या हंगामात आपले सर्वोत्तम संरक्षण आहेत.

कटिंगचा आनंद आणि आठवणींचे बालपण

(पान ५ वरुन) कधी कटिंग लवकर संपावी असे वाटायचे, तर कधी न्हाव्याने आपल्याला लवकर सोडावे म्हणून मनातल्या मनात देवाचा धावाही करायचो. आज त्या आठवणी आठवल्या की हसू येते; पण त्या वेळी वाटणारी भीती खरी होती. कटिंग करण्यापेक्षा कटिंगच्या वेळी मनात निर्माण होणाऱ्या भीतीचा त्रास अधिक होता! आमच्या काळात कटिंग करणे ही अनेकदा भीतीची गोष्ट होती; आजच्या मुलांसाठी मात्र तो आनंदाचा अनुभव झाला आहे. आज चैतन्य आणि चिन्मय आधुनिक खुर्चीवर आरामात बसतात. समोर मोठा आरसा असतो. केस कापण्यासाठी इलेक्ट्रॉनिक मशीन असते आणि सभोवतालचे वातावरणही आकर्षक असते. त्यांना कटिंगची भीती वाटण्याऐवजी नवीन सलूनमध्ये जाण्याचा आनंद होतो.

आमच्या वेळी कटिंग करताना डोळ्यांत पाणी यायचे; आजच्या मुलांच्या कटिंगनंतर चेहऱ्यावर हसू फुलते. काळ किती बदलला आहे! या प्रसंगाने आजच्या पिढीच्या आवडीनिवडींचाही विचार करायला लावले. आजच्या मुलांना स्वच्छ, नीटनेटके, आकर्षक आणि आधुनिक वातावरण आवडते. नवीन वस्तू, नवीन ठिकाणे आणि वेगळे अनुभव त्यांना आकर्षित करतात. चैतन्य आणि चिन्मयला कटिंग करायची होतीच; पण नेहमीच्या सलूनपेक्षा नवीन, चकाचक सलूनमध्ये कटिंग करण्याची त्यांची इच्छा अधिक होती. त्यांच्या या उत्सुकता समजून घेण्याचा प्रयत्न करायला हवा. अर्थात, प्रत्येक हट्ट पूर्ण करणे योग्य नाही; पण योग्य वेळी त्यांच्या कुतूहलाला वाव दिला, तर त्यांचा आनंदही वाढतो आणि त्यांना नवीन अनुभवही मिळतात. कटिंग झाल्यावर चैतन्य आणि चिन्मय आरशात स्वतःकडे पाहत होते. त्यांच्या चेहऱ्यावरील निरागस हास्य पाहताना माझे मन मात्र भूतकाळातून वर्तमानात आले.

किती छोटीशी इच्छा होती त्यांची! नवीन सलूनमध्ये कटिंग करायची. माझ्या दृष्टीने कटिंग ही नेहमीची गोष्ट होती; पण त्यांच्यासाठी तो एक नवीन अनुभव होता. त्यांची इच्छा पूर्ण झाली, याचा आनंद मला होताच; मात्र त्यांच्या आनंदात सहभागी होता आले, याचे समाधान त्याहून मोठे होते. आजोबा झाल्यानंतर आयुष्याकडे पाहण्याची दृष्टी बदलते, असे मला वाटते. आपल्या मुलांना वाढवताना त्यांच्या शिक्षणाची, संस्कारांची आणि भवितव्याची चिंता अधिक असते. नातवंडांच्या बाबतीत मात्र त्यांच्या छोट्या छोट्या गोष्टींत रमावे, त्यांच्या निरागस प्रश्नांना उत्तरे द्यावीत, त्यांच्या आनंदात आनंद मानावा आणि त्यांच्या बालपणातील क्षण मनात जपून ठेवावेत, असे वाटत राहते. चैतन्य आणि चिन्मयकडे पाहताना मला माझे बालपण आठवले. आमच्या काळातील कटिंगची भीती आणि आजच्या मुलांचा कटिंगमधील आनंद यांतील अंतर लक्षात आले. काळ बदलला, सुविधा वाढल्या आणि अनुभवांचे स्वरूपही बदलले. मात्र, लहान मुलांच्या आनंदामागची निरागसता आजही कायम आहे. मुलांना आनंद देण्यासाठी नेहमी मोठ्या भेटवस्तू किंवा महागड्या गोष्टींची गरज नसते. त्यांच्या मनातील छोटीशी इच्छा समजून घेऊन त्यांच्यासोबत वेळ घालवणेही त्यांच्यासाठी मोठा आनंद ठरू शकतो. त्या दिवशी मी चैतन्य आणि चिन्मयला केवळ नवीन सलूनमध्ये कटिंगसाठी घेऊन गेलो नव्हतो, तर त्यांच्या आनंदाचा एक छोटासा भाग झालो होतो. घरी परतताना त्यांच्या चेहऱ्यावरील हास्य माझ्या मनात साठवून ठेवले. त्यांच्या दृष्टीने तो नवीन सलूनमध्ये कटिंग केल्याचा आनंद होता; माझ्यासाठी मात्र तो बालपणाच्या आठवणींना उजाळा देणारा आणि नातवंडांच्या सहवासाचे मोल जाणवून देणारा अनुभव होता. मनात एकच प्रार्थना उमटली-या दोघांच्या चेहऱ्यावरील निरागस हास्य असेच कायम राहो. त्यांच्या मनातील कुतूहल आणि प्रत्येक छोट्या गोष्टीत आनंद शोधण्याची वृत्ती जपली जावो. आमच्या काळात कटिंगच्या वेळी डोळ्यांत पाणी यायचे; आज नातवांच्या कटिंगनंतर चेहऱ्यावर हसू फुलते. काळ बदलला, साधने बदलली आणि अनुभवही बदलले. नातवंडे मोठी होत असतात, काळ पुढे सरकत असतो; पण त्यांच्या बालपणातील असे छोटे क्षण आजोबांच्या मनात आयुष्यभर जिवंत राहतात. कारण नातवंडांसोबत घालवलेला वेळ हा केवळ वेळ नसतो, तो आपल्या आयुष्याला पुन्हा एकदा बालपणाची ऊब देणारा अनमोल ठेवा असतो.



साप्ताहिक राशी भविष्य १ नोव्हेंबर ते ७ नोव्हेंबर



मेष : हा सप्ताह तुमच्यासाठी तडजोडी करण्याचा आहे. अपेक्षित यश मिळवणे कठीण आहे. बरेच कष्ट करावे लागतील. कसलीतरी कमतरता जाणवेल. लोकांवर अवलंबून राहावं लागेल. इतरांकडून हीन वागणूक मिळू शकते. पण या सगळ्यातूनच आजची रात्र ही उद्याच्या पहाटेची चाहूल घेऊन येते याचा अनुभव तुम्हाला येईल. या आठवड्यात तुम्ही स्वतः संयम ठेवण्याची गरज आहे. गरजा कमी करा. सध्या मोठी गुंतवणूक किंवा महत्त्वाचे व्यवहार टाळा. परोपकार करण्याचा प्रयत्न करा. गरिबांना मदत करा. आरोग्य सांभाळा!

वृषभ: हा सप्ताह तुमच्यासाठी खूप काम आणि कष्ट करण्याचा असणार आहे. जे करत आहात त्यात तुम्हाला प्राविण्य मिळेल. पण तुम्हाला हवा तसा प्रतिसाद मिळणार नाही. तरीही तुम्ही संपन्न आणि आनंदी रहाल. तुमच्या कुठल्यातरी भौतिक, आर्थिक ध्येयाच्या दिशेने चांगली वाटचाल कराल. काम परिपूर्णतेकडे जाईल. या आठवड्यात तुम्हाला बाकी कसलाही विचार न करता पूर्ण लक्ष तुमच्या कामाच्या किंवा व्यवसायाच्या ठिकाणी ठेवायचे आहे. वैयक्तिक गोष्टींत अडकू नका. चुका दुरुस्त करून, सुधारणा करा. स्वावलंबी व्हा!

मिथुन: हा सप्ताह तुमच्यासाठी वेगवान असणार आहे. अडकलेली कामे पुढच्या टप्प्यापर्यंत पोचू शकतात. ध्येयाकडे चांगली वाटचाल होईल. सतत होत असलेल्या घडामोडींमुळे अस्थिर आणि अस्वस्थ वाटू शकतं. सडेतोड बोलणाऱ्या व्यक्तींशी सामना होईल. मतभेद होऊ शकतात. या आठवड्यात तुम्ही धडाडीने आणि विश्वासाने पुढे चालण्याची गरज आहे. तुमचे विचार स्पष्टपणे मांडा, रोखठोक वागा. बुद्धीचातुर्य वापरा. कोणत्याही बाबतीत वेळ गाठा, विलंब नको. प्रवासात वेगावर आणि वाहनावर चांगले नियंत्रण ठेवा, घाईगडबड नको!

कर्क: हा सप्ताह तुमच्यासाठी काही अडथळे आणि अडचणी घेऊन येत आहे. हव्या तशा वेगाने कामे पुढे सरकणार नाहीत. अडकलेली कामे तशीच राहण्याची शक्यता आहे. पण असं असूनही तुम्हाला त्याचा फार त्रास होणार नाही. तुम्ही तुमच्या कामावर लक्ष केंद्रित करुन चांगल्या पद्धतीने पुढे जाऊ शकणार आहात. या आठवड्यात तुम्ही एक नवीन दृष्टिकोन ठेवण्याची गरज आहे. आलेली अवघड परिस्थिती तुम्हाला नक्की शिकवायला आणि समृद्ध करायला आली आहे असा सकारात्मक विचार ठेवून उत्तर शोधण्याचा प्रयत्न करा. तुम्हाला नक्कीच यश येईल. संयम आणि धैर्य ठेवा.

सिंह: हा सप्ताह तुमच्यासाठी महत्त्वाचा असणार आहे. एखादा महत्त्वाचा निर्णय घ्यावा लागेल. महत्त्वाचे कोर्टाचे काम होण्याची शक्यता आहे. कागदपत्रांचे व्यवहार घडतील. काम पटकन होणार नाही. एका गोष्टीसाठी अनेक गोष्टींची गरज लागेल. मागे केलेल्या कर्माचे फळ मिळेल. या आठवड्यात तुम्ही सारासार विचार करुन वागण्याची आणि बोलण्याची गरज आहे. तज्ञ व्यक्तींचा सल्ला घेऊन काम करा. कोर्ट कचेरी कामात दुर्लक्ष नको. खोटेपणा सोडून सचोटीने वागा. मागे तुमच्या कडून काही चुका झाल्या असतील तर त्या खऱ्या मनाने मान्य करुन परिस्थिती स्वीकारा!

कन्या: हा सप्ताह तुमच्यासाठी जलद गतीचा आहे. तुमच्या कामात तुम्हाला नवीन संकल्पना सुचतील. थोडे मतभेद आणि वादविवाद देखील संभवतात पण एकुणात परिस्थीत चांगली राहील. इतरांसमोर तुमचं बुद्धीचातुर्य उठून दिसेल. तुम्हाला हवी असलेली बातमी मिळेल, किंवा हवी असलेली व्यक्ती भेटेल. एखादा प्रवास घडेल. या आठवड्यात तुम्ही अतिशय प्रामाणिकपणा जपण्याची गरज आहे. रोखठोक वागा, भावनांना बळी पडू नका. संवाद कौशल्यात सुधारणा करा. वाचन, लेखन यासारख्या गोष्टींत मन रमवा. फक्त लहान तोंडी मोठा घास घेऊ नका!

तूळ: हा सप्ताह तुमच्यासाठी काहीतरी नवीन करून दाखवण्याचा आहे. नवीन काम मिळू शकतं. कामात बदल घेऊ शकतात. आत्तापर्यंत ज्याची वाट पाहत होता, ती घटना घडू शकते, किंवा त्या घटनेसंदर्भात चांगली बातमी मिळू शकते. केलेली मेहनत फलित होईल. तुम्हाला आतून ऊर्जा मिळेल, जिद्द राहील, उत्साही वाटेल. सकारात्मक वाटचाल होईल. या आठवड्यात तुम्ही एखादा प्रयोग, एखादं नवखं काम हाती घेऊ शकता. तुमची कला, क्रीडा, छंद लोकांसमोर सादर करा. विनम्रपणे, पाय जमिनीवर ठेवून इतरांसमोर व्यक्त व्हा.

वृश्चिक: हा सप्ताह तुमच्यासाठी एखादी नवीन संधी घेऊन येणार आहे. नवीन भौतिक आनंद, सुख सोयी अनुभवता येतील. अडकलेले काम सुटेल. कौटुंबिक सुख समृद्धी राहील. एकूण परिस्थिती सुधारेल. तब्येत चांगली होईल. घर, गाडी, नोकरी, व्यवसाय, जमिनीचे काम यासंदर्भात प्रगती होईल. या आठवड्यात तुम्ही सावकाश आणि चिकाटीने काम करण्याची गरज आहे. कामाच्या ठिकाणी एखादी नवीन योजना मांडा. नवीन सुरुवात करायची असेल तर करा. काम होण्याची शक्यता आहे पण ते पूर्ण होण्यासाठी संयम ठेवा!

धनू: हा सप्ताह तुमच्यासाठी संभ्रम आणि शंका निर्माण करणारा ठरु शकतो. तुमचा स्वतः वरचा विश्वास कमी होऊ शकतो. इतरांनी तुमच्या डोक्यात काहीतरी घातले तर तुम्ही पूर्णपणे त्यांच्या प्रभावाखाली राहाल अशी शक्यता दिसते आहे. पण स्वतःला मजबूत ठेवले, मन भक्कम ठेवले तर हा सप्ताह तुमच्यातील कलेला, सृजशीलतेला वाव देणारा ठरेल! या आठवड्यात तुम्ही मनावर ताबा ठेवण्याची गरज आहे. मनाप्रमाणे वागता वागता तुम्ही वाहवत तर जात नाही ना याकडे लक्ष द्या. ध्यान मेडीटेशन प्रार्थना करा.

मकर: हा सप्ताह तुमच्यासाठी महत्त्वाच्या वळणाचा आहे. एक प्रकारे विरक्ती आणणारा हा काळ असू शकतो. कष्टाचे हवे तसे फळ मिळणार नाही. विलंब होईल. पण यामुळेच तुम्ही अंतर्मुख व्हाल आणि नवीन मार्ग सापडेल! परिस्थितीचा स्वीकार करुन आनंदाने मार्गक्रमण कराल. निरस व्हाल पण निराश नाही! स्वार्थ सोडून परमार्थाचा विचार येईल. या आठवड्यात तुम्ही विवेकबुद्धी आणि धीराने वागा. आत्मोन्नतीचा मार्ग शोधा. इतरांकडून फार अपेक्षा ठेवू नका, त्या पूर्ण होणार नाहीत. भौतिक पसाऱ्यातून स्वतःला थोडे अलिप्त करून बघा. एकांतात वेळ घालवा.

कुंभ: हा सप्ताह तुमच्यासाठी महत्त्वाच्या घडामोडी घेऊन येत आहे. तुमच्यासाठी नवीन असलेल्या कामासाठी किंवा जबाबदारीसाठी तुमची नेमणूक होऊ शकते. तुम्हाला अगदी पहिल्या पायरीवर असल्यासारखे वाटेल. नाविन्यपूर्ण गोष्टी शिकाल. नव्या संधी, नवीन उमेद, नवी दिशा मिळेल. या आठवड्यात तुम्ही अनुभवाचा आणि ज्ञानाचा चष्मा थोडा बाजूला करून आलेले काम अगदी नवख्या डोळ्यांनी बघण्याची गरज आहे. नवीन काहीतरी शिका, नवीन लोकांशी मैत्री करा. स्वतःला मोकळं सोडा. फिरुनी नवी जन्मेन मी याप्रमाणे नवीन संधी स्वीकारा!

मीन: हा सप्ताह तुमच्यासाठी महत्त्वाचे बदल घेऊन येत आहे. जर आत्ता तुम्ही निराश असाल तर या आठवड्यात ही परिस्थिती नक्कीच सुधारणार आहे. तुमच्या हाताबाहेर असलेल्या गोष्टी किंवा माणसं अनुकूल होतील. काही गोष्टींना गती मिळेल, योग्य दिशा मिळेल. अडकलेले काम सुटेल. नशिबाची चांगली साथ मिळेल. या आठवड्यात तुम्ही प्रामाणिक कष्ट करण्याची गरज आहे. आत्ता तुम्ही आनंद उपभोगत असाल तर हीच वेळ आहे दुसऱ्याला मदत करण्याची. निसर्गचक्र लक्षात ठेवा. तुम्ही चांगल्या परिस्थितीत असाल तर त्याचा अभिमान न ठेवता सत्कर्म करा आणि कोणाला दुखवू नका.

रोजगार हमी योजनेचे जनक

(पान ३ वरुन) त्यांच्या खर्चाची व शिल्लकीची नोंद त्यांना ठेवावी लागत असे.सरनौबत म्हणजे किल्याचा तटरक्षक अधिकारी होय. तटसरनौबताची नेमणूक स्वतः छत्रपती करीत असत.किल्ल्याच्या तटाचे संरक्षण करण्याची जबाबदारी या अधिकाऱ्याची असे. किल्ल्याच्या प्रत्येक तटावर एक सरनौबत असे. तटसरनौबत कुलीन मराठा जातीचा असे. किल्ल्याच्या संरक्षण खात्यातील दुसरा अधिकारी म्हणजे सिबंदी होय. गडाच्या पायथ्याला संरक्षक चोक्या असत.किल्ल्याच्या संरक्षणाची छत्रपतींनी उत्तम व्यवस्था केलेली होती.

आरमार बांधणी- आरमाराचे सुभे होते.प्रत्येक सुभ्यात पाच गुराबा व पंधरा गलबते असत. आरमारी सुभेसरसूभ्याच्या हाताखाली असत.सिंधुदुर्ग, विजयदुर्ग व कुलाबा ही आरमाराची मुख्य ठाणी होती. कुलाबा येथे जहाज बांधणीचा कारखाना होता. कुलाबा शब्दाचा अर्थच मुळात गोदी हा आहे. या गोदीमधुन पाल, धुरभ, शिरब आदि. गलबते तयार होत असत. छत्रपतींनी जहाज बांधणी उद्योगामध्ये, वारली, भंडारी, सुतार, कोळी, कातकरी आदि. स्थानिक कारागिरांना स्थान दिले होते. परकीयांची जहाज बांधणीची कला व स्थानिक देशी जहाज बांधणीची कला यांच्या मिश्रणातुन स्वराज्यामध्ये उत्कृष्ट जहाज बांधणी झाली आणि त्यातुन स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या.हे छत्रपतींच्या दुर्गनीतीचे खास वैशिष्ट्य होय. छत्रपतींच्या स्वराज्यात हिरोजी इंदुलकर, मोरोपंत पिंगळे,अर्जोजीयादव हे स्थापत्य विशारद होते.

बदलीची सेवा- छत्रपतींनी गड-किल्ल्यांवर एकच अधिकारी कायम ठेवला नाही. बदलीची सेवा हे तत्व त्यांनी आमलात आणले. हवालदार तीन वर्षानी, तटसरनौबत चार वर्षानी, सबनीस व कारखानीस पाच वर्षानी बदलला जात असे. जगामध्ये आजही ही सेवा देण्याची पध्दत सुरू आहे हे छत्रपतींचे श्रेष्ठत्व होय. त्यामुळे गड-किल्यावरील व्यवस्था नेहमी कार्यक्षम वतत्पर राहत असे.

छत्रपतींनी स्वराज्य संरक्षणाबरोबरच देशरक्षणाचे महत्वाचे कार्य प्रजेच्या मनामध्ये निर्माण करून राष्ट्रवादाची पेरणी केली. यातुन स्वराज्यातील गुणी कर्तव्यतत्पर व कार्यकुशल व्यक्तींना विविध कौशल्य आजमाविण्यासाठी मोठी संधी प्राप्त झाली.महाराजांनी सर्व जाती-धर्मातील लोकांना विविध विभागात नोकरीच्या संधी उपलब्ध करून देऊन त्यांच्या गुणांना संधी दिली. त्यांना स्वराज्याच्या महत्वाच्या कार्यात सामावून घेतले.सर्वसामान्यांचे हित हेच छत्रपतींच्या रोजगार हमी योजनेचे वैशिष्ट्य होते.आज भारत देशातील तरुणाईला नोकरीची कायमस्वरूपी व्यवस्था लावून देण्यासाठी छत्रपतींचा देदीप्यमान वारसा पुढे नेला पहिजे.

शिवसेना उबाठाचा सवाल

गुन्हेगारांचे खुलेआम आव्हान, पोलिस सुरक्षित नाही तर सामान्यांचे काय?

धुळे, दि.३०- धुळे शहरासह संपूर्ण जिल्ह्यात वाढत्या गुन्हेगारी घटनांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. गंभीर गुन्ह्यांतील आरोपींना पकडण्यासाठी गेलेल्या पोलिसांवरच हल्ल्याचे प्रयत्न होत असतील, जमाव पोलिसांच्या कारवाईत अडथळे निर्माण करत असेल आणि आरोपींना पळवून नेण्याचे प्रकार घडत असतील, तर धुळे जिल्ह्यात कायद्याचा धाक उरला आहे की नाही, असा संतप्त सवाल शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने उपस्थित करण्यात आला आहे.

अलीकडेच कुख्यात गुन्हेगार भादा याला पकडण्यासाठी गेलेल्या पोलिसांसमोर त्याने धारदार हत्यार दाखवून स्वत:ला जखमी करण्याचा प्रयत्न करत पोलिसांनाच आव्हान दिल्याची घटना समोर आली. तर दुसरीकडे आझादनगर पोलीस ठाण्यातील गुन्ह्यातील आरोपी बागबान ऊर्फ बागब्बर शहा गुलाब शहा याला ताब्यात घेण्यासाठी गेलेल्या पोलिसांच्या अंगावर जमाव धावून गेल्याचा, शासकीय कामात अडथळा आणल्याचा आणि आरोपीला पळवून नेल्याचा आरोप आहे. या घटनांनी पोलीस यंत्रणेच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न निर्माण केले आहेत.

गुन्हेगारांना राजकीय संरक्षण?

धुळे शहर आणि जिल्ह्यात सक्रिय असलेल्या गुन्हेगारी टोळ्यांना कोणाचे पाठबळ मिळते? पोलीस कारवाईची माहिती आरोपींपर्यंत कशी पोहोचते? आरोपींना वाचवण्यासाठी जमाव एकत्र येण्यामागे कोणाचे प्रोत्साहन आहे? गुन्हेगारांच्या पाठीशी उभे राहणारे कथित राजकीय आश्रयदाते आणि पडद्यामागील किंगमेकर कोण आहेत? या सर्व बाबींचा पोलीस प्रशासनाने निष्पक्ष तपास करून सत्य जनतेसमोर आणावे. गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींकडून सोशल मीडियावर व्हिडिओ प्रसारित करून स्वत:चे उदात्तीकरण केले जात आहे. नागरिकांमध्ये दहशत निर्माण करण्याचा प्रयतक होत आहे. अशा प्रवृत्तींवर केवळ गुन्हा दाखल करून थांबण्याऐवजी त्यांच्या आर्थिक स्रोतांपासून ते सोशल मीडिया नेटवर्क आणि त्यांना मदत करणाऱ्या व्यक्तींपर्यंत तपास पोहोचला पाहिजे.

आज जिल्ह्याला केवळ औद्योगिक क्षेत्रासाठी जमिनी उपलब्ध करून देण्याची गरज नाही, तर त्या जमिनीवर प्रत्यक्ष कारखाने, उत्पादन प्रकल्प, व्यापार केंद्रे आणि रोजगारनिर्मिती करणारे उद्योग उभे राहण्याची गरज आहे.

शहरातील आणि जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी भूमिका स्पष्ट करा. धुळे शहर व जिल्ह्यातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा, वाढत्या गुन्हेगारीचा आणि औद्योगिक विकासाला बाधा आणणाऱ्या असुरक्षित वातावरणाचा प्रश्न घेऊन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने पोलीस प्रशासन व जिल्हा प्रशासनाविरोधात तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शिवसेना जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे उपजिल्हाप्रमुख नरेंद्र परदेशी महानगर प्रमुख धीरज पाटील, तेजस गोटे, निंबा मराठे, भरत मोरे, संदीप सूर्यवंशी, शेखर वाघ, प्रशांत भदाने, डॉ.अनिल पाटील , अण्णा फुलपगारे, राजू ढवळे, जवाहर पाटील, सुनील पाटील, शिवाजी शिरसाळे , मनोज बंब, आनंद जावडेकर, दिलिप चित्ते आदी सह शिवसेना पदाधिकारी यांनी दिला आहे.



साहित्य भारतीतर्फे

म.वाल्मिकी जयंती साजरी नांदी संमेलनाचा आढावा

नंदुरबार, दि.३१ (प्रतिनिधी)- साहित्य भारती, नंदुरबार शाखेतर्फे नुकताच कन्यादान मंगल कार्यालयात आदिकवी महर्षी वाल्मिकी जयंतीनिमित्त प्रतिमापूजन आणि उद्बोधनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. यावेळी साहित्य भारतीचे नंदुरबार जिल्हाध्यक्ष संदीप चौधरी आणि ज्येष्ठ साहित्यिक डॉ. विवेक वैद्य यांनी महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

साहित्य भारतीचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष शशिकांत घासकडबी यांनी महर्षी वाल्मिकी यांचा जीवनप्रवास, रामायण या महाकाव्याची साहित्यिक महत्ता आणि त्यातील साहित्यिक मूल्ये यांविषयी उपस्थित साहित्यिकांना मार्गदर्शन केले. महर्षी वाल्मिकी यांच्या साहित्यिक योगदानाचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी उपस्थितांना उद्बोधित केले.

यानंतर नंदुरबार येथे ४ नोव्हेंबर रोजी आयोजित नांदी संमेलन-लोकसाहित्य संमेलनाच्या तयारीसंदर्भात आढावा बैठक घेण्यात आली. संमेलनाच्या नियोजनासह विविध विषयांवर या बैठकीत चर्चा करण्यात आली. बैठकीचे संचालन साहित्य भारतीचे जिल्हा कार्याध्यक्ष दीपक कुलकर्णी आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेचे जिल्हा कार्यवाह संतोष पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन साहित्य भारतीचे जिल्हा कार्यवाह अभिजित खेडकर यांनी केले.

या कार्यक्रमाला रमाकांत पाटील, सुलभा महिरे, सविता पटेल, रणजित राजपूत, पुष्कर शास्त्री, प्रा.डॉ. माधव कदम, राहुल खेडकर, डॉ.निंबाजी बागुल, रोहन नटावदकर,अजित लांडगे, राहुल कुलकर्णी, पंकज पाठक, जयेश सोनवणे यांच्यासह नंदुरबारमधील अनेक ज्येष्ठ साहित्यिक, महाराष्ट्र साहित्य परिषद व साहित्य भारतीचे सदस्य आणि साहित्यप्रेमी उपस्थित होते.

राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी नेहमी खंबीरपणे उभे भरपाई देण्यासाठी प्रयत्नशील- पालकमंत्री हसन मुश्रीफ

नंदुरबार, दि.३१ (प्रतिनिधी)- पावसाने ओढ दिल्याने जिल्ह्यातील शेतकरी संकटात सापडले असून त्यांच्या पाठीशी राज्य शासन खंबीरपणे उभे आहे. दुष्काळी परिस्थितीत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करण्यास शासन कटिबद्ध असून, त्यांना जास्तीत जास्त नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी प्रयतक केले जातील, असे प्रतिपादन राज्याचे वैद्यकीय शिक्षणमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी केले.



पालकमंत्री मुश्रीफ यांनी आज नंदुरबार तालुक्यातील प्रिंप्री व नांदरखे येथील दुष्काळग्रस्त भागाची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून पिकांची सद्य:स्थिती, नुकसानीची व्याप्ती आणि त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. याप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल, उपविभागीय अधिकारी बंडू कापसे, तहसीलदार संतोष ढेरे आदी उपस्थित होते.

यावेळी शेतकऱ्यांना दिलासा देताना पालकमंत्री मुश्रीफ म्हणाले की, दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन राज्य शासनाकडून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने विविध निर्णय घेतले आहेत.

जिल्ह्यात कमी पावसामुळे पिकांचे नुकसान झाले असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. सेठी यांनी दिली. या पार्श्वभूमीवर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना जास्तीत जास्त भरपाई मिळावी, यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करण्यात येतील. शेतकऱ्यांनी घाबरून जाऊ नये, शासन त्यांच्या पाठीशी असून, त्यांना आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी शासन प्रयतक्शील असल्याचेही पालकमंत्री मुश्रीफ यांनी सांगितले. येत्या एक-दोन दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यात पाच हजार रुपयांची अग्रीम रक्कम जमा करण्यात येणार असल्याची माहिती पालकमंत्री श्री.मुश्रीफ यांनी यावेळी दिली.

रेशन दुकानातील निकृष्ट दर्जाचे अन्नधान्य बंद करा- काँग्रेस पदाधिकाऱ्यांची मागणी

धुळे, दि.३१- रेशन दुकानातील निकृष्ट दर्जाचे अन्नधान्य, गरिबांची ऑनलाइन नावे कट होणे आणि बंद केलेले रेशन कार्ड व आयुष्मान भारत कार्ड चालू करण्याबाबत काँग्रेस पक्षातर्फे सर्वसामान्य आणि गरीब जनतेच्या समस्यांच्या संदर्भात हे निवेदन काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा प्रशासनाकडे सादर केले.

निवेदनात नमुद केले आहे की, दिवाळीच्या वेळेस रेशन दुकानांमधून खूप खराब आणि चुरा असल्यासारखे निकृष्ट दर्जाचे अन्नधान्य वाटण्यात आले आहे, ज्यामुळे गरिबांना मोठा त्रास सहन करावा लागला आहे. अनेक गरीब व मजूर लोकांची, जे अन्नधान्य मिळण्यास खरोखर पात्र आहेत, त्यांची नावे ऑनलाइन प्रणालीतून कट झाली आहेत, ज्यामुळे त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्यात अडचण येत आहे. अनेक लोकांकडे ऑनलाइन नाव नसल्यामुळे त्यांना योजनांचा लाभ किंवा वैद्यकीय उपचार मिळण्यात अडचण येते; त्यामुळे रेशन दुकानदारांनी सर्व कार्डधारकांची नावे ऑनलाइन करून देणे आणि गरजूंना आयुष्मान भारत कार्ड (आयुष्यमान भारत कार्ड) व केसरी कार्ड बनवून देणे आवश्यक आहे. जे खरे गरीब आणि गरजू लोक आहेत, त्यांची बंद पडलेली रेशन कार्ड आणि केसरी कार्ड तातडीने पुन्हा चालू करून देण्यात यावीत. तरी वरील सर्व महत्त्वाच्या मुद्द्यांचा गांभीर्याने विचार करून लवकरात लवकर योग्य ते आदेश देण्यात यावेत आणि गरीब जनतेला न्याय मिळवून द्यावा. आदी मागण्यांची पूर्तता करावी. अशी मागणी काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केली आहे.



तलवारबाजीत हस्ती स्कूलचे यश

दोंडाईचा, दि.३१- हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलित हस्ती पब्लिक स्कूल व ज्यू. कॉलेज विद्यार्थ्यांनी विभागस्तरीय तलवारबाजी (फेन्सिंग) स्पर्धेत दमदार कामगिरी करत घवघवीत यश मिळवत राज्य स्तरावर प्रवेश मिळविला.

सदरील स्पर्धा नंदुरबार येथे दि.२१ व ३२ ऑक्टोंबर दरम्यान नंदुरबार जिल्हा क्रीडा संकुल नंदुरबार येथे विभागीय स्पर्धा आयोजित करण्यात आली. या ठिकाणी शालेय स्तरावरील १४, १७,१८ वर्ष वयोगटात हस्ती स्कूलचे मुले व मुली सहभागी झाले होते. सदर स्पर्धेत हस्ती स्कूलच्या विद्यार्थ्यांनी तीनही गटात आपला दबदबा कायम ठेवत यश मिळविले. यांत हस्ती स्कूलचे सहा मुलांनी यश संपादन करत राज्य स्तरावर प्रवेश मिळविला. प्राची खंडेराय, समीक्षा सपकाळे, जानवी बोरसे, आर्या सोनार, जिग्नेश पवार, स्पंदन रामोळे, यांनी यश मिळविले.

नांदी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदी डॉ.सूर्यवंशी

धुळे, दि.३१- महाराष्ट्र साहित्य परिषद आयोजित नांदी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी खान्देशातील साहित्यिक, अहिराणी भाषा व संस्कृतीचे अभ्यासक आणि खान्देश साहित्य संघाचे अध्यक्ष प्रा. डॉ. सदाशिव सूर्यवंशी यांची निवड करण्यात आली आहे.



महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या झालेल्या बैठकीत धुळे जिल्हा प्रतिनिधी, अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांसह झालेल्या बैठकीत ही निवड झाली. या निवडीचे मसाप पुणेचे अध्यक्ष योगेश सोमन यांच्या अध्यक्षतेत जयहिंद महाविद्यालयात पार पडलेल्या बैठकीत अभिनंदन करण्यात आले.

डॉ.सूर्यवंशी यांच्या या निवडीबद्दल श्री.शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे चेअरमन मा.आ.कुणाल पाटील,उद्योजक विनय पाटील, अ श्विनी पाटील, युवा नेते रायबा पाटील, उपाध्यक्ष डॉ. एस.टी.पाटील, प्राचार्य डॉ. जितेंद्र तलवारे, प्राचार्य डॉ.आशुतोष पाटील, मा.मुख्याध्यापक शंकरराव देवरे संस्थेच्या सर्व पदाधिकारी व कर्मचाऱ्यांसह खान्देश साहित्य संघाचे रमेश बोरसे, सुभाष आहिरे, प्राचार्या रत्ना पाटील, डॉ.फुला बागुल, सुमन महाले, शरद धनगर, देवदत्त बोरसे, विजय पाटील, सुनिता पाटील, नरेंद्र निकुंभ, दिनेश नाईक, डॉ.बापूराव देसाई, श्री.चुडामण पाटील, प्रा.एल.जे.सोनवणे, रावसाहेब कुंवर, डॉ.नरेंद्र खैरनार व सर्व पदाधिकाऱ्यांनी डॉ.सदाशिव सुर्यवंशी यांचे अभिनंदन केले.

याप्रसंगी धुळे नंदुरबार जिल्हा प्रतिनिधी डॉ.संजीव गिरासे, माजी प्रतिनिधी डॉ.शशिकला पवार, डॉ. उषा पाटील, डॉ.मोहन मोरे, डॉ.चुडामण पगारे, डॉ.सुरेंद्र मोरे,डॉ.सुनिल पवार, डॉ.वर्षा पाटील, डॉ.पापालाल पवार, डॉ.वाल्मिक आढावे, प्राचार्य डॉ.सुनिल पाटील, डॉ.ज्ञानेश्वर सुर्यवंशी, डॉ.अमोल पाटील, पी.सी.पाटील, ए.एम.सुर्यवंशी, प्रभाकर शेळके, भगवान पाटील, डॉ.डी.के.पाटील, डॉ. नेरकर यांची उपस्थिती होती.

आपला महाराष्ट्र
वाचकांना विनम्र सुचना

आपला महाराष्ट्र वृत्त पत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहीरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबधी आर्थिक व्यवहार करावा जाहीरातीतील आपल्या उत्पन्नाच्या संदर्भात अथवा सेवेच्या संदर्भात जाहीरातदार जे दावे करतात त्याची आपला महाराष्ट्र वृत्तपत्र समुह कोणतीही हमी घेत नाहीत जाहीरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहीरातदारांकडून न झाल्यास होणाऱ्या परिणामास आपला महाराष्ट्र वृत्तपत्र समुहाचे मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक जबाबदार रहाणार नाहीत कृपया वाचकांनी यांची नोंद घ्यावी.

एकाच छता खाली दिवाळी अंक

एकाच छताखाली राज्यातील नामवंत दिवाळी अंक अल्प खर्चात उपलब्ध. धुळे जिल्ह्यातील १७२ वर्षाची परंपरा असणाऱ्या धोंडो शामराव गरुड जिल्हा वाचनालय, जेलरोड धुळे आपल्या सेवेसाठी दिवाणी अंकाची मेजवानी दिनांक ७ नोव्हेंबर २०२६ पासून आणत आहे.

दिवाळी अगोदर वर्गणी भरणाऱ्यांना २०० रु. दिवाळीत म्हणजेच दिनांक ७ नोव्हेंबर नंतर वर्णणीदार होणाऱ्यांना २५० रुपये लागतील.

ही वर्गणी सलग चार महिन्यासाठी असल्याने वाचकांना मोठा लाभ होणार आहे.

टिप : वाढत्या महागाईमुळे दिवाळी अंकाच्या किंमती गगनास भिडल्या असल्याने सर्वांनी वाचनालयाने सुरु केलेल्या योजनेचा लाभ घ्यावा.

धों. शा. गरुड जिल्हा वाचनालय, जेलरोड, धुळे

जाहीर नोटीस

तमाम जनतेस, सर्व हित संबंधीतांना तसेच सर्व वित्तीय संस्था व स्थानिक स्वराज्य संस्था यांना या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीचे मालक **श्री.संजय नंदलाल अग्रवाल,श्री.सुनिल नंदलाल अग्रवाल,श्री.मनिष नाथुराम उपाध्ये,श्री.श्रीपाल किरण सिंघवी व सौ.योगीता मनिष उपाध्ये** सर्व रा.धुळे यांच्याशी आमचे अशिल यांनी खालील नमूद मिळकत कायमस्वरूपी विकत घेण्याचा सौदे करार केलेला असून लवकरच सदर खरेदीचा व्यवहार पूर्ण होणार आहे,सदर मिळकतीच्या टायटल व्हेरिफिकेशन हेतू सदर जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे.

सदर मिळकतीत कोणाचेही कोणतेही प्रकारचे मालकी हक्क, हिस्सा, हितसंबंध, कोणाचेही गहाण, बोजा, टांच, जप्ती, भाडेपट्टा वा लिज हक्क, ताबा हक्क वा सौदेकरार हक्क अगर खरेदी हक्क वगैरे काहीही असल्यास किंवा संकल्पीतव्यवहारास कोणत्याही प्रकारे हरकत वा विरोध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आंत त्याबददल स्वताच्या हक्काच्या प्रमाणीत झेरॉक्स प्रसितसह आम्हास खालील नमूद पत्त्यावर लेखी कळवावे, परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतीचा तसेच दस्तऐवजांशिवाय घेतलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

नियोजीत मुदतीत कोणाचीही साधार व लेखी तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निर्बोज असून तथाकथीत हक्क व अधीकार संबंधीतांनी सोडून दिलेले आहे असे समजून सदर व्यवहार पुर्ण करण्यात येईल. या नंतर कोणीही काहीही तक्रार, हितसंबंध अगर हक्क दाखविल्यास ते आमचे आशिल आणि सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही,याची नोंद घ्यावी,कळावे.

परिशिष्ट: मौजे नगाव बु ता.जि.धुळे येथील गट नं.३०२/१ चे क्षेत्र ला.ला. १ हे ८७ आर + पो.ख.०० हे.३८ आर असे एकूण क्षेत्र २ हे २५ आर यासी आकार रू. २.५५ पैसे मात्र ची शेतमिळकत, यासी चर्तु सिमा गावनकाशाप्रमाणे व येणेप्रमाणे असे.

पुर्वेस	–	शेत गट कंमाक ३०३/ १ अ २
पश्चिमेस	–	शेत गट कंमाक ३२८/५/६
दक्षिणेस	–	शेत गट कंमाक ३०२/२
उत्तरेस	–	शेत गट कंमाक ३२६/१/३

सदर जाहीर नोटीस अशिलाने दिलेल्या माहिती व अधिकारावरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे. दिनांक.३१/१०/२०२६

ॲड.अनिल सुरेश अग्रवाल
गल्ली क्र. ४, क्रांती कॉम्पलेक्स जवळ, भांडे बाजार, धुळे ७७०९७७२७५७

जाहीर हरकत नोटीस

तमाम जनतेस वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, व सर्व संबंधीतांना तसेच **खाजगी दलालांना व मयुरेश बिल्डर्स व भास्कर बिजय देशमुख** यांना जाहीर हरकत नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन : **मौजे धुळे मनपा हद्दीतील मौजे धुळे येथील सिटी सर्व्हे नं. १४६४/१/१अ क्षेत्र ४०५.३० चौ. मी. धारणाधिकर अ** (नवग्रही ग. नं. २ धुळे) यातील देशमुख अपार्टमधील यांसी अभिलेखात असलेल्या नकाशाप्रमाणे.

सदरील मिळकतीबाबत आमचे पक्षकार जगन्नाथ झिपरु वाणी (मयत) यांचे वारस वसंत जगन्नाथ वाणी यांनी या मिळकतीचे सुमारे १९९२ पासूनचे कब्जेदार धारक यांनी देशमुख अपार्टमेंटचे **मयुरेश बिल्डर्स व कै. विजय विष्णु देशमुख यांचे वारस भास्कर विजय देशमुख** यांचेशी बेसमेंट तळमजलाचा तोंडी व लेखी सौदे करार केलेला असून त्याबाबत त्यांना वेळोवेळी संपूर्ण रक्कमेचा भरणा केलेला आहे. सदरची रक्कम साक्षीदारांसमक्ष अदा केलेली होती व आहे. सदरील प्रकरणात मयुरेश बिल्डर्स व व्ही. व्ही. देशमुख, भास्कर देशमुख यांच्यात उद्भवलेल्या वादामुळे सदरील मिळकतीचे वरील सौदे कराराप्रमाणे आमचे पक्षकाराच्या लाभात खरेदी होवू शकली नाही. सदरील सौदे करारानुसार या प्रकरणाचा गैरफायदा घेवून मिळकतीचे सध्याचे वादातील मालक हे प्रस्तुत मिळकतीबाबत त्रयस्थांशी सौदे करार करण्याच्या प्रयत्नात आहेत असे आम्हाला खात्रीशीर माहिती मिळाली आहे.

सदरील मिळकत ही दि. १७/८/२०२६ पावेतो आमच्या पक्षकाराकडे ताबा होता परंतु दरम्यानच्या काळात आमचे पक्षकार त्यांच्या व्यवसायाच्या कामानिमित्ताने पुणे येथे गेलेले असल्याचा गैरफायदा घेवून सदरील मिळकतीवरच्या बेसमेंट मध्ये अनमोल बाजार नावाचे दुकान आमच्या पक्षकाराचा ताबा व दुकानास कुलपे असतांना देखील श्री. भास्कर देशमुख याने बेकायदेशीरपणे कुलुपे तोडून ताबा घेतला आहे. त्यासंदर्भात आम्ही पोलीस निरिक्षक धुळे शहर पोलीस स्टेशन धुळे यांचेकडे २०/८/२०२६ रोजी तक्रार दाखल केलेली आहे. त्या तक्रारीच्या अनुषंगाने आम्ही श्री. भास्कर देशमुख व इतर यांचे विरुद्ध दिवाणी व फौजदारी स्वरुपाची कायदेशीर कार्यवाही करणार आहेत.

सदर मिळकतीवर कोणीही परस्पर सौदा किंवा करार करु नये वा गैरफायदा घेवून सदर मिळकत कोणीही त्रयस्त इसमास विक्री, विक्री, दान, बक्षिस, गहाण व तत्सम कर्ज बोझे करण्याच्या मनोदयात आहे. तसेच सर्व शासकीय, निमशासकीय, बँका, पतसंस्था, यांना देखील या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वर नमूद मिळकतीवर कुठल्याही प्रकारे कुठल्याही योजने अंतर्गत कर्ज पुरवठा करुन देवू नये. सदरची मिळकतीशी कोणीही विक्री, गहाण, लीज वा तत्सम प्रकारे कुठलाही व्यवहार करु नये या उपरही कोणी व्यवहार केल्यास व त्याची फसवणूक झाल्यास अथवा त्यांचेवर दिवाणी अथवा फौजदारी कार्यवाही झाल्यास त्यास अशिल जबाबदार राहणार नाहीत. सदरच्या मिळकतीशी कोणीही कुठल्याही प्रकारे व्यवहार करु नये. त्याउपरही असा व्यवहार केल्यास तो बेकायदेशीर मानण्यात येईल तसेच सदरचा व्यवहार हा आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. तसेच त्याच्या होणाऱ्या संभाव्य खर्चास व परिणामांस व्यवहार करणारी व्यक्ती सर्वस्वी जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी.

प्रस्तुतची जाहीर हरकत नोटीस आमचे पक्षकारांनी दिलेल्या तोंडी माहिती व दाखविलेल्या कागदपत्रानुसार व अधिकारावरुन त्यांचे वतीने आमचे मार्फत प्रसिद्धीस देण्यात आली आहे.

धुळे दि. ३१/१०/२०२६

ॲड.दिनेश काशिनाथ काळे मो.९३७००६१४७७
पत्ता : ५३ श्रीपादवाडी वरखेडी रोड, धुळे

जाहीर हरकत नोटीस

तमाम जनतेस वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था,. तसेच प्रियदर्शना कुलदीप शाह सर्व बांधवांना या जाहीर हरकत नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन : तु. जि. धुळे पो. तु. ता. धुळे जि. प. स. ता. प. स. धुळे पैकी धुळे म. न. पा. हद्दीतील मौजे नकाणे येथील शेतजमीन गट नं. १५६/२ क्षेत्र लावणीलायक ० हेक्टर ५२ अगर. पोट खराब ०.०० आर. आकार रुपये ३.५५ पैसे यांसी चतु:सिमा पुढील प्रमाणे.

पुर्वेस : गट नं. १५८ पश्चिमेस : गट नं. १६१
दक्षिणेस : गट नं. १५७ उत्तरेस : याच गटाचा उर्वरित भाग

प्रस्तुत मिळकतीबाबत सखाराम तुकाराम पाटील रा. नकाणे ता. जि. धुळे यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्र. २०४/२०२४ हा घोषित होवून मिळण्यासाठी सरस निरस मानाने वाटणी होवून मिळण्यासाठी व कायमचे मनाई हुकूमासाठी दाखल केला असून प्रस्तुत दावा हा प्रलंबित असून त्याची पुढील सुनावणी दि. १९/११/२०२६ रोजी ठेवण्यात आलेली आहे. असे असतांना देखील प्रियदर्शना कुलदीप शाह या प्रस्तुत मिळकत ही त्रयस्थांस हस्तांतरण करण्याच्या प्रयत्नात आहेत. अशी खात्री लायक बातमी सखाराम तुकाराम पाटील यांना विश्वासू व्यक्तीकडून माहिती झालेली आहे.

तरी वर नमूद मिळकतीबाबत कोणीही स्वरुपाचा हस्तांतरण व्यवहार करु नये. तसेच त्रयस्थ हक्क निर्माण करु नये तसे केल्यास तो न्यायालयाचा अवमान होईल तसेच त्याचे पुढील संभाव्य परिणामास, नुकसानीस त्रयस्थ व्यक्ती हा बांधील असेल याची नोंद घ्यावी. कळावे.

येणे प्रमाणे जाहीर हरकत नोटीस असे. धुळे दि. ३१/१०/२०२६

ॲड.जगदीश बी. पगारे
ऑफिस : बी.४, श्रीतेज बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स, साईबाबा मंगल कार्यालयाजवळ, नकाणे रोड, देवपूर धुळे **मो. ९९२३३१८९३३**

जाहीर नोटीस

ॲड. सी. डी. भंडारी
शहादा ता. शहादा जि. नंदुरबार

शहादा येथील महाशय दिवाणी न्यायाधीश सो. (व.स्तर) यांचे कोर्टात

दि. कि. अर्ज नं. ४४८/२०२६

सुभाष सरदार पावरा, वय ५३, धंदा : शेती
रा. बिलाडी त. ह. ता. शहादा जि. नंदुरबार ...अर्जदार
विरूद्ध
कोणीही नाही ...सामनेवाला
कै. सरदार मनशी पावरा (मृत्यू दि. १९/०५/२०२१/ ...मयत

अर्ज :– दि बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चॅप्टर VIII चे कलम २ व ७ प्रमाणे वारस दाखला (Legal Heirship Certificate) मिळणेसाठी.

ज्याअर्थी अर्जदाराचे वडील मयत कै. सरदार मनशी पावरा हे मौजे बिलाडी त. ह. ता. शहादा जि. नंदुरबार येथील रहिवासी होते व त्यांचा मृत्यू दि. १९/०५/२०२१ रोजी मौजे बिलाडी त. ह. ता. शहादा जि. नंदुरबार येथे झाला असल्याने त्यांचे पश्चात त्यांना वारस १) सुभाष सरदार पावरा : मुलगा, २) सोमाबाई भिमसिंग पावरा : मुलगी, कायदेशीर वारस असल्याने वर नमूद अर्जदाराने सन १८२७ चे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टमधील ८ चे कलम २ व ७ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी शहादा येथील म. दिवाणी न्यायाधिश सो. (व.स्तर) यांचे कोर्टात दि.१४/१०/२०२६ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील अर्जासंदर्भात कोणास काही म्हणणे अगर हरकत सादर करावयाचे असल्यास ते सादर करण्यासाठी दि.१८/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: अगर वकिलामार्फत शहादा येथील म. दिवाणी न्यायाधिश सो. व.स्त. शहादा यांचे न्यायालयात हजर राहून लेखी म्हणणे सादर करावे.

तरी तमाम जनतेस या नोटिसीने कळविण्यात येते की, वर नमूद केलेल्या दिवशी किंवा नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत कोणीही व्यक्ति स्वत: अगर आपल्या वकिलामार्फत हजर न झाल्यास सदर अर्जाच्या बाबतीत कोणाचीही काहीएक तक्रार नाही असे गृहीत धरण्यात येवून सदर अर्जात पुढील योग्य ते हुकुम होतील याची नोंद घ्यावी.

आज तारीख १५/१०/२०२६ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी सदरची जाहिर नोटीस दिली आहे. आदेशावरुन

सही.... (कोर्टाचा शिक्का) सही...
क. लिपीक **सहा. अधिक्षक**
म. दिवाणी न्यायालय (व. स्तर) शहादा

CHANGE NAME

I Have Change
My Old Name From
DHANSHRI GULAB DHANGAR
To New Name
DHANSHRI GULAB BAGUL
As Per Documents
Add : Plot No. 16
Maa Oshiya Vihar
Jijamata College Road
Nandurbar - 425412

CHANGE NAME

I Have Change
My Old Name From
DARSHAN GULAB DHANGAR
To New Name
DARSHAN GULAB BAGUL
As Per Documents
Add : Plot No. 16
Maa Oshiya Vihar
Jijamata College Road
Nandurbar - 425412

CHANGE OF NAME

MY OLD NAME WAS
RUBEENA BANO BINTE MOHAMMAD NAEEM ANSARI
MY NEW NAME IS
ANSARI RUBEENA BANO AQEEL AHMAD
ADD- 50, MAULVINGANJ, MAULANA AZAD SCHOOL, DHULE-424001.

चौकशीची जाहीर नोटीस

जा.क्र. / न्या.वि./ ४१४२/ २०२६
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाशिक जिल्हा, नाशिक
जानकी प्लाझा, खरवंदा पार्क, पुणेरोड,द्वारका, नाशिक.
दिनांक : ०९/०९/२०२६
चौकशी अर्ज नंबर : ५४/२०२६

सार्वजनिक न्यासाचे नांव : साळवे हातनूर एज्युकेशन सोसायटी,साळवे,ता. शिंदखेडा,जि.धुळे पी.टी.आर.नं. : एफ २०२७ (धुळे)

या बाबत संबंधीत लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, धर्मदाय सह. आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक हे वर नमूद केलेल्या चौकशी अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था १९५० चे कलम ४७ अन्वये विश्वस्त नियुक्तीसाठी खालील मद्दयावर चौकशी करणार आहेत.

न्यासाचे विश्वस्त होण्यासाठी खालील व्यक्तींनी अर्ज केलेला आहे.

अर्जदार :

१. खंडू रामदास पाटील, वय : ८३, धंदा : सभासद व शेती, रा.: साळवे, ता.शिंदखेडा,जि.धुळे
२. रमेश खंडेराव शिंदे, वय : ४३, धंदा : विश्वस्त व व्यापार,रा.: साळवे, ता. शिंदखेडा, जि. धुळे
३. भारती रावसाहेब पाटील,वय : ४४, धंदा : नोकरी व समाजकार्य, रा.: १२, कालिका देवी नगर, गोळीबार टेकडी जवळ, साक्री रोड, जि. धुळे.
४. रामकृष्ण विजय माळी,वय : २९, धंदा : शेती व समाजकार्य, रा.: साळवे, ता.शिंदखेडा, जि. धुळे
५. सोनाली रविंद्र पाटील,वय : ३३, धंदा : नोकरी व समाजकार्य, रा.:साळवे, ता.शिंदखेडा,जि.धुळे
६. खुशालसिंग दरबारसिंग गिरासे,वय : ३९, धंदा :व्यापार व समाजकार्य, रा.: साळवे,ता. शिंदखेडा,जि.धुळे
७. शोभाबाई सुनिल पाटील,वय : ४४, धंदा : गृहिणी व सामाजकार्य, रा.: मु. डांगरी, पो. मुडी,ता.अंमळनेर, जि.जळगांव.
८. विनोद रविंद्र पाटील, वय : ३२, धंदा : शेती व समाजकार्य, रा.: विसराने, ता.जि.धुळे
९. उमेश ओंकार पाटील, वय : ३९, धंदा : शेती व समाजकार्य, रा.: साळवे, ता.शिंदखेडा, जि.धुळे
१०. स

पान १ वरुन

इंडियाची रामलीला मैदानाव आज ऐतिहासीक रॅली

विनंती केली होती.

राहुल गांधींची भूमिका

या व्यापाऱ्यांच्या मागणीवर राहुल गांधी यांनी मएक्सफ (पूर्वीचे ट्विटर) वर स्पष्ट केले की, जर निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवले, तर विरोधकांचे हे आंदोलन अवघ्या ३० सेकंदांत थांबेल.या भव्य रॅलीच्या माध्यमातून मइंडियाफ आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आपली शक्ती दाखवणार असून, या मंचावरून विरोधी पक्षांचे नेते केंद्र सरकारवर कोणती नवी तोफ डागणार, याकडे संपूर्ण देशाचे राजकीय वर्तुळ लक्ष ठेवून आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूच्या हस्ते धर्मध्वजारोहण

या सोहळ्यातील प्रत्येक विधी अत्यंत श्रद्धाभावाने पार पडला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी प्रथम यज्ञकुंडात आहुती अर्पण केली. या पवित्र सोहळ्याला विविध आखाड्यांचे महंत, धर्माचार्य आणि साधू-संतांच्या उपस्थितीने विलक्षण आध्यात्मिक उंची प्राप्त झाली. जगद्गुरू श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज, श्रीमहंत ज्ञानदास महाराज, मंगलपीठाधीश्वर श्री १००८ माधवाचार्य महाराज, अखिल भारतीय आखाडा परिषदेचे अध्यक्ष श्रीमहंत रवींद्रपुरी महाराज, श्री पंच निर्मोही अग्नी आखाड्याचे श्रीमहंत राजेंद्रदास महाराज, महंत संजयदास महाराज, श्रीमहंत मुरलीदास महाराज, श्रीमहंत वैष्णवदास महाराज, पंच दिगंबर अग्नी आखाड्याचे श्रीमहंत माधवदास महाराज, श्रीमहंत मोहनदास महाराज, महंत भक्तिचरणदास महाराज आणि महंत रामसकेही महाराज यांच्यासह साधू-संत व भाविक या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार ठरले. धार्मिक विधींचे पौरोहित्य पुरोहित संघाचे सतीश शुक्ल आणि अध्यक्ष चंद्रशेखर पंचाक्षरी यांनी केले.

या सोहळ्यास आमदार सुहास कांदे, गोकुळ गिते, राहुल ढिकले, देवयानी फरांदे, सीमा हिरे, सरोज अहिरे, दिलीप बनकर विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, उपमहापौर विलास शिंदे, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त जलज शर्मा, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंता अरुंधती शर्मा, अधीक्षक अभियंता देवेंद्र पवार, प्राधिकरणाचे अतिरिक्त आयुक्त कमलाकर रणदिवे आणि प्रमोद पवार आदी अधिकारी उपस्थित होते.

हेलिकॉप्टर कोसळले वैमानिकासह सहा ठार

हेलिकॉप्टर कोसळले. उड्डाण केल्यानंतर काही वेळातच जोशीमठ खोऱ्यावरून जात असताना या हेलिकॉप्टरचा एअर ट्रॅफिक कंट्रोल आणि ट्रॅकिंग सिस्टमशी संपर्क तुटला. अपघाताची माहिती मिळताच भारतीय सैन्य, पोलीस, एसडीआरएफ आणि आयटीबीपी च्या तुकड्यांनी घटनास्थळी धाव घेतली. अत्यंत दुर्गम डोंगराळ भाग आणि प्रतिकूल हवामानाचा सामना करत बचाव पथकाने सर्व सहा जणांचे मृतदेह बाहेर काढले.मृतांमध्ये कॅप्टन हिमांशू सभरवाल (वैमानिक - दिल्ली, अरुण साळुंके बेंगळुरू गुन्हे शाखा निरीक्षक, शंकर गौडा अधिवक्ता / वकील, एच. एस. नटराजा शिक्षणतज्ज्ञ, प्रताप गौडा कंत्राटदार, सुधीर के. प्रवासी यांचा समावेश आहे.

प्राथमिक माहितीनुसार, या भागात गेल्या काही दिवसांपासून पाऊस, बर्फवृष्टी आणि दाट धुके असल्याने हवामान अत्यंत खराब होते. दृश्यमानता कमी झाल्यामुळे हा अपघात झाला असावा, असा अंदाज वर्तवला जात आहे.

उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी या घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले असून अपघाताच्या सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून नागरी विमानन विकास प्राधिकरणाने संबंधित ट्रान्स भारत एविएशन कंपनीच्या सर्व हेलिकॉप्टरच्या उड्डाणांवर तूर्तास बंदी घातली आहे. केंद्र सरकारच्या एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरो आणि नागरी विमानन महासंचालनालयाचे पथक या अपघाताचा पुढील तपास करत आहे.

पांझरेत के.टी.वेअरवर पाट्या बसवून पाणी

ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष हेमंत भडक यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकाऱ्यांनी आमदारांची भेट घेऊन या प्रश्नावर सविस्तर चर्चा केली. यावेळी पांझरा नदीवरील सिंधी कॉलनीजवळील तसेच प्रभातनगर परिसरातील के.टी. वेअर बंधाऱ्यांमध्ये लोखंडी पाट्या बसविण्याची आवश्यकता पदाधिकाऱ्यांनी आमदारांच्या निदर्शनास आणून दिली. बंधाऱ्यांमध्ये पाट्या नसल्यामुळे नदीपात्रातील पाणी वाहून जात आहे. या ठिकाणी पाट्या बसवून पाणी अडविल्यास त्याचा साठा वाढण्यासह धुळे शहरातील भूजलपातळी वाढण्यास आणि परिसरातील पाणी उपलब्धतेस मदत होऊ शकते, अशी भूमिका संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी मांडली. चर्चेदरम्यान आमदार अनुप अग्रवाल यांनी आंदोलन स्थगित करण्याबाबत पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली. आगामी काळात पांझरा नदीला पाण्याचे आवर्तन सोडण्यात येईल, त्यावेळी संबंधित के.टी. वेअर बंधाऱ्यांवर लोखंडी पाट्या बसवून पाणी अडविण्याची कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले. नदीतील पाणी अडविण्याच्या मागणीबाबत आमदारांनी सकारात्मक भूमिका दर्शविल्याने संभाजी ब्रिगेडने तूर्त आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला. मात्र, प्रत्यक्ष नदीला आवर्तन सोडताना बंधाऱ्यांवर लोखंडी पाट्या बसविण्यात आल्या नाहीत, तर पुन्हा आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी दिला. त्यामुळे आंदोलन पूर्णपणे मागे न घेता आमदारांच्या आश्वासनाच्या पार्श्वभूमीवर तूर्त स्थगित करण्यात आले आहे. दरम्यान, धुळे शहरातील सावरकर पुतळ्यासमोरील अंजनशादाता सरकार परिसरातील पुलाचे काम नव्याने करण्यात येणार असून, या पुलाची उंचीही वाढविण्यात येणार असल्याची माहिती आमदार अनुप अग्रवाल यांनी दिली. या पुलाच्या ठिकाणीही संभाजी ब्रिगेडच्या मागणीनुसार पाट्या बसवून पाणी अडविण्याचे नियोजन करण्यात येईल, असे त्यांनी चर्चेदरम्यान स्पष्ट केले. या भेटीप्रसंगी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष हेमंत भडक, जिल्हा सचिव महेश पाटील, अमर फरताडे, ज्येष्ठ पत्रकार गोकुळ देवरे आणि मुक्त पत्रकार धनंजय गाळणकर यांनी चर्चेत सहभाग घेतला. पांझरा नदीतील उपलब्ध पाणी अडवून त्याचा योग्य विनियोग व्हावा, शहरातील भूजलपातळी वाढण्यास मदत व्हावी आणि आगामी काळातील संभाव्य पाणीटंचाईची तीव्रता कमी व्हावी, या उद्देशाने संभाजी ब्रिगेडने हा विषय सातत्याने लावून धरला आहे.

स्व.सरदार वल्लभभाई पटेल स्व.इंदिरा गांधीना श्रध्दाजली



उपाध्यक्ष तथा धुळ्याचे बूथ लेव्हल एजंट (बीएलए-१) भा. ई. नगराळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनीही दोन्ही महान नेत्यांच्या कार्याचे स्मरण करून अभिवादन केले. या प्रसंगी धुळे शहर काँग्रेस सेवादल अध्यक्ष राजेंद्र खैरनार, धुळे शहर काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष सुधीर जाधव, काँग्रेस ओबीसी विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. विलासराव पाटील, धुळे शहर काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस भीवसन अहिरे, गोविंद वाघ, महेंद्र निकम, धुळे शहर काँग्रेस उपाध्यक्ष प्रा. किशोर वाकळे, स्मिता वाकळे, विशाखा विलासराव पाटील आदी उपस्थित होते. दरम्यान, मिल कामगारांचे नेतृत्व करणारे मच्छिंद्र येडगावकर यांच्या वाढदिवसानिमित्त भा.ई. नगराळे यांच्या हस्ते त्यांना पुष्पहार अर्पण करून शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाच्या सरतेशेवटी राजेंद्र खैरनार यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमातून इंदिरा गांधी यांच्या स्मृतींना उजाळा देतानाच सरदार वल्लभभाई पटेल यांच्या राष्ट्रउभारणीतील योगदानाचे स्मरण करण्यात आले.

पान १ वरुन

तोंदे नाल्यावर बंधाऱ्याचे भूमिपूजन

भाईंचे २० वर्षांपासून जलसंधारणाचे सातत्यपूर्ण प्रयत्न :

यावेळी मनोगत व्यक्त करताना आमदार काशिराम दादा पावरा म्हणाले की, माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल आणि भूपेशभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली शिरपूर तालुक्यात शिरपूर पॅटर्नअंतर्गत जलसंधारणाची कामे सातत्याने सुरू आहेत. गेल्या वर्षांपासून तालुक्यातील भूजल पातळी वाढविण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने बंधारे बांधणे, नाल्यांचे खोलीकरण आणि पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवून ते जमिनीत जिरविण्याचे प्रयत्न केले जात आहेत. या प्रयतक्नांमुळे शिरपूर तालुक्यात भूजल पातळीत सकारात्मक बदल झाला असून, महाराष्ट्रातील अनेक भागांत दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली असतानाही शिरपूर तालुक्यात भूजल पातळी समाधानकारक राहण्यास मदत झाली आहे. याचा थेट फायदा शेतकरी बांधवांना होत असून शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढण्याबरोबरच सिंचनाचा प्रश्नही काही प्रमाणात सुटण्यास मदत होत आहे. शिरपूर पॅटर्नच्या माध्यमातून सुरू असलेली ही जलसंधारणाची चळवळ भविष्यातही अधिक व्यापक स्वरूपात सुरू राहणार असून, प्रत्येक गावात पाण्याचे योग्य नियोजन करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयतक असल्याचे त्यांनी सांगितले.

शिरपूर पॅटर्नचे प्रकल्प संचालक तुकाराम दोरीक यांनी शिरपूर पॅटर्न बाबत सविस्तर माहिती देऊन तोंदे येथील नाल्यावर बांधण्यात येणाऱ्या बंधाऱ्यामुळे होणाऱ्या फायद्याबाबत तांत्रिक माहिती विशद केली. यावेळी के. डी. पाटील, अनिल पाटील, देविदास कोळी यांनीही मनोगत व्यक्त करून शिरपूर पॅटर्न अंतर्गत बंधारे बांधण्याच्या अविरत कार्याबद्दल भाईंचे आभार मानले.

जि.परिषदेच्या अंबडपाणी शाळेत

केले. त्यावेळी शाळेच्या प्रत्येक वर्ग खोलीस कुलूप होते. तर स्वच्छतागृहांची दुरावस्था असून विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय नसल्याचे स्पष्ट झाले. शाळेत असताना विद्यार्थ्यांना तहान लागली तर विद्यार्थ्यांना घरी जावे लागते. घरी गेलेला विद्यार्थी पुन्हा शाळेवर येणे श्नय होत नाही. त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. याबाबत आम्ही जिल्हा परिषद, जिल्हाधिकारीस, आमदारांकडे निवेदन देणार असल्याचे शिरपूर फस्टच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. त्यावेळी तेथे अंगणवाडी व्यवस्थापन सांभाळणाऱ्या राधेश्याम पावरा या व्यक्तीने कार्यकर्त्यांना शाळेचे चित्रीकरण्यास प्रतिबंध करीत आरेरावी केली. या प्रकाराची आणि शाळेच्या वस्तुस्थितीची आमदार काशिराम पावरा, माजी शिक्षण.मंत्री आमदार अमरिशभाई पटेल यांनी गंभीर दखल घ्यावी, अशी मागणी पदाधिकाऱ्यांची आहे. शाळेच्या परिस्थितीत बदल झाला नाही तर आम्ही तीव्र आंदोलन करणार, असा इशारा पदाधिकाऱ्यांनी दिला.

जळगावातील भोकर येथे स्टेट बँकेवर दरोडा

पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. पोलिसांनीही कारवाई करत इतर आरोपींना ताब्यात घेतले.

या कारवाईत तीन संशयित आरोपींना अटक करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. तसेच लुटीतील काही मुद्देमाल आणि बॅगा पोलिसांनी हस्तगत केल्या आहेत. मात्र, या दरोड्यात सहभागी असलेले आणखी काही आरोपी बेपत्ता असून त्यांचा शोध सुरू आहे.

मंत्री गुलाबराव पाटील यांची पहाणी

या गंभीर घटनेची माहिती मिळताच मंत्री गुलाबराव पाटील यांनी दरोडा पडलेल्या बँके शाखेला भेट देऊन पाहणी केली. दरम्यान, अटक करण्यात आलेल्या संशयित आरोपींची पोलिसांकडून कसून चौकशी सुरू असून दरोड्यातील संपूर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यासाठी तपास सुरू आहे. भरदिवसा बँकेत झालेल्या या सशस्त्र दरोड्यामुळे जिल्ह्यातील बँकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

धुळ्यात 'प्लास्टो' आणी इतर सर्व नामांकित कंपनीच्या पाण्याच्या टाक्या आमच्याकडे होलसेल रेटमध्ये उपलब्ध आहेत..



१०० ते १०,००० लिटर पर्यंत गोल व चौरस टाक्या होलसेल रेट व हजर स्टॉक मध्ये उपलब्ध आहे.

धुळ्यात प्लास्टो कंपनीच्या टाक्या मिळण्याचे एकमेव ठिकाण...

शंकर विजय सॉ मिल

प्रकाश टॉकीज समोर, पारोळा रोड, धुळे.

फो. 9422285091

विकणे आहे

वलवाडी गोंदुर रोड दुकान फर्निचर पीओपीसह विकणे आहे. व भोकर शिवारात विमानतळ फाटा सर्व्हे नं.९/१/२ मधील प्लॉट विकणे आहे.

9011894666

पाहिजेत

दुकानात कामासाठी मुले/मुली त्वरीत पाहिजेत

-: समक्ष भेटा :-

मुंदडा बुक स्टॉल

मुंदडा मार्केट, धुळे

श्री नेत्रालय हॉस्पिटल नवीन जागेत

विश्वकर्मा कॉम्प्लेक्स, १ ला मजला, दत्तमंदिर चौक, देवपूर, धुळे

- कॉम्प्युटरच्या सहाय्याने डोळे तपासणी व उपचार
- फेको पद्धतीने व बिनटाक्याच्या पद्धतीने माफक दरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येईल.
- तपासणी वेळ : संध्या. ४ ते रात्री ९ पर्यंत

मो.नं.९५१८३९७५९२ / ९४२१५१७६६३

शेतजमिन विकणे आहे

दहिवद शिवारातील गोल्ड फॅक्टरीच्या मागील बाजूस असलेली गट नं.२५४/२ व २५४/३ एकूण क्षेत्रफळ २ हे. ७० आर विकणे आहे.

संपर्क :- दिपक अग्रवाल (7020562799)
अरूण मित्तल (9422215551)

फ्लॅट विकणे आहे

चंपाबाग साक्री रोड धुळे येथील पहिल्या मजल्यावरील 1 BHK Flat विकणे आहे.

-: संपर्क :-

9421534949
7498317318

कलमाडीत तरुणाच्या खुनाचा प्रयत्न तिघांना मारहाण; चौघांविरुद्ध गुन्हा

धुळे, दि.३१- तरुणासह त्याच्या दोघे भावंडांना किरकोळ कारणावरून चौघांनी मारहाण केल्याची घटना कलमाडी (ता. शिंदखेडा) येथे घडली. एका तरुणाचा गळा दाबून खुनाचा प्रयत्नही केला. याप्रकरणी नरडाणा पोलिस ठाण्यात चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला.

विनोद रमेश पाटील (वय ३४, रा. कलमाडी) याने फिर्याद दिली. त्यानुसार २९ ऑक्टोबरला सायंकाळी साडेसातच्या सुमारास गावात संशयित विजेंद्र छबीलाल पाटील उर्फ सोनू झालसे, ज्ञानेश्वर पिंताबर पाटील उर्फ वकील, गौरव चतुर पाटील, राजेंद्र शांताराम पाटील (सर्व रा. कलमाडी) यांनी वाद घातला. शिवीगाळ करीत हाताबुक्यांनी मारहाण केली. जमिनीवर पाडून तिघांनी विनोद यास दाबून धरले. तर अन्याय एकाने दोन्ही हातांनी गळा दाबत ठार मारण्याचा प्रयत्न केला. भांडण सोडविण्यासाठी आलेले भाऊ ललित पाटील, चुलत भाऊ नगराज पाटील यांनाही मारहाण करून ठार मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी चारही संशयितांविरुद्ध नरडाणा पोलीस ठाण्यात शुक्रवारी रात्री उशिरा गुन्हा दाखल झाला.

साक्रीत राष्ट्रीय एकता दिनानिमित्त विद्यार्थ्यांची पोलिसांसोबत भव्य रॅली

साक्री, दि.३१ (प्रतिनिधी)- राष्ट्रीय एकता दिनानिमित्त साक्री पोलीस स्टेशनच्या वतीने दि.३१ ऑक्टोबर रोजी न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसह शहरातून जनजागृती रॅली काढण्यात आली. अमली पदार्थांचे दुष्परिणाम, महिला सुरक्षा आणि सायबर गुन्ह्यांविषयी नागरिकांना जागरूक करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. साक्री पोलीस स्टेशनपासून सुरू झालेली रॅली गोल्डी पॉईंट, बसस्थानक, विजय मशिनरी, लक्ष्मी रोड, तहसील कार्यालयमार्गे न्यू इंग्लिश स्कूल येथे पोहोचली. सकाळी ते . या वेळेत झालेल्या रॅलीत विद्यार्थ्यांनी विविध जनजागृतीपर संदेश देत राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक सुरक्षेचे महत्त्व पटवून दिले.

अमली पदार्थांचे सेवन आरोग्यासह कौटुंबिक व सामाजिक जीवनावरही गंभीर परिणाम करणारे असल्याने तरुणांनी व्यसनांपासून दूर राहावे, असे आवाहन करण्यात आले. तसेच अमली पदार्थांची अवैध विक्री रोखण्यासाठी नागरिकांनी सतर्क राहावे, महिलांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे आणि ऑनलाइन फसवणूक, संशयास्पद लिंक व सायबर गुन्ह्यांपासून सावध राहावे, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. रॅलीत परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक ओंकार गवळी, सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष मुढे, गोपनीय शाखेचे संजय शिरसाठ, शांतीलाल पाटील यांच्यासह पोलीस अधिकारी व अंमलदार सहभागी झाले होते.

निधन वार्ता

सुरेश चित्ते



धुळे, दि.३१- शहरातील एसटीतील सेवानिवृत्त कर्मचारी सुरेश अर्जुन चित्ते यांचे अल्पशः आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७८ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, एक बहिण, दोन मुले, एक मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

आशाबाई कुलकर्णी



धुळे, दि.३१- शहरातील स्वातंत्र्यवीर सावरकर पुतळ्याजवळील रमाबाई आंबेडकर नगर शेजारील जुनी बस्ती येथील रहिवासी आशाबाई प्रमोद कुलकर्णी यांचे अल्पशः आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७६ वर्षांच्या होत्या. त्यांच्यावर देवपूर अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती आहे. त्या ज्येष्ठ पुरोहित तथा ब्राह्मण अंत्येष्टी सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रमोद कुलकर्णी यांच्या धर्मपत्नी होत.

पान १ वरुन

सरदार वल्लभभाई पटेल जयंती

शिबिराची सुरुवात केली. प्रास्ताविक सागर पटेल यांनी केले. कार्यक्रमास एम. टी. गुजर, काशिनाथ गुजर, रमेश गुजर, श्यामकांत गुजर, विलास गुजर, प्रमोद धनगर, आरिफ पठाण, प्रेमल पटेल, डॉ. कल्पक देशमुख, डॉ. मनुकुमार पाटील, डॉ. कल्पेश पाटील यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिरात ३८ रक्तदात्यांनी रक्तदान केले. धुळे येथील श्रीमती के. सी. अजमेरा रोटरी ब्लड सेंटरचे सहकार्य लाभले. तसेच समर्थ क्लिनिकल लॅबोरेटरीचे हेमंत माळी (शुगर व बी.पी. तपासणी) आणि श्री दत्त चष्मा घरचे डॉ. सुरेश जोगी (नेत्रतपासणी) यांनी सेवा दिली.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी किरण गुजर, घनश्याम गुजर, तेजस जैन, दीपक गुजर, कल्पेश गुजर, योगेश गुजर, मयूर गुजर, विलास पटेल, उदय गुजर, स्वप्निल गुजर, श्रीकांत गुजर, अक्षय गुजर, अतुल गुजर, बिपिन गुजर, नितीन गुजर, हर्षल गुजर, भावेश गुजर, हरी गुजर, अर्पण गुजर, शुभम गुजर, तेजस गुजर, रोहित गुजर, रोहन गुजर, ईशान पाटील, विजय सोनवणे, सोहम पाटील, कुणाल गुजर, जय गुजर, पुष्पक, चेतन आणि पार्थ आदींनी परिश्रम घेतले.

पंचवीस जानेवारी पासून देशभरात जनगणना होणार

यामध्ये मणिपूर, गोवा, उत्तर प्रदेश, पंजाब आणि उत्तराखंड या राज्यांचा समावेश आहे. तसेच लडाख, हिमाचल प्रदेश आणि जम्मू-काश्मीरमधील बर्फवृष्टी होणाऱ्या भागांमध्येही जनगणना पुढे ढकलण्यात आली आहे. या भागांसाठी स्वतंत्र वेळापत्रक जाहीर करण्यात येणार आहे. जनगणना प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी केंद्र सरकारकडून ऑनलाइन पोर्टल सुरू करण्यात येणार आहे. नागरिकांना प्रत्यक्ष जनगणना सुरू होण्यापूर्वी स्वतःची माहिती ऑनलाइन नोंदविता येणार आहे. ही स्वयंनोंदणी सुविधा १० जानेवारी २०२७ ते २४ जानेवारी २०२७ या कालावधीत उपलब्ध असेल. त्यानंतर १ मार्च ते ५ मार्च २०२७ दरम्यान नोंदविलेल्या माहितीची पडताळणी, जुळवणी आणि आवश्यक दुरुस्ती करण्यासाठी पुनरावलोकन फेरी आयोजित केली जाणार आहे.

देशात २०११ नंतर जनगणना

भारतामध्ये दर दहा वर्षांनी जनगणना घेण्याची परंपरा आहे. मात्र, २०२१ मध्ये होणारी जनगणना कोरोना महामारीमुळे पुढे ढकलण्यात आली होती. देशात शेवटची जनगणना २०११ मध्ये झाली होती. त्या वेळी भारताची लोकसंख्या सुमारे एक अब्ज २१ लाख इतकी नोंदविण्यात आली होती. स्वातंत्र्यानंतरची ही आठवी जनगणना ठरणार आहे. संपूर्ण प्रक्रिया दोन टप्प्यांत पार पडणार आहे. पहिल्या टप्प्यात घरांची यादी आणि घरांच्या स्थितीची माहिती संकलित केली जाणार आहे, तर दुसऱ्या टप्प्यात नागरिकांची लोकसंख्या आणि संबंधित माहिती नोंदविली जाणार आहे. या महत्त्वाकांक्षी मोहिमेसाठी केंद्रीय मंत्रीमंडळाने अकरा हजार ७१८ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली आहे. देशातील लोकसंख्या, सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी ही जनगणना महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

धुळ्यात मध्यरात्री कोम्बिंग ऑपरेशन

संबंधितांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

पथकाचे कॉम्बिंग ऑपरेशन

या घटनेनंतर पोलिसांनी तातडीने हालचाली करत ३० ऑक्टोबरला मध्यरात्री दोन वाजेच्या सुमारास स्थानिक गुन्हे शाखा, आझादनगर पोलीस ठाणे आणि आरसीपी पथकाच्या मदतीने विशेष कोम्बिंग ऑपरेशन राबवले. या संयुक्त कारवाईत पळून गेलेला संशयित आरोपी जब्बार शहा गुलाब शहा फकीर (वय ४९), मुज्मील शाह रफिक शाह (वय १९) आणि अमन शाह रफिक शाह (वय २५, सर्व रा. वडजाई रोड, काझी प्लॉट, शिवाजीनगर, धुळे) या तिघांना अटक करण्यात आली. या कारवाई दरम्यान शेख मुक्तार शेख नुरोध्रीन (रा. वडजाई रोड, धुळे) याच्या ताब्यात कत्तलीच्या उद्देशाने निर्दयतेने बांधून ठेवलेले तीन गोवंश आढळून आले. पोलिसांनी तिन्ही गोवंशांची सुटका करून त्यांना संगोपनासाठी पांझरापोळ गोशाळेत दाखल केले. याप्रकरणी महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियमांतर्गत स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखा आणि आझादनगर पोलीस ठाण्याच्या अधिकारी आणि अंमलदार यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

प्लॉट विकणे आहे

दोन रोड कॉर्नर धुळ्यातील सुप्रसिद्ध डोंगरे महाराज नगरच्या पॉश वसाहतीत २५०० स्क्वेअर फुटाचा प्लॉट विकणे आहे.

-: संपर्क :-

फो नं.9422798211

घर भाड्याने देणे

सर्व सोई युक्त घर भाड्याने देणे फॅमीली/कंपनी/ऑफिससाठी देणे आहे.

-: संपर्क :-

देवपूर सुलेखन गार्डनच्या मागील बाजूस कालीका दुकानाजवळ, धुळे

8055404946
8421461410

दिवाळी फराळ

अनारसे, करंजी, चकली, चिरोटे, लाडू, चिवडे, शेव आणि बरंच काही उपलब्ध. नोंदणी आवश्यक आहे

मदर्स किचन

फुलवाला चौक, धुळे.

9049902201
7887750864

पाहिजे

कमी रनिंग असलेल्या गाडीवर निर्वसनी अनुभवी ड्रायव्हर पाहिजे.

भेटा वेळ- दु १२ ते ३

-: संपर्क :-

9613790909

दुकान भाड्याने देणे आहे

इंदिरा गार्डन जवळ आनंदनगर देवपूर येथे लेडीज टेलर्स, जेंटस् टेलर गॅस रिपेअर दुकान छोटे ऑफिससाठी पुर्वमुखी १२/९ चे दोन दुकान भाड्याने देणे आहे.

संपर्क :- 8275702564

५९ वर्षांपासुन धुळेकरांच्या विश्वासाला पात्र ठरलेले...

Authorised Dealer

Godrej LG Life's Good

सर्व आधुनिक व लेटेस्ट मॉडेल

JAPAN PREMIUM



0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.

BAJAJ FINSERV HDB FINANCIAL SERVICES

*नियम व अटी लागू

श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.

श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे, फोनः (02562) 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०